
**माणूस** शनिवार । एकोणतीस एप्रिल एकोणीसशे बहात्तर । पन्नास पैसे



| | | | |
|---|---|---|---|
| माणूस | शनिवार | २९ एप्रिल १९७२ | पन्नास पैसे |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | अठ्ठेचाळीस | पंचवीस रुपये | पासष्ट रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**सप्रेम नमस्कार....**

□ 'माणूस'च्या १५ एप्रिल १९७२ च्या अंकातील 'मराठी मासिकांची सजावट' या विषयावरील परिसंवाद वाचला. महाराष्ट्र मुद्रण-परिषदेचे अध्यक्ष श्री. जयंतराव देवकुळे यांनी ऐन अधिवेशनात या विषयावर ऊहापोह केला आणि लगोलग मुद्रणक्षेत्रातील संबंधितांनाही आपले विचार व्यक्त करण्यास पाचारण केले, ही गोष्ट फार चांगली झाली. विचारांच्या देवाणी-घेवाणीतून काही चांगले निष्पन्न व्हावे, अशी अपेक्षा बाळगण्यास हरकत नाही.

'वाचन सौकर्य' आणि 'दृश्यसौंदर्य' हे हेतू मनात धरून मुद्रणपूर्व पृष्ठ-आखणी करावी लागते. यालाच आपण रचना, मांडणी किंवा 'ले-आऊट' म्हणतो. चित्रकला, छायाचित्रकला, किंबहुना कोणतीही दृक् प्रत्ययकारी कला उपयोगात आणताना रचनासौंदर्याची (कॉंपोझिशन) जी मूलतत्त्वे लक्षात घ्यावी लागतात तीच मुद्रितपृष्ठांसाठीदेखील लागू पडतात. कलाभ्यासकांच्या परिचयातील इंग्रजी परिभाषेत सांगायचे झाले, तर 'युनिटी, बॅलन्स, ऱ्हिदम, टोनल मासेस अँड एरियाझ, लीडिंग लाइन्स, स्ट्राँगपॉइंट्स् ऑफ इंटरेस्ट' इत्यादी तत्त्वे पृष्ठरचनाकाराला ज्ञात असली पाहिजेत. ती प्रथम अवगत करून घेऊन मगच प्रत्येकाने आपापले प्रयोगस्वातंत्र्य अमलात आणावे...सर्कसच्या खेळातील विदूषकांना शरीराचे वेडेवाकडे प्रयोग करावे लागतात; पण इतर कलाकारांप्रमाणे शरीराच्या सुंदर प्रयोगांची तालीमही आधी भरपूर करावी लागते. नुमतीच अनियंत्रित वेडीवाकडी हालचाल केली तर हातपाय मोडून घेतील बिचारे! नवरचनाकाराला आपल्या प्रयोगाचे शास्त्रोक्त समर्थनही करता आले पाहिजे, अशी अपेक्षा आहे.

२२ एप्रिल, १९७२ — वा. ग. तळवलकर, पुणे

मुखपृष्ठ : दुर्गा भागवत — चित्रकार : बाळ ठाकूर

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# स्वदेशी

# वसाहतवादाचा

# बळी

# मराठवाडा

अनिल बर्वे

आधी नव्व्याण्णव घाव पडलेले असतात म्हणूनच शंभराव्या घावाला वृक्ष उन्मळून पडतो !

मराठवाड्यात आज तेच घडत आहे. कृषी विद्यापीठ निमित्तमात्र झाले आहे. खरे तर, आज उडालेल्या स्फोटाची दारू गेल्या कित्येक वर्षांच्या उपक्षेने, मानहानीने, अवेहलनेने आणि अन्यायाने मराठवाड्याच्या भूमीत राज्यकर्त्यांनी ठासून भरली होती. मग आता बार उडताच, ' चळवळीला हिंसात्मक वळण लागले, ' असा शंखध्वनी करण्यात काय स्वारस्य ?

स्वातंत्र्यपूर्व काळात, निझामाच्या राजवटीत राष्ट्रीय चळवळीत प्रखरपणे भाग घेण्याचा गुन्हा मराठवाड्याने केला. १९३६ ला स्वामी रामानंदतीर्थ, आनंदकृष्ण वाघमारे, गोविंदभाई श्रॉफ आदी नेत्यांनी हैद्राबाद स्टेट काँग्रेसची स्थापना औरंगाबादला केली; तर १९३८ ला औरंगाबादेतच ' रेड फ्लॅगची ' स्थापना होऊन लेबर कॉन्फरन्स भरवण्यात आली. मराठवाड्याच्या क्रांतिप्रवण मनोवृत्तीची ही काही उदाहरणे !

अशा या बंडखोर आणि क्रांतिकारी विभागाकड निझामाने विशेष लक्ष पुरवून प्रत्येक क्षेत्रात मराठवाड्याची गळचेपी केली नसती तरच नवल. या गळचेपीचे

परभणीने एक इतिहासच जणू निर्माण केला.
हा इतिहास शक्यतो साधार व सविस्तर स्वरूपात सर्वांसमोर यावा या उद्देशाने 'माणूस'ने अनिल बर्वे यांना या भागात प्रतिनिधीपत्र सोबत देऊन दौऱ्यासाठी पाठविले.
औरंगाबादला पोचताच बर्वे यांच्यावर हद्दपारीचा हुकूम बजावण्यात आला.
या हुकुमाविरुद्ध न्यायालयात दाद मागणे वगैरे प्रयत्न सुरू आहेत.
पण तूर्त तरी दौरा अर्धवट सोडावा लागल्याने विषय या एका लेखातच आटोपता घेतलेला आहे.
—संपादक

विदारक उदाहरण म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळात मराठवाड्याच्या पाची जिल्ह्यांत मिळून औरंगाबादेला एकच सरकारी कॉलेज होते आणि तही इंटरमीजिएटपर्यंत. पदवी घ्यायची झाली तर हैद्राबादेला जावे लागे. मराठवाड्याच्या इरिगेशन बाबत निझामने नेमलेल्या तज्ज्ञांनी (?) दिलेला रिपोर्ट असाच मोगलाइ. 'काहीही होऊ शकत नाही.' आज त्याच मराठवाड्यात जायकवाडीसारखे मोठे प्रकल्प उभारले गेले. तरी मराठवाड्याची जनता सहनशीलतेचा अंत पहात बसली. तिला वाटले हा निझाम जाईल आणि सारे काही ठीक होईल.

नंतर मग केव्हातरी कोंबडा आरवला. मराठवाड्यातील जनतेला वाटले, स्वातंत्र्य देवता येणार. आपली घरंदारं धनधान्यांनी संपन्न होणार. स्वातंत्र्यदेवता आलीही, पण ती केवळ मुंबई-कलकत्त्याच्या धनिकांच्या घरी पाणी भरण्यापुरती! मराठवाडा तसाच अंधःकारात राहिला. अजून औरंगाबादला जा, त्या शहराचे सरंजामी स्वरूप तत्काळ ध्यानात येईल.

स्वातंत्र्यानंतर हैद्राबादने सतत मराठवाड्याला उपेक्षिले. कारण काही झाले तरी मराठवाडा 'परक्याचे धन.' केव्हा तरी महाराष्ट्रात जाणारच. मराठवाड्यातल्या जनतेलाही वाटले, आपण आपल्या शिवरायाच्या महाराष्ट्रात जाऊ आणि

सारे काही ठीक होईल. अखेर एकदाचा सोळा वर्षांपूर्वी मराठवाडा महाराष्ट्रात सामील झाला. पण मराठवाड्याच्या जनतेचे दुर्दैव. महाराष्ट्रातला शिवराया केव्हाच मेला होता नि घाशीराम कोतवालाची भुतं राज्यशकट हाकत होती–

मग पुन्हा एकदा उपेक्षा, नेहमीची अवेहलना–सततचा मानभंग !

पण एकंदरीत ही भूमी संताची. वेरूळ अजिंठ्याची. उपेक्षा सहन करीत चूप बसली. मराठवाड्याची सामान्य जनता अजून बंड करून उठायला तयार नाही. पण तरुणांची माथी जरा भडकल्याने त्यांनी आपली काढली एकाची गाढवावरून धिंड–जाळल्या दोन चार बसेस.

मग महाराष्ट्र सरकार लगेच खडबडून जागे झाले. हा असंतोष 'शमवण्यासाठी' तातडीच्या उपाययोजना आरंभल्या–कोणत्या ? पोराटोरांना बडवून काढा, पत्रकारांना हाकलून लावा, मराठवाड्यांतून जाणाऱ्या एस्टचा बंद करा, जमलंच तर या गडबडीत शंकरराव चव्हाणांचा बळी घ्या, पब्लिकच्या तोंडाला पाने पुसायला एखादी 'तातडीची' बैठक घ्या, जादा गडबड चालली आहे; तिथे एस. आर. पी. फोर्स पाठवून द्या !

महाराष्ट्र सरकारची उपाययोजना साहेबाच्या परंपरेला साजेशीच आहे. एवढी उपाययोजना केली, की पोराटोरांनी चालवलेली हुल्लडबाजी थांबेल. दरम्यान पाच दहा तरुणांचे मुडदे पडतील, शंभर दोनश्यांची टाळकी फुटतील, काही पाच पन्नास तुरुंगात खितपत पडतील. पण 'कायदा आणि सुव्यवस्था' राखण्यासाठी ही काही फारशी किंमत नव्हे. एवढी किंमत मोजली, की सारं कसं शांत शांत.

कारण मराठवाडा ही संतांची भूमी ! अगदीच खरे बोलायचे झाले तर मराठवाड्याचे नेतृत्व लाचार, अवसान घातकी, आपापसातल्या हेव्यादाव्यांनी, मत्सराने पिडलेले.

मराठवाड्याची अर्धाकोट जनता, दारिद्र्य, दुष्काळ आणि उपासमारीने पिडली आहे. ती सरकारकडे दाद मागते. पण हे सरकार तरी काय करणार ? हे सरकार पडले बागाईतदारांचे, बड्या भांडवलदारांचे निष्ठावंत गुलाम. मग हे दीनवाणे सरकार इच्छा असूनही. मराठवाड्याच्या जनतेसाठी काही करू शकत नाही. पण इच्छा नसताना बागाईतदारांच्या सोयीसाठी राहुरीला कृषी विद्यापीठ काढून लक्षावधी रुपयांच्या सत्यनाशाला तयार होते. हे दीनवाणे सरकार इच्छा असूनही मराठवाड्याच्या जनतेसाठी काही करू शकत नाही, पण इच्छा नसताना जुळ्या मुंबईवर दोन हजार कोट रुपये खर्चायला तयार होते. कारण नाइलाज आहे. हे सरकार बागाईतदारांच्या, भांडवलदारांच्या सेवेला बांधले गेले आहे आणि मराठवाड्याची जनताही कायदा आणि सुव्यवस्थेला व शांततामय संसदीय मार्गांना बांधली गेली आहे. तेव्हा ही जनता तरी 'अन्याय होतोय' अशी बोंब मारण्यापलीकडे काय करणार ? ◻

तेरा एप्रिलला दुपारी औरंगाबादला जाण्यासाठी मनमाड पॅसेंजर पकडली. माझ्या 'सोबती'ला स्पेशल ब्रँचची चार माणसे होतीच. जेलमधून (जामिनावर) सुटल्यापासून माझ्यासारख्या किरकोळ पत्रकारावर 'नजर' ठेवण्यासाठी तीन पोलीस अहोरात्र नजरेत तेल घालून जागते रहात आहेत. औरंगाबादला मी पोचलो आणि स्पेशल ब्रँचच्या डी. वाय. एस्. पीने माझे 'स्वागत' केले. पोलिसांच्याच जीपमधून 'हॉटेल गुरू'वर उतरलो. माझ्या शेजारच्या खोल्या त्वरित पोलिसांनीं बुक केल्या. लिमये नावाचा एक 'काळापहाड' सतत आपल्या 'छोटू'बरोबर मला सोबत देत होता. त्याने माझा सर्व कार्यक्रम लिहून घेतला, वाटले यांची कटकट एवढ्याच मर्यादेपर्यंत राहणार. पण नाही--

## स्टंट चित्रपटाची आठवण

दुपारी मराठवाडा युनिव्हर्सिटीचे इतिहासाचे प्राध्यापक पं. वि. रानडे यांच्याकडे गेलो होतो. युनिव्हर्सिटी बिल्डिंगपासून फर्लांगावर येतो न येतो तोंच पोलिसांची जीप भरवेगाने येऊन, रस्ता आडवून उभी राहिली. एकंदर सारा सीन स्टंट चित्रपटातल्या शेवटच्या रिळाप्रमाणे घडला. आणि मग माझ्यावर हद्दपारीचा हुकूम बजावण्यात आला. अर्थात मला 'त्रास' देण्याचा पोलिसांचा हेतू नव्हता, म्हणून माझं रिझर्वेशन त्यांनीच करून आणले. पंधरा तारखेला सकाळी पोलिसांनीच मला उठवण्याची काळजी घेतली. मग त्यांच्याच जीपने मला एस. टी. स्टॅण्डवर नेले. एस. टी. मध्ये मी आणि माझे ते चार 'सोबती' चढलो, परंतु 'नक्षलवाद्याचा' एवढा बंदोबस्त पुरेसा नव्हता म्हणून की काय एस. टी. मागून खास जीप येत होती. वैतागून मध्येच नगरला उतरलो. पुन्हा पोलिसांचे तेच ओशाळे हसू, तीच सरबराई आणि तेच 'नजर' ठेवणे. नगरहून उठलो. पुण्याला निघालो. पुन्हा माझ्या बरोबर पेट्रोकोल होतेच.--मंत्र्यांसाठीसुद्धा एवढा बंदोबस्त नसावा. पुण्याला आल्यावर माझ्या 'दौऱ्याचा' खर्च काढला. माझा खर्च सत्तर रुपये, सरकारचा किमान अडीच हजार. अर्थात विनाकारण सत्तर रुपये खर्च झाले, तर माझ्या तोंडाला फेस येतो. सरकारला काय, आमच्यासारख्या 'देशद्रोह्यां'च्या बंदोबस्तासाठीच पोटं आवळून जनता कर देतेच आहे !

मराठवाड्यावर अन्याय होतो, म्हणजे नेमका काय होतो ? सर्व आकडेवारीनिशी द्यायला मी असमर्थ आहे. कारण औरंगाबादला जाताच माझ्यावर मी 'कम्युनिस्ट मार्क्सिस्ट एक्स्ट्रीमिस्ट' पक्षाचा असल्याने हद्दपारीचा हुकूम बजावण्यात आला. (सदर नावाचा पक्ष अखिल भारत वर्षात कोठेही असल्याचे दाखवून देणाऱ्याचा मी जन्मजन्मांतरीचा गुलाम व्हायला तयार आहे.) पण एका दिवसाच्या वास्तव्यात सर्वसामान्यांची जी काही ओरड ऐकली त्याची जंत्री पुढीलप्रमाणे.

स्वातंत्र्य मिळताच औरंगाबादचे रेडियो स्टेशन पुण्याला हालवण्यात आले. पुढे नशिबी येणाऱ्या सासुरवासाची तो आपली एक नांदी होती. मराठवाड्याचे लोक

आमचे नभोवाणी केंद्र परत द्या, असा गळी वीस वर्षे ओरडा करताहेत. हा ओरडा निवडणुकीत भोगायला लागू नये, म्हणून मग सरकारने चालबाजी केली. १९६९ ला परभणीला रीलेइंग सेंटर सुरू केले. पण या रीलेइंग सेंटरचा काय उपयोग? मराठवाड्याच्या जनतेला आपला आवाज उठवण्यासाठी, आपले सांस्कृतिक जीवन फुलवण्यासाठी पूर्वीसारखे ब्रॉडकास्टिंग स्टेशन पाहिजे होते. तेव्हा ब्रॉडकास्टिंग स्टेशन चोथ्या योजनेत देऊ असे पोकळ आश्वासन दिले गेले. दरम्यान नुकत्याच संपलेल्या निवडणुकीच्याआधी 'जळगाव नभोवाणी केंद्र' होणार अशी घोषणा देऊन यशवंतरावांच्या हातून जळगाव नभोवाणी केंद्राच्या इमारतीचे भूमिपूजनही करण्यात आले. मराठवाड्याचे लोक 'औरंगाबाद नभोवाणी' केंद्राविषयी पुन्हा बुचकळ्यात पडले आणि सांशकतेने पुन्हा ओरडायला लागले. तेव्हा ऐन निवडणुकीच्या मोसमात मराठवाड्याच्या लोकांची समजूत घालण्यासाठी, मराठवाडा चेंबर ऑफ कॉमर्सच्यावतीने झालेल्या 'व्यापाऱ्यांच्या परिषदेत' नभोवाणी केंद्र औरंगाबादला होणार असून त्यासाठी 'जुनी इमारत' ताब्यात घेण्यासाठी पत्रव्यवहार चालू असल्याचे सांगण्यात आले, पण ही 'जुनी इमारत' पत्रव्यवहार होऊन ताब्यात येण्याच्या आधीच कोसळून पडेल आणि औरंगाबाद नभोवाणी केंद्र पुढील शतकातील चौथ्या पंचवार्षिक योजनेपर्यंत लांबणीवर पडेल याची मराठवाड्याने खात्री बाळगावी!

## मराठवाडा रेल्वे

—जी गत नभोवाणी केंद्राची तीच रेल्वेची. उगाच आपली 'फूलराणी'सारखी छोटी मीटरगेज आगगाडी मराठवाड्यात इकडून तिकडे धावत असते. या आगगाडीचा ना धड पर्यटनाला उपयोग ना धड उद्योगधंद्यांना उपयोग. मराठवाड्यात उद्योगधंदे काढा म्हटले, की उद्योगपती म्हणतात—'ब्रॉडगेज रेल्वे होऊ द्या, पटापट काढतो.' तर रेल्वेखाते म्हणते—'उद्योगधंदे वाढू द्यात—मालवाहतूक वाढली, की चुटकीसरशी आम्ही ब्रॉडगेज रूळ टाकून देऊ.' अशा या आधी उद्योग की आधी रेल्वेच्या फेऱ्यात मराठवाड्याची जनता फसली आहे. रेल्वेखाते पब्लिक सेक्टरमध्ये असतानाही 'प्रॉफिट मोटिव्हचा' शिखंडी पुढे करण्यात येणार असेल, तर रेल्वे पुन्हा आपापल्या खाजगी कंपन्यांच्या ताब्यात तरी देऊन टाकाव्यात हे बरे!

मनमाड–मुदखेड मार्ग ब्रॉडगेज करा ही मागणी आजकालची. या मागणीआधीपासून सोलापूर–औरंगाबाद मार्ग ब्रॉडगेज करा ही मागणी आहे. आणि विशेष म्हणजे केंद्र सरकारच्या प्राधान्य (प्रेफरन्स) यादीतही या मार्गाचा क्रमांक तिसरा होता. आणि या दोन्ही मार्गासाठी दिल्लीपर्यंत शिष्टमंडळे जाऊन भिडली होती. एका शिष्टमंडळाचे नेतृत्व तर खुद्द वसंतराव नाईकांनी जातीने केले होते. पण रेल्वेखात्याच्या डोक्यात काही उजेड पडला नाही आणि प्राधान्य यादीतील अग्रस्थानी मार्गांना डावलून दिवा–दासगाव आणि मिरज–कोल्हापूर मार्ग ब्रॉडगेज

करण्यात आले. आता हे मार्ग करताना मात्र मराठवाड्याच्या बोकांडी बसणाऱ्या कसोट्या आडव्या आल्या नाहीत — (कारण कोल्हापूरच्या व्यापाऱ्यांच्या 'गुलाला'ला मार्केट मिळाले पाहिजे ना ! ) आताच्या नव्या अंदाजपत्रकात तर दासगाव–पनवेल मार्गाची योजना आखली गेली आहे. पण मराठवाड्यातला फूटभर मार्ग काही ब्रॉडगेज झाला नाही.

मनमाड-मुदखेड मार्गाची पहाणी होण्यापलीकडे प्रगती नाही. मध्यंतरी तर नगर-मुंबई दरम्यान माळशेज घाटाची योजना होऊनही, नगर-बीड-नांदेड मार्गाची सूचना चर्चेला येऊनही रेल्वेखात्याने विचारात घेतली नाही. रेल्वेखाते मराठवाड्यावर एवढा अन्याय करत असतानाही रेल्वेखात्याचा अंदाजपत्रकाच्या वेळी मराठवाड्याचा एकही खासदार आवाज उठवत नाही. अर्थात खासदार तरी काय करणार ? त्यांना आपले डोके पक्षश्रेष्ठींपाशी ठेवून केवळ हात पार्लमेंटात घेऊन जावे लागतात.

मराठवाड्याचे औद्योगिक रथचक्र या रेल्वेच्या दलदलीत जसे फसले आहे, तसेच वीजदराच्या दगडाला अडले आहे. मराठवाड्यातील गंगाखेड थर्मल पॉवरची शक्ती नासिकच्या औष्णिक विद्युत केंद्राच्या निम्म्यानेही नाही. तेव्हा अर्थातच मराठवाड्यातील विजेचा दर मुंबईच्या मानाने जास्त आहे, आणि मराठवाड्याच्या विकासाआड ही एक मोठी धोंड होऊन पडली आहे. पण महाराष्ट्र सरकार या अनुषंगाने काहीही हालचाल करण्यास तयार नाही.

औद्योगिक क्षेत्रात भांडवल ओतण्यासाठी महाराष्ट्र सरकारने 'महाराष्ट्र स्टेट फायनान्स कार्पोरेशन' आणि 'सिकॉम', या संघटना उभारल्या आहेत. पण या संस्थांनी महाराष्ट्राच्या इतर भागात जी गुंतवणूक केली आहे ती मराठवाड्याशी तोलून पहाता महाराष्ट्र आणि मराठवाडा यांतील औद्योगिक तफावत भरून काढण्यास शंभर वर्षेही अपुरी पडतील याची खात्री पटते. अशा रीतीने मराठवाड्यात ना रेल्वे, ना वीज, ना भांडवल. मग आहे तरी काय ? केवळ जमीन आणि पाणी ? अशा परिस्थितीत कोणता उद्योगपती मराठवाड्यात येईल ? नि कशासाठी ?

ही जर कोंडी फोडायची असेल आणि मराठवाड्याच्या औद्योगिककरणाला वेग द्यायचा असेल तर आर्थिक अनुकूलता निर्माण होण्याची वाट न पहाता सार्वजनिक क्षेत्रातील एखादा मोठा कारखाना तेथे सुरू केला गेला पाहिजे. संरक्षण क्षेत्रातील किंवा खताचा एखादा उद्योगधंदा येथे आणला गेला पाहिजे. नियोजन मंडळ आणि वांच्छु समित्यांच्या शिफारसीही त्याच अनुषंगाने आहेत. पण राज्य आणि केंद्र, दोन्ही सरकारे याबाबत कानांत दडे घालून बसली आहेत. मुंबईत नव्या उद्योगधंद्यांना परवानगी देऊ नये अशा महाजन समितीच्या शिफारसी येताच भांडवलदारांच्या सोयीसाठी दोन हजार कोट रुपये खर्चून जुळी मुंबई उभारण्यात येत आहे. पण मराठवाड्याबाबत मात्र पैसा नाही. सबब सांगितली जाते हे कितपत योग्य आहे ?

## समतोल ढळला

एकीकडे पुण्या-मुंबईत वाढत्या कारखानदारीमुळे दूषित हवेचा प्रश्न निर्माण होतोय, नासिकमध्ये वाढत्या उद्योगधंद्यामुळे जमिनींचे भाव कडाडताहेत, पण मराठवाड्याच्या जनतेच्या नशिबी मात्र वैराण माळावरली मोकळी हवा खाण्या-पलीकडे काहीही लिहिलेले नाही. महाराष्ट्र सरकारच्या लेखी, अर्धाकोट ग्राहकांचे हुकमी मार्केट एवढीच मराठवाड्याची किंमत, हा एक प्रकारचा देशी वसाहतवादच नव्हे काय ?

उद्योगधंद्यांच्या वाढत्या केंद्रीकरणामुळे विकासाचा प्रादेशिक समतोल ढळला आहे. महाराष्ट्रातल्या अठराशेकोटी रुपयांच्या उद्योगधंद्यांपैकी सुमारे पंधराशे कोटी रुपयांचे उद्योगधंदे केवळ बृहन्मुंबईच्या परिसरात आहेत. बाकी उद्योग, पुणे-सोलापूर सोडले तर, इतरत्र अक्षरशः काही नाहीत. यामुळे मैलोन्‌मैल ओसाड पडले आहेत तर टिचभर जागी बड्या शहराच्या नावाखाली अॅस्फॉल्टची जंगले उभी राहिली आहेत. या प्रादेशिक असमतोलामुळे बेकारी दारिद्र्याच्या समस्या आ वासून उभ्या राहिल्या आहेत, तर मोठ्या शहरातून झोपडपट्ट्यांचा आणि गुन्हेगारीचा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा भांडवलदारी रचनेत विकसित भाग अविकसित भागांचे शोषण करू लागतात, त्यांना दडपू लागतात. मराठवाड्यातला असंतोष हा मुख्यतः या दडपशाहीविरुद्धचा असंतोष आहे.

ही परिस्थिती बदलावयाची असेल तर कारखानदारांना आपल्या उद्योगांचे विकेंद्रीकरण करावयाला भाग पाडले पाहिजे. त्यासाठी त्यांना भरपूर सवलती उपलब्ध करून दिल्या गेल्या पाहिजेत. त्याच बरोबर खाजगी भांडवलदारांवर अवलंबून न राहता सरकारी क्षेत्रातील मोठे उद्योगधंदे तात्पुरत्या फायद्या तोट्याचे निष्कर्ष न लावता अविकसित भागात उभारले गेले पाहिजेत. परंतु महाराष्ट्र सरकार प्रादेशिक विकासाच्या समतोलाचे भान न ठेवता भांडवलदारांच्या हिता-साठी दोन हजार कोट रुपये खर्च करून नवी मुंबई उभारून जनतेच्या हितावर निखारे ठेवत आहे. हे सारे आपल्या भांडवलदारी समाजरचनेचे कटूफळ आहे.

मराठवाडा उद्योगधंद्याच्या बाबतीत अशा रीतीने मागासलेला राहिला. मराठ-वाड्यात खनिज द्रव्यांची शक्यता बरीच कमी आहे, तरी पण मराठवाड्याचा जिऑग्राफिकल सर्व्हे एकदा केला गेला पाहिजे. मराठवाडा विकासमंडळाने तशी मागणीही केली आहे. परंतु विदर्भासाठी जिऑग्रफिकल सर्व्हे कमिटी नेमणारे महाराष्ट्र सरकार मराठवाड्याकडे मात्र चक्क दुर्लक्ष करीत आहे. नोकऱ्यांच्या बाबतीतही मराठवाड्यावर असाच अन्याय होत आहे. अगदी तृतीय आणि चतुर्थ श्रेणीच्या नोकरांबाबतही पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भ मराठवाड्यावर कुरघोडी करीत असतात. या वाढत्या अन्यायाच्या आगीत कृषी विद्यापीठामुळे आणखीन तेल ओतले गेले, नि सारा मराठवाडा तरुणांच्या ज्वालेने भाजून निघाला. ◻

पृष्ठ ५८ वर

**रवींद्र पिंगे** शतपावली

# सत्कार

....बाईंना सन्मान मिळाला याचा आनंद आपणा सर्व स्नेही मंडळीला झाला आहे. हा आनंद एकत्र जमून बाईंच्या सहवासात थोडा वेळ उपभोगण्यासाठी आपण सर्वांनी रविवारी सायंकाळी आमच्या येथे जमवण्याचे ठरविले आहे. शोभा गुर्तु या प्रसंगी गाणार आहेत. आपण यालच.......

तुम्ही निःशंक असा हो ! बाईंचा सत्कार आहे म्हणजे ह्या आमंत्रणपत्रिकेतल्या बाटग्या मराठीला न ठेचाळता कुठे असू तिथून आगीच्या बंबासारखे तडफडत येणारच. आता आमंत्रणाचा बहुमान केलात, तो अंगी लागलाच. पण समजा, की नसतं बोलावलंत; तरी सारे मानपान गुंडाळून आम्ही थेट एक्सप्रेस डिलिव्हरीनेच आलो असतो. आमचा तो हक्कच आहे. बाईंवर आम्ही लुब्ध आहोत, बाईंच्या सरस्वतीने आमच्यावर मंत्र टाकला आहे, असलं उष्ट आणि पारोसं भाष्य रानफुलासारखं रसोत्कट जगणाऱ्या बाईंच्या संदर्भात करण्याइतकी आमची कातडी घट्ट नाही. ह्या विद्याविलासी बाई कुठेतरी अवती-भोवती आहेत ह्याचा आम्हाला परोपरीचा दिलासा आहे. असं खुल्लंखुल्लं लिहिलं, की त्यात सारं काही आलं. त्या कुठे तरी दिवा लावून लिहिताहेत ह्याचा प्रकाश आम्हाला पुरतो. त्यांनी सृष्टीचं भिंग नीट न्याहाळलं, व्यासवाणीचा उन्मेषशाली अर्थ आणि अन्वय लावला, मठस्थ बौद्धांचे कायदेकानू तपासले, संतप्त भंकस पिढीला अभिजात जिव्हाळ्याने समजावून घेतलं, कलावंतांच्या सांस्कृतिक स्वातंत्र्याचा जरीपटका सदैव फडफडेल कसा ह्याची काळजी वाहिली, इतरांना अगम्य असणाऱ्या प्रश्नांना बेधडक हात घातला. म्हणून बाई ग्रेट आहेत असं शिक्कामोर्तब करणं हे फारच वरवरचं झालं. तो शेंदूर झाला. दुसऱ्याच्या कृपेची अभिलाषा न धरता बाईंनी सतत सत्याची कास धरली, व साहित्य आणि बहुरूपी समाजजीवन ह्यांची क्षणभरसुद्धा फारकत होऊ न देण्याचं भान जागतं ठेवलं, हे सांगणंसुद्धा तसं अपुरंच आहे. मग बाईंचं असामान्यत्व आहे तरी कशात ? विषय निघाला म्हणून सांगतो; बाईंची थोरवी ह्यातच

आहे की सत्यव्रती ज्ञानोपासकाचं फटिंग आणि फटकळ आयुष्य जगत असतानाच त्याची ऐट अंगावर येऊ न देता माणसाला साधी बाळबोध संसारी तृप्ती अनुभविता येते ह्याचा त्यांनी आमच्या डोळयांदेखत कित्ता घालून दिलेला आहे. ही त्यांची कर्तबगारी केवळ अजोड आहे. उरलेल्या वाङ्मयीन गोष्टी तशा सोप्या आहेत. बाईंनी वाचलं आहे ते आम्हीसुद्धा वाचून दाखवू. अगदी त्यांच्यासारखं घडाघड वाचता आलं नाही, तरी र फ ट फ करीत, अक्षरं लावीत लावीत आम्ही अगदी जरूर वाचून दाखवू. इतकंच नव्हे तर लहान तोंडी मोठा बकाणा मारून छातीठोकपणे सांगतो, की प्रसंगी आम्ही त्यांच्यासारखं लिहूनही दाखवू! फार फार तर काय होईल की आमचं लेखन म्हणजे बाईंच्या शरण आणणाऱ्या पुष्ट लेखनविलासाची अकरावी किंवा अठरावी कार्बन कॉपी असेल. पण आम्ही लिहून हे दाखवूच. तसा चलाखपणा करण्याचा क्षीण यत्न आमच्या पिढीतल्या आमच्यासकट सर्वांनी केलासुद्धा. पण जरा कुठे निसर्गाबद्दल चार अत्तर मारलेली वाक्यं शिंपडावीत तर बाईंच्या आरस्पानी अवलोकनाचा तो अपभ्रंश वाटावा, असा ओशाळवाणा योग आम्हा समस्तांच्या कुंडल्यात ठळकपणे वज्रलेप करून ठेवलेला निघाला. तर ते एक असो. बाईंबद्दल सांगतो. त्यांच्या थोरवीबद्दल सांगतो. बाई म्हणजे परस्पर विरोधी गोष्टी आहेत. निःस्संग असून संग्राहक, फटिंग असून संसारी, फटकळ असून वात्सल्यवेल्हाळ, विद्याविलासी असून निरागस, आणि आग असून कोमल आहेत. त्यांच्या लेखनाचं सोंग घटकाभर आणता येईल. पण वृत्तीचा हा सुलक्षणी पान्हा कुठून आणायचा? निस्पृह जिंदगीची ही दैवी देन बाईंना अपातता लाभलेली नाही. त्यांनी त्याची किंमत रोखीत मोजली आहे. तत्त्वनिष्ठ राजारामशास्त्र्यांचा, त्यांच्या दिवाण असलेल्या निस्पृह आजोबांचा, डॉ. केतकरांचा, आणि धडपड्या वडिलांचा वारसा त्या चालवीत आहेत. अनेक विद्या त्यांनी पचवल्या. पण अपमान पचवला नाही, असत्य पचवलं नाही. बुवामंडळींचा बुरखा यथेच्छ फाडला. लेखणी मोरपिसारखी आणि वस्तऱ्यासारखी, एकाच वस्तादगिरीने वापरली. त्यांचं कुठलंही पुष्पवर्णन वाचा. मोरपिसाचा डौल आणि त्याची गहिरी रंगसंगती त्यात आढळलीच पाहिजे. आणि लेखणीच्या धारेचा प्रताप पहायचा असेल तर कुठल्याही डुड्ढाचार्यांच्या पाठीवर उठलेले वळ बघा. ते अजून वाळलेले नसतील.

अशी ढंगवाली बाई समारंभाची अभिषिक्त नायिका.

तिची वाट पहात आम्ही हिरवळीवर उभे आहोत.

आपला दरबार घेऊन बाई येत आहेत. आगेमागे संतप्त तरुण साहित्यिकांचा गोतावळा आहेच. बाई साधी सुती चंद्रकळा नेसल्या आहेत. काळंच पोलकं, पायांत कोल्हापूरी पायतण. त्याच्या पट्ट्यांवर चांदण्यासारखे घुंगरू लुकलुकत आहेत.

सर्वांशी सलगीच्या तोंडभर गप्पा सुरू......

कालच दिल्लीहून परतले. सिंपोझियम भयंकर वाईट झाला. Indian Nation हा शब्दप्रयोग तुम्ही कधी ऐकलाय जन्मात ? पण त्याच्यावर तिथे तीन तास चर्चा झाली. आणि संतप्त तरुण साहित्यिकांबद्दल बोलायला आम्हा म्हातारड्यांना कशाला बोलावलं ? अहो, एका तरुण साहित्यिकाला तिथे बोलावलेलं नव्हतं ! मी तक्रार नोंदवली. म्हटलं, हा काय चावटपणा आहे ? ज्या तरुण पिढीबद्दल तुम्ही बोलणार त्यांना बोलवायला नको ?

हो बुवा, माझं लेखन गुजरातीत अनुवादीत झालंय. पण इंग्रजीत अनुवादायला ते फार कठीण जातंय. कारण माझी मूळ शब्दांची मोडणी चमत्कारिक असते.

बरंका, आम्हाला गाव असं नाहीच. मुंबई हेच आमचं गाव. खरं म्हणजे आम्ही पंढरपूरचे लोक. पण माझ्या आजोबांनी त्या गावाचा त्याग केला. ते मुंबईलाच स्थायिक झाले.

माझे आजोबा काही दिवस इंदूरला दिवाण होते. फार निस्पृह माणूस. मला आठवतंय, दिवाळी-दसरा आला, की त्यांच्यावर भेटींचा आणि अहेरांचा नुसता वर्षाव व्हायचा. ते वाड्याच्या ओटीवर बसून रहायचे. माणसं त्यांना पंचपक्वानांनी भरलेले थाळे द्यायचे. ते प्रत्येक थाळ्यातील फक्त एकेक वडी प्रसादासारखी उचलून घ्यायचे. उरलेला थाळा जसाचा तसा परत करायचे. आणि स्वतःसाठी म्हणून काढून घेतलेल्या त्या वड्या नंतर नोकर माणसांना वाटून टाकायचे. आम्हा मुलांना त्यांनी भेटीदाखल आलेल्या वस्तूंना स्पर्शही करू दिला नाही.

गांधी फारच प्रेरक माणूस. अशा माणसाने छातीवर गोळीच झेलणं भाग आहे. त्याने इतक्या गोष्टींचे मार्ग मोकळे करून दिले आहेत. त्याची एक स्वच्छतेची कल्पना घेतली तरी ती जन्मभर पुरून उरेल.

राजारामशास्त्री तसे माझे सख्खस्त आप्त नव्हेत. ते माझ्या वडिलांच्या आईचे चुलतभाऊ. त्यांच्या लेखांचा संग्रह मी तयार करून द्यावा अशा मला दोन मागण्या आल्या. एकाला मी सांगितलं, की ज्या राजारामशास्त्र्यांनी उभ्या आयुष्यात असत्याला स्पर्श केला नाही, त्याच्या नावाबरोबर तुमची सांगड नको ! साहित्य अकादमीसाठी मी राजारामशास्त्र्यांचा संग्रह संपादन करतेय. त्यांच्याकडून मिळणाऱ्या बिदागीपेक्षा मला दोन तीनशे रुपये जास्तच खर्च येणार आहे. पण मला ते परवडेल. असत्याचे व्यवहार नकोत......

आजकाल कुणाचा सत्कार म्हटला, की अंगावर काटा उभा रहातो. तेच ते चलाखी करून घातलेले हारतुरे, तीच त्या चलाख माणसांची मागचेपुढचे हिशोब करून केलेली चलाख भाषणं, तीच ती चलाख साखर-पेरणी. त्या चलाख संदर्भांतून आम्ही मोकळे झालो आहोत. बाईंना लोकसाहित्याचा नि लोकजीवन न्याहाळण्याचा जन्मजात छंद. किंवा, त्यांचा तो स्वधर्म म्हणा. त्या नात्याचं सच्चेपण नीट लक्षात ठेवून बाईंना अरण्यवासी हातांनी विणलेली गडदरंगी शाल तृप्त मित्रांच्या

प्रेमाचे कृतज्ञ प्रतीक म्हणून भेटीस गेली आहे. त्या शालीचे रंग रानात पडणाऱ्या लख्ख उन्हासारखे टवटवीत आहेत. अहो, ती तेवढी शाल आम्हाला देता का ? आम्ही पैसे मोजतो, हे शब्द जिभेवर येऊन माघारी वळले, कारण असल्या शाली फक्त दाम मोजून मिळत नसतात ह्याचं प्रखर भान जागं झालं.

भाषणबाजीला भक्कम टाळं मारणाऱ्यांना दुवे देत आम्ही शोभाबाईंच्या तयार गळ्यातून फुलणाऱ्या मेवाडी लोकगीताची फुलं ओंजळीत झेलीत आहोत.

केसरिया बालम आवोजी पधारो म्हारादेस.

...............

सांझ भयी दिन आथम्यो ने चकवी हिन्दी रोय रैन कदी ना होय

तुमचा गीतविलास निर्वेध चालू द्या. तुम्ही तुमच्या मस्तीत खुषाल असा. आम्ही जरा बाहेरच्या बागेत बसून चांदण्या मोजून येतो.

वारा काय सुरेख सुटला आहे .....

नाही रे बाबा, मी आत्मचरित्र वगैरे काहीही लिहिणार नाही. अधूनमधून किस्से लिहू जमल्यास. मी डायरीबियरी काहीही लिहीत नाही. कशासाठी लिहायची ? कालच्यासारखाच आजचा दिवस असतो माझा.

मी सर्व सोडून आदिवासी जीवनाकडे कशी झेपावले तो एक इतिहासच आहे संस्कृत शिकत असताना शंकराचार्य भेटला. शंकराचार्य भारीच द्वाड माणूस आहे. तुम्ही त्याला accept केल्याशिवाय तो तुम्हाला काहीच accept करू देत नाही. त्याने मला पहिला जबरदस्त धक्का दिला. ईश्वर नेमका कुठल्या स्तरावर आहे ते कळेना; प्रार्थना तरी का नि कुणाची करायची ते कळेना. मी बेचैन झाले. मनू मी अगोदरच वाचलेला होता. म्हणून तिथून मी बुद्धाकडे वळले. म्हटलं हा काय म्हणतो ते पाहूया. पण हाताला काहीच लागेना. बुद्ध भिक्षूंची आणि भिक्षुणींची चरित्रं तपासली तर तिथे सगळं स्खलनच दिसलं. आता ज्यांना आपण उच्च स्तरावरचं समजतो त्यांची ही दशा, तर जे समाजाच्या अगदी अगदी खालच्या स्तरावर आहेत, त्यांची जीवनपद्धती, संस्कार वगैरे तपासूया ह्या कारणासाठी मी आदिवासींकडे वळले. त्यांनी मला परमसंतोष दिला.

लहानपणापासूनचं माझं स्वप्न आहे, की आगगाडीने सैबेरियाचा, उत्तर आशियाखंडाचा वगैरे मस्तपैकी प्रवास करायचा. उद्देश काहीही नाही. केवळ ती भूमी डोळ्यांनी पहायची. मला भूगोलाचे शिक्षक विचारायचे, की तुला एका परदेशात वस्ती करायला सांगितली तर तू कुठं करशील ? मी सांगायची, Temperate Forest Zone मध्ये. म्हणजे अमेरिकेच्या जंगलात. मेरू पर्वत प्रत्यक्ष फिरून पहावा असं मला फार वाटायचं लहानपणी.

माझ्या आत्येला एक प्रश्न फार सतवायचा. ती विचारायची, ' आपण हे चांगलं

म्हणून करतो आहोत खरं, पण देवाला ते चांगलं वाटेल ना ?'

मी सबंध आयुष्यात नोकरी अशी फक्त दोन वर्षं पुण्याच्या गोखले संशोधन संस्थेतच काय ती केली. बाकी कुठेही केली नाही आणि पूर्वी कॉलेजं होती तरी कुठे ?

पोटभर खाल्ल्यापिल्ल्याचा आनंद दुसऱ्या कशातही नाही.

मला अतिशय गाढ झोप लागते. उशीला मान टेकली रे टेकली की ब्रह्मानंदी टाळी. ह्या झोपेच्या शक्तीमुळे मी आजारीपण दूर ठेवू शकले.

मला भिकाऱ्यांच्या रांगेत उभं राहायचं नाही. एका माणसाच्या पोटाचा असा काय मोठासा प्रश्न आहे ? बोलून चालून मी बाईमाणूस ! कुठेही स्वयंपाक करून पोट भरेन. पण ढोंग, असत्य आपल्याला नको बुवा.

आमच्या घरी आजोबांच्या वेळेपासूनची अगदी ओतप्रत पुस्तकं होती. लागेल तेवढं वाचा. हे वाच, ते वाचू नकोस, असं आमच्या घरात कुणीही कुणालाही सांगितलं नाही. मनाला येईल ते रगड वाच असा आमच्या घरचा खाक्या होता. दुसऱ्यावर दडपण आणणंच नाही. जो तो ज्याचा त्याचा मुख्त्यार होता. माझ्या वडिलांनी आम्हा सर्वच भावंडांना पूर्ण मुभा देऊन ठेवली होती. मी शिकावं की न शिकावं, काय व्हावं, माझं लग्न कुणाबरोबर व्हावं, वगैरे बाबतीत त्यानी आमच्यावर पूर्ण विश्वास टाकून पूर्ण स्वातंत्र्य दिलं होत. म्हणायचे, काय वाटेल तें करा. पण प्रतारणा करू नका. त्यांच्याविरुद्ध मत प्रदर्शित करायची आम्हाला पूर्ण मुभा होती. त्याबद्दल ते आम्हाला फैलावर घेत नसत. सत्याला सोडू नका असं त्याचं म्हणणं असे.

माझी आई मात्र साधी गृहिणी होती. भरतकाम, शिवणकाम वगैरे घरगुती हस्तव्यवसायांबद्दल तिला फार जिव्हाळा होता.

आमचं सारं घरच स्वातंत्र्यचळवळीत होतं. स्वदेशीचं व्रत सख्त होतं. पण मी प्रत्यक्ष तुरुंगात वगैरे गेले नाही कारण घरातली आजारपणं आणि अडचणी.

मी शाळेत जात होते तेव्हाची गोष्ट. आमच्या आतेने आम्हा दोघा बहिणींना प्रत्येकी दोनदोन रुपये पाकीटखर्चाला द्यायचं ठरवलं. आम्हाला इतका काही आनंद झाला, की विचारायची सोय नाही ! आपल्या हातात दोन अख्खे रुपये येणार ! मात्र हातावर दोन रुपये पडल्यानंतर त्याचं काय करावं कळेना. पुस्तकं घ्यायची म्हटलं तर घरात लागतील तितकी पुस्तकं होतीच. खाऊ खायचा म्हटला तरी घरात खाण्याच्या पदार्थांची रेलचेल होतीच. कपड्यांचा प्रश्नच नव्हता, कारण घरात स्वदेशीचं वातावरण. मग त्या दोन रुपयांचं करायचं काय ? मोठा प्रश्न पडला. मग आम्ही दोघींनी एक एक रुपया भिकाऱ्याला दिला. पुढे प्रश्न पडला की उरलेल्या रुपयाचं काय करायचं ? त्याचं उत्तर मिळायच्या आत पुढल्या महिन्याचे दोन रुपये हातावर पडले. त्यामुळे नवा प्रश्न निर्माण झाला, की आता तीन

रुपयांचं काय कराचं ? छे ! आम्हाला खर्चाच्या वाटाच दिसेनात. शेवटी आतेचे पैसे तिचे तिला परत करून टाकले तेव्हा सुटलो.

ह्यांची काय थोबाडं लागल्यायत आदिवासी समाजाची सुधारणा करायची ! जो तो समाज ज्याच्या त्याच्या संचिताने जगत असतो.

अस्सल विनोद करतो तमाशातला सोंगाड्या. हजरजबाबीपणाला तोड नाही. आपला पांढरपेशी, पुस्तकी विनोद केवळ निःसत्त्व आहे; तुम्हाला मस्त विनोद ऐकायचा आहे ? तर तमाशाच्या फडात जा.

भुताटकीने भारलेल्या घरात मुद्दाम राहायला जायचं आणि ती घरं नांदती करायची हा माझ्या वडिलांना एक छंदच होता. ताडदेवमधील अशी दोन घरं तरी आम्ही त्या काळात नांदती करून दिली. तसंच पुण्यातला गुप्तेवाडा आम्ही नांदता करून दिला. मालक त्यानंतर तिथे राहू लागले !

All This And Heaven Too ही कादंबरी मला सर्वांत जास्त आवडली.

त्यावेळच्या मध्यप्रदेशातल्या आदिवासी लोकांच्या जीवनाचा प्रत्यक्ष अभ्यास करण्यासाठी मी नर्मदेच्या परिसरात तीन वर्षं हिंडत होते. महानदीच्या परिसरातही बरीच हिंडले. चाळीस साली तिथे मला जंगली सुरणाचा कांदा कापल्याचं निमित्त होऊन विषबाधा झाली. तिथपासून माझ्या जीवनक्रमाला वेगळी कलाटणी मिळाली. माझं सारं आयुष्य इतक्या चमत्कारिक अनुभवांनी भरलेलं आहे, की पुसता सोय नाही. जे मी सहजासहजी करू शकले असते, त्यातली एकही गोष्ट माझ्या आयुष्यात घडली नाही. खरं म्हणजे मी डॉक्टरीणच व्हायची, कारण आम्ही दोघी बहिणी शास्त्राच्या विद्यार्थिनी. पदार्थविज्ञान आणि रसायनशास्त्र ह्यात माझा नेहमी पहिला नंबर असे. गणितातही माझी उत्तम प्रगती होती. पण डॉक्टरकी आमच्या घरात कुणालाच लाभली नाही. माझं संस्कृत चांगलं म्हणून झेवियर्स कॉलेजच्या फादर झिमरमनने मला संस्कृतच्या अभ्यासासाठी मुद्दाम माझ्या वडिलांकडून मागून घेतली. मी म्हटलं, अरे, संस्कृत तर संस्कृत ! वडिलही म्हणाले, की हुशार माणूस कुठेही प्रकाश पाडेल, तू बेशक संस्कृत घे. म्हणून मी संस्कृतकडे वळले.

'साभार परत 'चा अनुभव मला तसा नाहीच. फक्त दोन अपवाद आहेत: 'रूपरंग 'मध्ये संग्रहित असलेली 'गंगा ' ही माझी कथा अश्लील आहे असं सांगून 'स्त्री ' मासिकाने छापायची नाकारलं. तसंच टिळकांच्या विरुद्ध सूर आहे म्हणून माझा एक लेख एकदा 'केसरी 'ने परत केला. बाकी मी जे जे लिहिलं ते प्रकाशित होत गेलं.

प्रतीत होत असलेलं सत्य आणि सौंदर्य बेडरपणे व्यक्त करणं आणि तसं करताना कायदेकानू वगैरे आडवे येत असतील, तर ते मोडणं हीच लेखकाची कमिटमेंट. आणि हे सारं करताना त्याने स्वतःच्या लाभाचा विचार करता कामा नये. स्वार्थ नसला, की शान येते.

मी जमेल तितक नवीन लेखकांचं लेखन वाचीत असते. नवीनांबद्दल मला मूळचाच उमाळा आहे. भाऊ पाध्ये आपल्याला आवडतो; आपण तो वाचतो.

साहित्य संमेलनांच्या अध्यक्षपदाची उमेद मला विलकुल नाही.

डॉ. केतकर हा एक विलक्षण मनुष्य होता. जिथे तो बरोबर आहे असं वाटतं, तिथे तो चुकलेला असतो नि जिथे तो चुकलेला आहे असं वाटतं, तिथे तो नेमका बरोबर असतो! शिवाय डॉ. केतकर तुम्हाला सतत विचार करायला लावतात. त्यांनी एक विचार मांडला, की त्याच्या पलीकडे दुसरा विचार डोकवायला लागतो. डॉ. केतकरांचा आशावाद फारच जाज्वल्य. डॉ. केतकर म्हणाले तेच बरोबर आहे, की लैंगिक लेखन अश्लिल नसतं. दुसऱ्याला निष्कारण शिव्यांगाळी करणारं लेखन हेच खरं अश्लील असतं. त्याचा फार वाईट परिणाम होत असतो.

मी पहाटे उठते. पाणी भरते. चहा पिते. कैरवारी करते. मग सकाळी एक चक्कर टाकून येते बाजारातून. मग कुकरवर भात करते. जेवते. पोळी-भाजी बांधून घेते. सगळा दिवस एशियाटिक सोसायटीत -लेखनात, वाचनात, गप्पात घालवते. दुपारची कधीही झोपत नाही. रात्री जेवण. मग लवकर झोपते. मला झोप फार लौकर येते. माझं सर्व लिखाण सोसायटीच्या ग्रंथालयातच होतं. माणसानं ग्रंथालयात बसावं. त्याच्यासारखं सुख नाही. दिवसाकाठी आपल्या निदान दोन तरी नव्या ओळी वाचून होतातच.

चीनमध्ये काय चाललंय पत्ता लागत नाही. पण कष्टाळू चिनी लोक स्वत:चा उत्कर्ष साधत आहेत हे नक्की. त्यांना अमेरिकेने मोटारींचा कारखाना देऊ केला. ते म्हणाले, आम्हाला मोटारींचा कारखाना नको, सायकलींचा कारखाना द्या. अमेरिकेने तो दिला नाही. ह्या घटनेत अनेक अर्थ आहेत. चिनी लोकांना स्वत:ची गरज काय आहे ते नेमकं कळलं आहे.

मी उभ्या आयुष्यात जर खरोखरीच कुठला काळ enjoy केला असेल तर हे सध्याचं म्हातारपण! म्हातारपण मला भयंकर आवडतं. कारण तुम्ही आता कुणाशीही मिसळू शकता. शिवाय, अनायासे लोकही तुमच्याकडे लक्ष देत नाहीत. आपल्या मनाला येईल त्याप्रमाणे आपण वावरू शकतो. लौकीक वगैरे गेला खड्डयात! पण हे म्हातारपण खरंच किती छान आहे. अगदी निर्वेधपणे जगता येतं. वरं आता आपल्या गरजाही अनायासे कमी झाल्या आहेत.

दुवळ्यांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध सर्वांनी उभं राहिलं पाहिजे, तरच सामाजिक न्यायाची प्रतिष्ठापना होईल. आपल्या समाजात दुवळ्यांवर, स्त्रियांवर नि विशेषत: लहान मुलांवर भयानक जुलूम होत आहे. त्याच्याशी मुकाबला केलाच पाहिजे

सध्या मी क्लॉईड स्ट्राऊसमध्ये पूर्णपणे गढून गेले आहे. स्ट्राऊस हा एक वंडखोर फ्रेंच मानववंश शास्त्रज्ञ आहे. त्याचं वय सहासष्ट वर्षांचं असावं. तो पॅरिसमध्ये

पृष्ठ ४५ वर

नलिनी अंबाडे

# बिन-शीर्षकाचा लेख !

देहू आळंदीला तुम्ही गेलेले असाल. निदान पंढपुरास तरी ! विटेवरी उभा, कटेवरी हात असे सुंदर ते ध्यान पहावे. भक्तिभावाने नम्र मस्तकाने मागणे मागावे, यथाशक्ती पूजा बांधावी, नाहीतर फक्त हात जोडावेत. प्रदक्षिणा घालून, घरी परतेपर्यंत तुमच्यापैकी किती जणांच्या मनात आले, की " हे देऊळ बांधले कुणी ?" —त्या देवळात त्या बांधणाऱ्याचा पुतळा, भिंतीवर एखादे निदान चित्र, काहीही नाही. ताजमहालाच्या सुंदर वास्तूमध्ये त्या बिचाऱ्या शहाजहानाची मूर्ती नाही. अजंठ्याच्या अनेक चित्रांमध्ये, चित्रकाराचेच चित्र नाही. वेरुळचे कैलास लेणे केवढे प्रचंड ! नाना प्रकारच्या अठरापगड मूर्तीमध्ये, त्या शिल्पकाराने स्वतःचा पुतळा बसविला असता तर ? वरील सर्वांच्याच रांगेत आमच्या तंजावूरचा " राज राज चोळन् " जाऊन बसला तर !

इतिहासामध्ये, दक्षिणेतील चौल घराण्याचे साम्राज्याबद्दल वाचल्याचं आठवत असेलच. त्यांच्यापैकी राज राज चौल याने तंजावूर येथे असेच एक देवालय बांधले, 'चौल'चे तमीळ रूप " च्योळन् " असे झाले. शिल्पकलेचा तो एक नमुना तर आहेच आहे, पण दक्षिणेत सहसा न आढळणारी प्राचीन चित्रकलाही ह्या वास्तूत आहे. जाड तटबंदीच्या आतून जी चोरवाट आहे, तिच्या भिंतीवर शिलालेख व चित्रे असल्याचे सांगतात. त्याकाळी पहारेकऱ्यांना गस्त घालण्यासाठी ती वाट असावी. आज जरी दारांना कुलुपे ठोकलेली असली, तरी इतिहास संशोधकांनी खास परवानगी घेऊन ती चित्रे पहाता येतात. एवढ्या मोठ्या वास्तूत स्वतःचाही एक मोठ्ठा पुतळा बसवला असता तर त्याला कोण अडवणार होतं ?

वास्तविक पुतळ्यांवर मद्रास शहराचं फार प्रेम बरं ! जिवंतपणीच सार्वजनिक पुतळे बसविण्याचा मान आमचाच—म्हणजे मद्रासचाच, मौंट रोडच्या पहिल्याच चौकात कामराजांचा पुतळा दिसेल. पुढच्याच राऊंड-ठाना चौकात अण्णादुराईंचा पुतळा दिसेल. ते हयात असतानाच तो उभारला गेला अन् वर्षांच्या आतच ते स्वर्गवासी झाले. त्यामुळेच की काय ह्या प्रथेला पूर्ण विराम बसला. तसे 'जागतिक—

तमीळ परिषदेच्या' वेळी चिक्कार पुतळे बसवले गेले. गावागावातील चौकात गांधीजींचे पुतळे आज 'उकिरडावस्थेत' आहेत. नवनव्या 'अण्णां'च्या पुतळ्याची त्यात भरच पडते आहे–अर्थात दोघांचीही निगा वर्षभर चिमण्या-कावळेच घेतात.

ह्या 'पुतळे प्रेमामधूनच' सन १९६९ मध्ये, राजराज चोळन्चा पुतळा उभारण्याकरिता १५,००० रुपये मंजूर होऊन एक समिती स्थापली गेली. श्री. कुनराकुडी अडिगळ हे अध्यक्ष होते. पुतळा बनविण्यास सुरुवात झाली तोच पहिला प्रश्न उद्भवला तो हा, की राजराजास दाढी-मिशा होत्या की नव्हत्या ? जुन्या दस्तऐवजात दोन्ही प्रकारची चित्रे होती. खुद्द देवळाच्या चोरभिंतीवरील एका चित्रात मात्र मिशा नाहीत. समितीतच वाद माजला. 'दाढीमिशीवाले' विरुद्ध 'गुळगुळीत'वाले ! शेवटी सुवर्णमध्य साधला. पहिल्या गटाच्या समाधानासाठी पुतळ्याला मिशाच फक्त ठेवल्या. दुसऱ्या गटासाठी पुतळ्याची दाढी गुळगुळीत केली. हां हां म्हणता १९७० च्या मध्यावर पुतळा तयार झाला.

पुतळा तयार झाला अन् त्याबरोबरच दुसरा वादही ! हा पुतळा बसवायचा कुठे ? समितीने सोईस्कर विचार केला. पुतळा जर आत बसविला तर त्याची साफसफाई, देखभाल, रक्षण इत्यादी सगळी कामे पुराणवस्तुसंशोधन खात्याच्या गळ्यात पडतील. पण ते लोकही काही कमी नव्हते. त्यांनी 'एनशंट मॉन्युमेंटस अ‍ॅण्ड अर्कालॉजिकल साईट अ‍ॅण्ड रिमेन्स अ‍ॅक्ट'मधील एक कलम दाखवून परवानगी नाकारली. शिवाय राजघराण्याचे परंपरागत वंशजच सध्याच्या देवस्थान पंचकमिटीमध्ये आहेत व त्यांच्याशी अर्कालॉजिकल खात्याने एक करार केलाय, त्यामधेही अशा नव्या पुतळ्यांबद्दल काहीही उल्लेख नाही. झाले ! तेवढ्यातच 'स्टेट अटॉनॉमीची' भाषा एकीकडे सुरू झाली अन् बघता बघता ह्या वादास विनाकारणच केंद्र-विरुद्ध-राज्य असा रंग दिला गेला. पत्रव्यवहार मार्च ७२ पर्यंत चालला – तोवर तो बिचारा राजराज चोळन्, अंगावर फडके गुंडाळून – तोंड झाकून – उद्घाटनाची वाट पहात उभा होता.

निवडणुकांमध्ये 'इंदिरा लाटेत' सर्व विरोधी पक्ष भुईसपाट होण्यास आणि राज्यसरकारला शेवटचे फायनल 'नाही' सांगितले जाण्यास जणू योगायोगाने एकच वेळ आली. राजराजचोळन्चा 'अंधारवास' संपला. कालच्या तेरा एप्रिलला तमीळ पंचांगानुसार नववर्ष दिनी – गोरज शुभमुहूर्तावर – मुख्यमंत्र्यांच्या हस्ते राजराजचोळन्ने पहिला प्रकाश पाहिला. पुतळ्याची जागा अर्थातच देवळाचे दाराबाहेर जवळच, मिरासदार रोड व बिगटेंपल रोड चौकात आहे. उद्घाटनाच्या अध्यक्षीय भाषणात, माननीय शिक्षणमंत्री श्री. नेंडुजेडियन म्हणाले, 'ज्या राजाने ही वास्तू बांधली त्याचा पुतळा आज, त्याच्याच वास्तूच्या आत नव्हे, तर दाराबाहेर बसवावा लागत आहे ही खेदाची गोष्ट आहे. आम्हालासुद्धा पुराणवस्तूंची काळजी आहे म्हटलं ! तेव्हा त्या त्या वास्तूंची काळजी, त्या त्या राज्यांचे हाती

सोपविण्याने काहीही बिघडणार नाही.'

आपल्या उद्घाटनाच्या भाषणात मुख्यमंत्र्यांनी असे पुतळे बनविण्याची आवश्यकता व त्यापासून फायदे प्रतिपादन केले. नव्या पिढीला समजेल, की राज राज चोळन् हा पराक्रमी राजा होऊन गेला...आणि हेदेखील समजेल, की केंद्र-सरकारच्या अर्कीऑलॉजिकल खात्याने परवानगी नाकारली म्हणून हा पुतळा बाहेर बसविला जात आहे...कारण हा मजकूरदेखील पुतळ्याखाली कोरलेला आहे (!) स्वायत्ततेसाठी आंदोलनाची आवश्यकता नाही. कारण इंदिराबाई समजुतदार आहेत, असेही त्यांनी सांगितले.

मी विचार करू लागले, तो पंढरीचा देऊळ बांधणारा विठ्ठलभक्त जो कुणी अमरपदावर स्वर्गात असेल, तो काय म्हणेल बरं? 'देऊळ बांधणारा मी कोण? कर्ताकरविता तो परमेश्वर, मी निमित्तमात्र. तुम्ही देवाला फुले वहाता, मग काय प्रत्येक फुलावर नाव लिहिता? तसेच माझ्या शक्तीनुसार मी हे वास्तुरूपी फूल देवाला वाहिले आहे.' खरंच, ताजमहालात शहाजहानचा पुतळा नाही, तरीही त्याचे नाव निघतेच. हे एकीकडे अन् दुसरीकडे आपण 'उकिरडावस्थे'तील पुतळे पहातो. त्या व्यक्ती काय थोर नव्हत्या? नवी राजवट जुन्या राजवटीचे पुतळे उखडते हे आपण इतिहासात का वाचतो? पुतळ्याने व्यक्ती अमर होते, की तिच्या कार्याने? पुतळ्यांची नंतर हेळसांड म्हणजे व्यक्तीचा अपमानच...

माझ्याच विचारात मी इतकी गुंगले, की ऑफिसमधून 'हे' संध्याकाळी कधी परतले तेही समजले नाही मला. माझ्या पाठीमागे उभे राहून त्यांनी मजकूर वाचला असावा. ते म्हणाले—

'सरकारवर काही टीका वगैरे करू नकोस हं.'

'टीका नाही, पण सद्सद्विवेकबुद्धीला...'

'पुरे! पुरे!! आजचा पेपर बघितला नाहीस वाटतं!' त्यांनी बोलता बोलता वर्तमानपत्र उघडून वाचायला सुरुवात केली. 'मद्रास दिनांक २२ एप्रिल ७२. इंडियन पीनल कोड ५०० व ५०१ अन्वये, तमीळनाडू सरकारने, चार वर्तमानपत्रे व सहा व्यक्तींवर दावा लावला. तीन दैनिके मद्रासची व एक मुंबईचे 'ब्लिझ' इंग्रजी साप्ताहिक. ६ व्यक्तींपैकी, एक माजी मुख्यमंत्री श्री. भक्तवत्सलम्, दुसरे आर. के. करंजिया, तिसरे...'

वास्तविक मला खूप काही लिहावयाचं होतं. पण नकळतच तसाच अर्धवट लेख —शीर्षकाशिवायच—कधी पाकिटात बंद केला, ते माझं मलाच समजलं नाही! आता 'माणूस'वाले तसंच विन-शीर्षकाचं छापतात, की काय कोण जाणे?

□ □ □

महाड येथे भरणाऱ्या कोकण परिषदेच्या निमित्ताने

# उपेक्षित कोकण

विजय वैद्य

रत्नागिरीपासून कोल्हापूर फारतर ऐंशीएक मैल असेल, पण तेथे धुरळा उडवत जाणाऱ्या मोटर सायकल्स, जीप्स आणि इतर तशीच अनेक सुबत्तेची लक्षणे दर्शविणाऱ्या गोष्टी सतत दृष्टीस पडतात. सह्याद्री ओलांडून पायथ्याशी येताच वेगळे दृश्य. दारिद्र्य व अविकसितपणाच्या खुणा पावलोपावली आढळतात.

कोकण आज अनेक वर्षे उपेक्षित राहिलेला आहे. महाराष्ट्राची राजधानी असलेली मुंबापुरी भौगोलिकदृष्टया कोकणाचा भाग आहे. मुंबईच्या वैभवात कोकणाचा वाटा सिंहाचा आहे. मुंबईचा वीज, पाणी व मनुष्यबळाचा पुरवठा कोकणातून होत असतो. या प्रदेशाची बुद्धिमत्ता व मनुष्यबळ मुंबईच्या विकासासाठी खर्च झाली आहे. पण कोकण प्रांत कशावर जगतो, तर मुंबईहून जाणाऱ्या 'मनीऑर्डर्स'वर. रत्नागिरी व कुलाबा या दोन जिल्ह्यात अनुक्रमे सुमारे ५० व २६ लक्ष रुपये दरमहा मुंबईहून मनीऑर्डरच्या रूपाने जातात. कोकणाची अर्थव्यवस्था यावरच अवलंबून आहे.

कोकणच्या विकासाची तळमळ असलेली अनेक माणसे आहेत. कै. बॅ. नाथ पै यांनी तर कोकण विकासाचा ध्यासच घेतला होता. कै. डॉ. धनंजयराव गाडगीळ, डॉ. चिंतामणराव देशमुख यांनीही कोकणच्या प्रश्नात आस्थापूर्वक लक्ष घातले.

हृदयविकाराचे दुखणे बळावले असतानाही बॅ. नाथ पै यांनी मुंबईतील कोकण परिषदेत आस्थेने भाग घेतला. येत्या २९ व ३० एप्रिल रोजी महाड येथे कोकण विकास परिषद भरत आहे.

गेल्या काही वर्षांत कोकण विकास परिषदांतून कोकणचे प्रश्न व मागण्या लोकांपुढे आणण्याचे बरेच प्रयत्न झाले पण यावेळी ठराविक कालमर्यादा घालून लढ्याचा कार्यक्रम हाती घेतला जाईल. एवढेच नव्हे, तर विदर्भाप्रमाणे 'सागरी प्रांत संघर्ष समिती' स्थापून पुढील धोरणेही ठरविली जातील अशी चिन्हे दिसत आहेत.

कोकण विकासाचा विचार करता असे दिसते, की सरकार आणि कोकणी जनता दोन्हीही अजून जागे झालेले नाहीत. कोकणचे अनेक प्रश्न आहेत. कोकणची उपेक्षा चालू आहे. कोकणचे क्षेत्रफळ महाराष्ट्राच्या ९॥ टक्के आहे, तर लोकसंख्या

सुमारे ११॥ टक्के आहे. महाराष्ट्रापेक्षाही कोकणची दर चौरस मैलातील लोकसंख्या अधिक आहे.

## निराशवृत्ती

कोकणचा माणूस आळशी आहे असे म्हटले जाते. पण हे तितकेसे बरोबर नाही. तो बारा ते चौदा तास शेतात राबतो. इतरही उद्योग असाच घाम गाळून करीत असतो. गेली अनेक वर्षे तो दारिद्र्यात, रोगराईत खितपत पडला आहे. म्हणूनच शक्तिहीन, चिडखोर, अश्रद्ध झाला आहे. अपार कष्ट करायचे आणि तरीही चतकोर भाकरीची विवंचना, मग ते कष्ट उपसायचे तरी कशाला ? अशी एक प्रकारची निराशवृत्ती त्याच्या ठाई निर्माण झाली आहे. याची बरीचशी जबाबदारी शासनावर व शासनकर्त्यांवरच पडते. कोकणच्या लोकप्रतिनिधींनीही त्यांची कोकण विकासाबाबतची जबाबदारी योग्यप्रकारे पार पाडली असे दिसत नाही. ठाणे ते रत्नागिरी (कोकणचाच भाग असलेल्या मुंबईचाही यात समावेश करायला हरकत नाही) एवढ्या कोकणपट्टीतील आमदारांनी एकसंध होऊन कोकणी प्रश्नांचा अभ्यास करून, कोकण विकासाची मागणी सातत्याने विधान सभेत मांडली असती तरीही बरेच काही साध्य झाले असते, पण दुर्दैवाने तसे झाले काहीच नाही.

गुजरातपासूनच्या किनारपट्टीचाच विचार करायचा झाला तर असे दिसते, की गुजरातचे सुरत व बलसाड जिल्हे व महाराष्ट्रातील ठाणे जिल्हा, या भागातून पश्चिम व मध्य रेल्वेचे फाटे गेल्याने त्या भागांचे औद्योगीकरण फारच झपाट्याने झाले. तेथील सामान्य जनतेचे रहाणीमानही बरेच सुधारले. एक गोष्ट मात्र खरी, की ठाण्याचा औद्योगिक पट्टा सोडला तर उंबरगाव, जव्हार, तळासरी आदी भाग अजूनही अत्यंत मागासलेलेच आहेत. तेथील काही ठिकाणी तर एस. टी. बसची सोयही नाही. वीसवीस मैल चालत यावे लागते.

ठाणे ते मंगळूर एवढ्या किनारपट्टीपैकी कोकणचा जास्तीत जास्त ' विकास ' कोणत्या बाबतीत झाला असेल तर तो दिवाबत्ती (वीज) आणि शैक्षणिक बाबतीतच. शिक्षणाच्या बाबतीत जनतेचेच प्रयत्न सरकारी प्रयत्नांपेक्षा अधिक झाले. याचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे, कोकण एज्युकेशन सोसायटी आदींसारख्या संस्थांनी साऱ्या कोकणभर शाळांचे जाळे पसरवून शालांत परीक्षेपर्यंतची सोय उपलब्ध करून दिली, हा आहे.

तेव्हा रेल्वेमार्गावरील भाग सोडल्यास उरलेला कुलाबा व रत्नागिरी जिल्हा पूर्णपणे मागासलेला आहे.

विदर्भ मराठवाड्याच्या व कोकणच्या मागासलेपणात फारच फरक आहे. हे भाग औद्योगिक क्रांतीपासून दूर राहिले याचे कारण मराठवाडा हा अनेक शतके परकीय राजसत्तेच्या अमलाखाली होता तर मध्यभारताचा भाग म्हणून विदर्भ महाराष्ट्रापासून दूर होता. यामुळेच औद्योगीकरणाचे वारे तेथपर्यंत पोचू शकले

नाहीत. कोकणचे तसे नाही. पश्चिम महाराष्ट्र व कोकण हे अनेक शतके एकत्रच होते. असे असूनही आणि विशेषतः महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर संपूर्ण पश्चिम महाराष्ट्राचाच काय तो कायापालट होऊ शकला. याचे कारण शासनकर्ते कऱ्हाड, सातारा, पाटणचे होते म्हणूनच अशी एक भावना कोकणी माणसाच्या मनात येते. यासंबंधी असाही दाखला देण्यात येतो, की कोयना भूकंपाच्या वेळीसुद्धा जास्तीत जास्त व अधिक त्वरेने मदत दिली गेली ती पाटण भागाला. औद्योगीकरण व हरितक्रांतीच्या नौबती वाजल्या त्या पश्चिम महाराष्ट्रात. सह्यगिरीच्या तळ-कोकणाने त्या फक्त ऐकल्या. अर्थातच याचा संपूर्ण दोष राज्यकर्त्यांना तरी कसा द्यायचा. लोकप्रतिनिधी व खुद्द कोकणी लोक यांनीही आपली जबाबदारी ओळखून काम केले नाही हेही तितकेच खरे आहे.

कोकणावर निसर्गाचा वरदहस्त आहे. पण कोकणी माणूस समुद्राकडे तोंड फिरवून सह्याद्रीकडे नुसता पहात बसला आहे. भौगोलिक परिस्थितीचा पुरेपूर फायदा उपटण्याची दृष्टी त्याच्याकडे आलेली नाही. गुजरातच्या किनारपट्टीतील कच्छ कोकणपेक्षा निश्चितच सुपीक नाही. पण कच्छी माणसाने व्यापार उदीम दर्यावर्दीपणा व शेतीत नाव कमावले.

रेगिस्थानमधील मारवाडी व कोकणी चाकरमाने सर्वसाधारणपणे एकाच परि-स्थितीत घर सोडतात पण आसपासच्या परिस्थितीचा फायदा अत्यंत परिश्रमपूर्वक कसा करून घ्यायचा हे माहीत असलेला मारवाडी एकाच पिढीत (आणि पेढीत) आपली आर्थिक परिस्थिती आमूलाग्र बदलून टाकतो. तर कोकणी चाकरमान्याचे पिढ्यान् पिढ्याचे दारिद्र्याचे रडगाणे चालू असते. दिवसेंदिवस कोकणची लोक-संख्याही कमी कमी होत चालली आहे. त्यातही जी बहुसंख्य माणसे तेथे आहेत ती म्हणजे म्हातारी, कोतारी, आजारी, स्त्रिया व मुले हीच होत. २० ते ५५ वयो-गटातील माणसे त्या मानाने फारच कमी आहेत. त्यांच्यापैकी बहुतेक नोकरी-धंद्यानिमित्त शहरांकडे जाणारी आहेत. त्यामुळे कोकणात असलेली ही वस्ती आर्थिकदृष्ट्या अनुत्पादकच समजली जाते. कोकणातील शाळा कॉलेजातून शिकव-णारे बहुसंख्य शिक्षकही आजकाल पश्चिम महाराष्ट्रातून येतात. तर जातीयतेचे राजकारण, गावच्या उठाठेवी यात रमल्यामुळे कामाचा आळस करणारेही तेथे बरेच असल्याने कोकणात बऱ्याच प्रमाणात कष्टाळू केरळीय कामगारही आता दिसू लागले आहेत.

मुंबईचे आकर्षण हे तसे अखिल भारतीयच आहे, मग ते जवळच्या कोकणी माणसाला का नसावे ? पण यामुळेच कोकणचा विकास खिळणार आहे.

गेल्या १५० वर्षापेक्षा जुन्या असलेल्या गिरणी व्यवसायात, त्यात कौशल्य प्राप्त केलेला कोकणी मजूर बहुसंख्येने आहे. पण हा व्यवसाय फक्त मुंबईतच वैभवास चढला. कापड उत्पादनासाठी आवश्यक असणारे दमट हवामान व बाजारपेठेसाठी

जवळ असलेले ठिकाण म्हणजे कुलाबा व रत्नागिरी. तेथे जर गिरण्या निघाल्या वा यंत्रमाग चालले तर हा व्यवसाय तेथेही जोरात चालू शकेल आणि अनेक स्थानिक लोकांना त्याचा फारच मोठा उपयोग होईल. उपजीविकेचे साधन लाभेल. आणि मुंबईवरचा लोकसंख्येचा ताणही थोडा कमी होऊ शकेल. सरकारी वा सहकारी पातळीवर असे प्रयत्न व्हायला हरकत नाहीत, शेतीबरोबरच पूरक व्यवसाय म्हणून कुक्कुटपालन व वराह योजना, दुग्धव्यवसाय, मधुमक्षिकापालन या व्यवसायांकरवीही कोकणची अर्थव्यवस्था सुधारता येईल.

कोकण विकासाच्या दृष्टीने तीन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. रस्ता, रेल व जल वाहतुकीच्या बाबतीत कोकणची अवस्था भयानकच आहे. कोकणातील आंतर-रस्त्यांची वाढ व्हायला पाहिजे, त्यात सुधारणा व्हायला पाहिजेत. सागरी वहातूकही आजच्यापेक्षा अधिक सुधारायला पाहिजे. शेती व बागायतीच्या उत्पादनातही असलेल्या सर्व संधींचा फायदा घेऊन शक्य तितक्या लवकर वाढ करणे आवश्यक आहे व तिसरे म्हणजे कोकणातच सर्वत्र लहान मोठे उद्योगधंदे सुरू व्हायला पाहिजेत.

डोंगरपायथ्यापासून बंदरापर्यंत येणाऱ्या रस्त्यांचे जाळे झाले, तर वाहतुकीच्या सोई वाढण्यात त्याचे रूपांतर होईल. धक्क्यास बोटी लागतील अशा बंदरांचाही विकास यात समाविष्ट असला पाहिजे. असलेली बंदरे गाळामुळे निरुपयोगी झाली आहेत. अनेक वर्षे याविरुद्ध आरडाओरड चालली आहे. पण गाळ काढणारे ड्रेचर्स अलीकडे पाठविण्याची व्यवस्था झाली. मिऱ्या बंदर बारमाही करण्याची योजना तत्वतः मान्य झाली ती १९५८ साली. त्यावेळी योजनेचा खर्च २ कोटीच्या घरात होता. पण त्याबाबतही निव्वळ चालढकल चालू आहे. आज हा खर्च १० कोटी-पेक्षाही वाढला आहे. एवढेही करून १९७६ पर्यंतसुद्धा हे काम पूर्ण होणार नाही. याचा अर्थ योजनेचा खर्च अजूनही वाढणार आहे.

सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ कै. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी असे म्हटले होते, की पाच लाख लोकवस्तीपेक्षा अधिक लोकवस्तीची शहरे भयानक परिस्थिती निर्माण करतील. असे असतानाही सरकार जुळ्या मुंबईवर पैसा ओतणार आहे. त्याऐवजी मुंबईपासून जवळ असलेल्या कोकणातील दाभोळ या बंदरांचा सर्वंकष विकास करायचे ठरविले, तर ते अधिक चांगले होईल. कोकणाच्या विकासावर व औद्योगीकरणावर भरच दिला गेलेला नाही. कोकण रेल्वेची मागणी अनेक वर्षे होत आहे.

श्री. स. का. पाटील हे कोकणी गृहस्थ रेल्वेमंत्री होते. पण त्यांनी हवी तशी या योजनेला आस्था दाखविली नाही. सत्तास्थान टिकविण्याचेच त्यांनी प्रयत्न केले. कोकण रेल्वे मान्य झाली आहे पण ती फार खर्चिक आहे–प्रत्येक किलोमीटर मागे १५ हजार खर्च म्हणजे जवळ जवळ १०० कोटींची ही योजना अजूनही धूळ खातच

पडली आहे. अत्यंत खर्चिक म्हणून या योजनेत कोकण रेल्वेला छाट देण्यात आली आहे. रेल्वे मंत्रालयाचे म्हणणे आहे, की माल व प्रवासी योग्य प्रमाणात मिळणार नसल्याने कोकण रेल्वे तोटचात जाईल. पण आजच्या आराखड्याप्रमाणे हा मार्गच मुळी चुकीचा आहे. मग योजना तोटचात जाणार नाही तर काय ?

रस्ता वाहतुकीचेही हेच. ठाणे, कुलाबा व रत्नागिरी या कोकणच्या जिल्ह्यांतून एस. टी. ला सर्वात अधिक पैसा मिळतो पण त्यामानाने या जिल्ह्यांवर एस. टी. करीत असलेला खर्च फारच कमी आहे.

एस. टी. चा एक डेपो सुरू झाला, की निदान शंभर लोकांना तरी रोजगार मिळतो. पण याही बाबतीत एस. टी. उदासीन दिसते. (कर्जत व पोलादपूर येथे डेपो व्हावेत अशी लोकांची एस्. टी. कडे मागणी आहे.)

मासळी, नारळ, आंबे, कोकंब कोकणात विपुल प्रमाणात उपलब्ध आहे. आंबा तर कॅश क्रॉप आहे पण वाहतूकी आभावी हे सारं सडून जात आहे.

मुंबईत रुपयाला चार फार तर आठ या प्रमाणात मिळणारी कोकणची मासळी बांगडा, वेंगुर्ला मालवणकडे रुपयाला १५० या प्रमाणात मिळते. मुंबई विसराच पण ८० मैलांवरील कोल्हापूरकडेही तो वाहतुकीअभावी जाऊ शकत नाही. कोकणात शीतगृहांची सोयच नाही.

गेल्या वर्षी खुद्द रत्नागिरीतून १॥ कोटी रुपयांची लाल कोळंबीची निर्यात झाली पण शीतगृहे असती तर अपेक्षा अधिक कोळंबी निर्यात करता आली असती.

पिण्याकरिता, शेतीबागायत व उद्योगांकरिता पाण्याची नेहमीच गरज असते. पण सुमारे १०० इंच पाऊस दरसाल कोकणात पडत असूनही जमिनीचा उतार व थोड्या वेळात पुष्कळ पाऊस पडत असल्याने जमिनीत न मुरता ते पाणी वाहून जाते. भूगर्भातील काळचा फत्तरामुळे झरेही फार कमी लागतात. त्यामुळे विहिरींनाही वर्षभर पुरेसे पाणी नसते. म्हणजे भरपूर पाऊस पडूनही पाण्याबाबत दुर्भिक्ष हीच अवस्था. छोटी-छोटी मातीची धरणे व छोटे-छोटे जलाशय बांधणे आणि उताराचा फायदा घेऊन उताराने (ग्रॅव्हिटीने) पाणी पुरविणे सहज शक्य आहे.

शेती व बागायतीच्या दृष्टीने हे उपयुक्त ठरेल. एवढेच नव्हे तर दालचिनी, लवंग, वेलदोडे व जायफळांसारख्या अत्यंत महाग झालेल्या मसाल्यांच्या पदार्थांचेही कोकणात भरपूर उत्पन्न काढता येईल.

भौगोलिक परिस्थिती, हवामान, निसर्गरम्यता, फळफळावळ, फुले यांच्या मुबलकतेमुळे या परिस्थितीशी बरेच साम्य असल्याने अमेरिकेच्या पश्चिम किनारपट्टीतील कॅलिफोर्नियाची उपमा कोकणला दिली जाते.

आंबा, चिक्कू, फणस, काजू, अननस, कलिंगड अशी अनेक फळे कोकणात होतात पण त्यांच्या वाढीकडे दुर्लक्षच केलं गेलं आहे. यात लक्ष घातले गेले तर आपली गरज भागवून त्यांची निर्यात करून परकीय चलन प्राप्त करून घेता येईल. काजूवर

प्रक्रिया करणारे किती कारखाने कोकणात आहेत ?

पश्चिम किनारपट्टीतील केरळने अगदी खऱ्या अर्थाने नारळाच्या झाडाला कल्पवृक्ष बनविले आहे. एरवी कवडीमोल असलेल्या नारळाच्या करवंट्यांचे अॅश ट्रे, छोटेछोटे मद्यपान चषक, एक ना दोन अनेक वस्तू तेथे बनवल्या जातात. परदेशी प्रवासी मोठ्या हौशीने वाटेल त्या किमतीत या वस्तू खरेदी करतात. कोकणात त्यांचा जास्तीत जास्त उपयोग मशेरी भाजायला वा पाणी काढायची ढवळी करण्याकरिता केला जातो. नारळाच्या काथ्याचे सुंदर गालीचेही तयार करणे शक्य आहे. यातून कुटिरोद्योग व हस्तकलांना वाव मिळू शकेल.

आता रबराची झाडेही कोकणात मूळ धरू लागली आहेत. एवढेच नव्हे तर गोवा व केरळपेक्षा कोकणची भूमी रबर उत्पादनाला अधिक चांगली आहे असे जमिनीच्या पृथक्करणात दिसून आले. कोकणात हजारो एकर डोंगर उघडे पडले आहेत. तेथे रबराची लागवड केली तर काहीतरी वेगळेच चित्र तेथे दिसेल पण याबाबत भारत सरकारच्या ' रबर बोर्ड 'कडून उपेक्षा चालू आहे.

कुलाबा जिल्हा भाताचे आगर आहे. सधन भातशेती-योजनेचा लाभ त्या जिल्ह्याला करून दिला पाहिजे. या दृष्टीने दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिक्षणात बदल करून शेती, दुग्धव्यवसाय, कुक्कुट पालन आदींच्या शिक्षणावर भर देण्यात आल्यास आज खर्डेखाशीसाठी शहरांकडे धाव घेणारा कोकणी तरुण कोकणातच स्थिरावून कोकणाच्या विकासात सहभागी होऊ शकेल.

महाराष्ट्रात सर्वांत अधिक बेकारी कोकणात आहे. औद्योगीकरणावर आता भर दिला गेलाच पाहिजे. कोकणात बॉक्साइट, अभ्रक व इतर अनेक खनिजांचे मुबलक साठे आहेत, पण त्यांची सविस्तर पहाणी झालेली नाही. दुसरे म्हणजे रेल्वे नाही म्हणून कारखानदारी नाही व तिसरे कारण म्हणजे कोयनेच्या विजेचा जास्तीत जास्त फायदा मुंबई, कराड, साताराला होतो. कोकणात विजेचे युनिट महागच आहे. उद्योगांना ते परवडणारे नाही. ही परिस्थिती बदलली पाहिजे.

९० कोटी रुपयांच्या बॅकलॉगचे घोंगडे भिजतच पडले आहे. वर्धा, यवतमाळ, चांदा, परभणी वगैरे महाराष्ट्रातील सहा जिल्हे शासनाने मागासलेले म्हणून जाहीर केले पण कोकणच्या एकाही जिल्ह्याचा त्यात समावेश नाही. कोकण पूर्ण विकसित आहे असे शासनाला वाटते काय ? आता कोकण विकासाची चळवळ कोकणातच व्हायला हवी. सारावंदी, तगाइबंदी हे सारे तेथेच व्हायला पाहिजे.

नानासाहेब कुंटे डॉ. पुणेकर, डॉ. मंडलिक, अॅड. विचारे, डॉ. आजगावकर, श्री. बी. आर. हारले, श्री. सरमळकर, श्री. मोहन केळुसकर आदी अनेक कार्यकर्ते कोकण विकासासाठी आस्थेने कार्य करीत आहेत. महाड परिषदेच्या निमित्ताने तरी कोकण विकासाचे पाऊल इष्ट दिशेनें पडेल, अशी अपेक्षा बाळगावी काय ?

□ □ □




## सौ. निर्मला पुरंदरे

## दोन

शैक्षणिक वातावरणात दिवस असे चालले असताना घरी फ्रेंच कौटुंबिक जीवनाशी ओळखही अधिकाधिक होत होती. रोज रात्री उशीरापर्यंत ज्याँ, जेनव्हिएव्ह, त्यांचे स्नेही वगैरेंशी गप्पा चालत असत. त्यांतूनच एकदा आपल्याकडील जेवण करायचा बूट निघाला. आली का पंचाईत ? हो म्हटलं न् काय !

एका सकाळी जेनव्हिएव्हबरोबर बाजारात गेले. ज्या ज्या ओळखीच्या वस्तू दिसतील त्या घेतल्या. मोहरी, हळद सोडून सगळे मिळाले. १५–१६ लोक जेवायला होते. कसं काय जमेल ही मला धास्ती. घरातले सर्वजण आपापल्यापरीनं मदतीला लागले होते. महाराष्ट्रीय जेवण मिळणार, जमिनीवरचं जेवण, उदबत्त्या, साड्या नेसणं वगैरेंच्या कल्पनेनं ल्यक, कॅथरीन, ओदिल वगैरे नाचत होते.

रांगोळीची पिराळी बहुतेक विसरली पुण्यालाच. मग फुलांच्या रांगोळ्या काढल्या. जेनव्हिएव्हपासून ते कॅथरीनपर्यंत तमाम स्त्रीवर्ग साड्या नेसून तयार. चुपचाप ज्याँ, मिशेल वरच्या खोलीत जाऊन पायजमे शर्ट घालून आले. पण तुला सांगते, जन्मात प्रथमच मांड्या मोडून जमिनीवर बसतानाची त्यांची तारांबळ पहाँघत नसे हं मला. किती हौशीनं सर्व प्रथा समजावून घेत होते. माझ्या वर्ष-भराच्या वास्तव्यात निरनिराळ्या गावांमध्ये अनेकदा हे प्रसंग घडले. अशा दिवशी आमच्या घरातलं वातावरण आपल्याकडच्या लग्नघरासारखं असायचं. लगबग, धावपळ, पळापळ.

फ्रान्समधील लग्न बघण्याचा अनुभवही याच घरात मिळाला. श्री. वेव्हालोंची मुलगी फ्रॉन्स्वॉज एका हॉस्पिटलमध्ये नर्स आहे. तिनं पसंत केलेला तिचा भावी पती ज्याँ-ह्यूग महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून फ्रेंच सरकारच्या सक्तीच्या दोन वर्षांच्या लष्करी शिक्षणाच्या हाकेची वाट पहातो आहे. जाण्याआधी लग्न करायचं ठरलं. नवीन फ्लॅट घेतलाय त्यांनी. सर्वजण पाहून आलो. जय्यत तयारी झालीय. भावी आयुष्याचे कितीतरी बेत उभयता रचत असणार नाही का ?

लांबची अंतरं, महागडा प्रवास, सुट्ट्यांचा प्रश्न व आपल्यापेक्षा वेगळी कुटुंब-पद्धती यांमुळे लग्नसमारंभ हे सुटसुटीतपणानंच होतात. पाहुण्यांची वर्दळ, समा-रंभाची फार अगोदरपासून तयारी ह्या गोष्टी आता या समाजात पहायला मिळत नाहीत. भावी वधु-वर आपल्या-आपल्यातच दंग. त्यांची नव्या संसाराच्या उभा-रणीची तयारी चालू असते. लग्नसमारंभाच्या दिवशीच्या मेजवानीचं कॉन्ट्रॅक्ट दिलेलं असतं. त्यामुळे घोळ नाही. मानपानाची, रुसवाफुगवीची, देण्याघेण्याची मुळी बातच नसते. कोणाच्या कोणाकडून अपेक्षाच नाहीत.

फ्रान्स्वॉजच्या लग्नाच्या दिवशी सकाळी घरची सर्व मंडळी कोर्टात रजिस्ट्रेशन-साठी गेलो. सर्वांच्या साक्षीनं वधुवरांनी कोर्टानं सांगितलेली शपथ उच्चारली. वधूचा पोवाख साधाच होता. मोजकाच असलेला हा विधी लवकरच संपला. घरी आलो. जेवणासाठी फक्त घरचीच माणसं. दुपारी फुलं-पानांनी घरात आम्ही सर्वांनी सजावट केली. नंतर साडेतीनला चर्चमध्ये धार्मिक विधीसाठी गेलो. यावेळी सर्व परिचितांना निमंत्रण असते. फ्रॉन्स्वॉजनं वधूचा विशिष्ट पांढरा शुभ्र नायलॉनचा पोषाख घातला होता. शपथविधी पार पडल्यावर सर्व उपस्थितांनी सदिच्छा व्यक्त केल्या व हा कार्यक्रम संपला.

सायंकाळच्या पार्टीला खास निमंत्रित लोक. खाणं, पिणं, नृत्याच्या तालात रात्र-भर वऱ्हाडी जागे होते. मी रात्री दोनपर्यंत थांबले. नंतर मी माझ्या खोलीत जाऊन झोपले. सकाळी खाली आले तेव्हा जसं काही घरी काही झालंच नाही, इतकी आवरासावर झाली होती. ज्याँह्यूग–फ्रॉन्स्वॉज ही जोडी मधुचंद्राला निघून गेली होती. पाहिलंस, कुठं आपल्याकडचं लग्न व कुठं इकडचं लग्न. अवास्तव खर्च, ऋण

काढून सण करायची पद्धत, हुंडा वगैरे त्रासदायक पद्धतींना फाटा दिला, की उभयपक्षी किती निष्काळजी मोकळेपणा लाभतो. व्याही-व्याही बरोबरीच्या नात्यानं वावरताना पाहून बरं वाटलं. ज्याँ-जेनेव्हिएव्हना वाटणारं आपल्या लेक–जावयाचं कौतुक मूलतः आपल्याकडील मुलीच्या आईवडिलांसारखंच वाटलं.

लग्नसमारंभ संपल्यावर काही दिवसांनंतर ह्या प्रेमळ व अगत्यशील कुटुंबाचा सहवास सोडून ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे श्री. मिशेल व सौ. फ्रॉन्स्वॉज द्रुअँ यांच्या घरी महिन्याभरासाठी गेले. दोघंही अगदी तरुण. लहान लहान तीन मुलं यांना आहेत. खूप श्रीमंत बरं का. घर तर असं सुरेख. किंचितसं उंच, टेकडीवर असल्यासारखं. दोघंही स्वभावानं आनंदी. तुला माहीतच आहे, की फ्रान्समध्ये आल्यापासून मी मांसाहार घेत असे. सर्व वास्तव्य कुटुंबांमध्ये असल्यामुळे, त्यांच्या दैनंदिन कार्यक्रमात माझ्या नियमांमुळे अडथळा व्हायला नको म्हणून मी हा निर्णय घेतला होता. किती सोयीचं झालं म्हणून सांगू ? "हिला आता नेमकं करू तरी काय ?" हा घरधनिणीला वाटणारा धाकच संपला. मी माझा हट्ट ठेवला असता तर त्यांनी निश्चितच मार्ग काढला असता. पण त्यांना तेवढा तरी त्रास का द्यायचा, या विचारानं मी ही अडचणच दूर केली.

सांगत काय होते, की जरी मी टेबलावर तयार असलेलं अन्न खात होते तरी तयार होताना, होण्याआधीची चिरफाड पहायची माझ्या मनाची तयारी झाली नव्हती. मिशेलला हे माहीत होतं. एका रविवारी ही स्वारी गेली शिकारीला. रात्री आले ससा मारून. मला काहीच माहिती नाही. सकाळी माझ्या खोलीतून बाहेर येऊन न्याहरीसाठी स्वैपाकघरात प्रवेश करते तों दाराच्या मागून हातांत तंगड्या धरलेला ससा घेऊन ही स्वारी पुढे आली. नंतर कानांवर हात ठेवून किंचाळच्या, हंशा, मुलांच्या टाळ्या पिटणं वगैरे वगैरे. त्यांच्या कुटुंबातला मुक्काम संपवून तिसऱ्या घरी जायच्या दिवशी दाणदाण पाय आपटीत इकडून तिकडे जाताना महाराज म्हणतात, 'हा असला जाण्याचा दिवस मला आवडत नाही.'

तिसरं घर छोटसं. एका भल्या मोठ्या इमारतीत आठव्या मजल्यावर, छोटयाशा ब्लॉकमध्ये रहाणारं. माझ्यापेक्षाही वयाने मिशेल लहान चुणचुणीत आणि हसतमुख. तिचे यजमान ज्याँक्लोद रेव्हरवरी हे आठवडाभर पॅरिसमध्ये नोकरी निमित्त रहात आणि शनिवारी बेझाँसोला घरी येत. यांना दोन छोटया मुली. लग्न होऊन ७–८ वर्षंच झाली असावीत. दर शनिवारी न चुकता मिशेल स्टेशनवर घ्यायला जायची. एकमेकांवर खूप असलेलं जोडपं पाहून बरं वाटत असे. लहान लहान मुली असल्यामुळे तूर्त तरी मिशेल बाहेर फारशी जात नसे. परंतु नंतर इंग्रजी शिकणं किंवा कुठं अल्पवेळचं काम करण्याचं म्हणत होती. तिच्या घरच्या मुक्कामाच्या काळात मी जवळजवळ बरीच बाहेरच असे. बेझाँसोचं वास्तव्य संपवून मी एका परिषदेसाठी पॅरिसला जाणार होते. तेव्हा जेवणाची

निमंत्रणं, कुणा मैत्रिणीबरोबर चित्रपट पहायला जाणं, वर्गातल्या स्नेह्यांबरोबर सहलीला जाणं यामध्ये वेळ कसा भराभर सरकत होता बघ. जागरणं, सतत फ्रेंच-मधून ऐकणं, नवनवीन माणसं पहाणं यामुळे मनाची त्रेधा उडत होती.

हो, चित्रपटावरून आठवण झाली. माझ्या मैत्रिणींबरोबर नग्न बेट या जपानी चित्रपटास गेले होते. नुकतंच मला वाटतं या चित्रपटावर मी कुठंतरी परीक्षण वाचलं आहे. एका रुक्ष अशा बेटावर, एक जपानी जोडपं आपल्या मुलासह रहातं. जीवनावश्यक गोष्टींसाठीही अतिशय हाल सोसावे लागणाऱ्या या कुटुंबाची ही कथा. विशेष असा की संपूर्ण १॥ तासाच्या चित्रपटात एक अक्षरही संभाषण नाही. कुठं अवास्तव हावभाव नाहीत, गाणी नाहीत, नाच नाहीत, श्रीमंती नाही, भपकेबाज दृश्यं नाहीत आणि या शिवायही चित्रपटाच्या अखेर, पतीचा निर्विकार कष्टाळूपणा, पुत्राच्या मृत्यूमुळे पत्नीच्या मनाचा झालेला कुचंबित आक्रांत पाहून डोळ्यांना पाणी आणण्याचं सामर्थ्य आलं आहे या चित्रपटाला. जपानी माणसाचा जिद्दी स्वभाव दाखवण्याची पराकाष्ठाच जणू कलाकार, दिग्दर्शक, छायाचित्रकार, पार्श्व-संगीतकार यांनी केली आहे. तुला नक्की आवडला असता.

बोल बोल म्हणता १० आठवडे उलटले. खूप पत्र लिहीत होते माझ्या स्नेह्या-नातलगांना सर्वांची पत्रं येऊन वरचेवर खुशाली कळत होती. फ्रान्समधील निर-निराळ्या गावांमधील मित्र-मैत्रिणींची पत्रं येत असत. फोन येत असत. माझा वेळ चांगला जावा यासाठी कोण खटपट त्यांची. राहून राहून मला फार आठवण होते बघ बारीक सारीक गोष्टींची.

तुला माहीतच असेल माझ्या वर्षभराच्या कार्यक्रमात फ्रेंच शिकणं, सामाजिक संस्थांचं काम पहाणं, कुटुंबजीवनाची ओळख करून घेणं, येथील आमच्या संस्थां-संबंधी तेथील संबंधिताशी बोलणं वगैरेची आखणी केली होती. मी तेथे गेल्यावर माझ्या हाती हा छापील कार्यक्रम पडला. पूर्व-पश्चिम-दक्षिण-उत्तर असा भरपूर प्रवास होणार होता. पैकी बेझाँसोचा मोठा, २॥ महिन्यांचा मुक्काम संपला होता आता. भाषा शिक्षण व नवीन जीवनक्रमाची ओळख करून घेण्यात इतरत्र भेटी वगैरे फार जमलंच नाही. याच मुक्कामात जिनिव्हाला गेले होते. फ्रान्स मित्र मंडळाच्या कामानिमित्त जिनिव्हाला काही सहकार्य मिळेल का पहायला मी व ज्याँ बेव्हालो गेलो होतो. जिनिव्हाची भेट अगदी धावतपळत होती. पण तेवढ्यातल्या तेवढ्यात जाँ यांनी मला भरपूर हिंडवलं. सृष्टिसौंदर्याच्या सारखेपणामुळे काश्मीरची आठवण आली. युरोपमधलं हे धनाढ्य शहर, हवेसाठी धनिक लोकांची या शहरी वर्दळ असते. यूनोची इमारत, रेड क्रॉसची इमारत, वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनची (WHO) इमारत वगैरे जागतिक संघटनांच्या कचेऱ्या इथंच आहेत.

पुण्याचे श्री. व सौ. संत नोकरीनिमित्त जिनिव्हाला राहतात. त्यांचं अगत्याचं वागणं पाहून ज्याँ फार खुष झाले. बेझाँसोपासून जिनिव्हा हे अगदी जवळ आहे. पुणे

मित्र मंडळाच्या संबंधात श्री. संताशी ज्यांचं बोलणं झालं. सायंकाळी घरी परतलो.

अभ्यासक्रम १० जुलैला संपला. या शेवटच्या चार-पांच दिवसांत इतकी गडबड उडून गेली होती माझी की विचारू नकोस. २–४ संस्था धावतपळत पहायला गेले होते. अर्धवेळ काम करून आपापली शिक्षणं घेणाऱ्या मुलींचं वसतिगृह पाहिलं. सुमारे ४५ मुली होत्या बरं का. आम्ही सर्वजण बरोबरच जेवायला बसलो. मुलींनी खूप प्रश्न विचारले. कपाळाला जो रंग लावला आहे तो तुम्ही तेथे कायमचा कोरला आहात का? साडीसाठी किती पिना लावाव्या लागतात? साडी नेसायला खूप वेळ लागत असेल नाही? वगैरे. वगैरे.

या सरबत्तीला तोंड देऊन नंतर वसतिगृह पाहायला गेलो. नेहमीचीच स्वच्छता, टापटीप जिकडेतिकडे दिसत होती. मुलींच्या खोल्यामधून आपापल्या आवडत्या नट-नटचांचे फोटो भिंतींना लावलेले पाहिले. आणि एक गोष्ट सांगितली तर तुला आश्चर्यच वाटेल. अनेक मुलींच्या पलंगावर लहान-मोठ्या बाहुल्या पाहून मला नवल वाटलं. माझ्या मैत्रिणीला मी कारण विचारलं. या १६।१७ वर्षांच्या पुढील वयाच्या मुलींना बाहुल्या कशा काय लागतात हे मला समजेना. मी आठवून आठवून आपल्याकडील मुलींमध्ये कोणी आठवते का पाहिलं. पण नाही बाबा.

सहज मन विचार करू लागलं हे असं का! वाटलं, या मुलींना घरी आईवडिलांचं, प्रेम पुरेसं मिळालं नसेल का? कुठल्या तरी आंतरिक ओढीनं ही आवड निर्माण झाली असेल का? त्या बाहुल्यांना आंजारून गोंजारून वागवणं, आपल्या कुशीत झोपवणं हे या वयात कसं काय हवंहवसं वाटत असेल? मला खरच मोठं कुतुहल वाटलं. पुण्याला आमच्या मुलींच्या वसतिगृहात काही थाय मुली रहात असत. त्यांपैकी एकीजवळची बाहुली पाहून अशाच आमच्या मुली कुतुहलानं कलकलल्या होत्या.

यानंतर अनाथ व कुमार्गी मुलांची एक संस्था पाहिली. वय वर्षे १४ ते २० पर्यंतची मुलं बरं का. सरकार आर्थिक जबाबदारी आपल्याकडच्यापेक्षा फार मोठ्या प्रमाणात उचलतं. तरी पण ती मदत पुरेशी नसतेच. हे अनाथालय सुरेख परिसरात आहे. अद्यावत् इमारती. आगापिछा नसलेली ही मुलं, मुलांच्या विचित्र, अवघड वागण्यामुळे त्यांना संभाळणं असह्य झाल्यामुळे पालकांनी या संस्थेत त्यांना आणून सोडलेलं, वगैरे प्रकारची ही मुलं संभाळून घेणं हे तेथील व्यवस्थापकांची परीक्षा घेणारंच नाही का? डॉक्टर्स, मानशास्त्रज्ञांच्या सहकार्यानं या मुलांना समाजात वावरण्याची सवय करण्याचे प्रयत्न होतात. शिक्षण, कामधंदा मिळवून दिला जातो. त्यांच्या मनोरंजनासाठी तळघरात, वाचनालय, ध्वनिमुद्रिकांचा संग्रह, वाद्यं, बोटिंगची सोय असतेच. या संस्थेचे मुख्य व्यवस्थापक सहकुटुंब याच परिसरात रहातात. त्यांना बरेवाईट अनुभव येत असतातच. माधुरीने काढलेली चित्र मी वेझांसोत पाहिलेल्या बहुतेक सर्व संस्थांमध्ये दिली.

एक लक्षात आलं बघ. अनेक मुलामुलींना आपल्या शिक्षणासाठी काम करूनच पैसे मिळवावे लागतात. एका स्त्रियांच्या संस्थेत फक्त मुलींना अर्धवेळची कामं मिळवून दिली जातात. कोणाकडे शुश्रुषा करणं घर संभाळणं, मुलं संभाळणं, बाजारहाट करून देणं, वाचना-लेखनासाठी मदत करणं, घरकाम करणं, अशा स्वरूपाची कामं या संस्थांकडे नोंद केली जातात. मुलींच्या सोयीच्या वेळा बघून त्यांना ती सोपवली जातात. यात तासावर दर ठरवलेला असतो.

कुणाकडून काही फुकट न घेण्याची वृत्ती सर्रास दिसून येते. सहज गंमत आठवली यावरून. एके दिवशी मधल्या सुटीत आमच्या कॉलेजच्या व्हाईस प्रिन्सिपॉल बाईंचा निरोप आला. मधल्या पटांगणात त्या उभ्याच होत्या. म्हणाल्या, ' माझ्या एका मैत्रिणीला साडी नेसायला शिकायचं आहे. तुम्हाला वेळ आहे का ?' एक तारीख ठरवली. माझ्या मधल्या सुटीच्या वेळात त्या बाई आपली साडी वगैरे घेऊन आल्या. समोरच्या तळघरातल्या कॅफेत एका अडगळीच्या खोलीत जाऊन हा साडी नेसवण्याचा कार्यक्रम झाला. आरशात बघून बघून त्या इतक्या स्वत:वरच खूष झाल्या होत्या की बस्स. माझे आभार मानून जायला निघाल्या न् तेवढ्यात माझ्या हातात एक सेंटची बाटली ठेवली. म्हणाल्या, ' माझी आठवण म्हणून ठेवा. ' काय बोलणार आता ?

या अशा कार्यक्रमांच्या गर्दीत, अनेक वर्षांनी आयुष्यात परत आलेला हा विद्यार्थी-जीवनाचा तात्पुरता अनुभव संपला. आंतरराष्ट्रीय वातावरणातील शिक्षणाचा हा अनुभव दीर्घकाळ मनात रहाणार आहे. पण तुला एक सांगते हं. या वातावरणात आम्हा सर्वांनाच फ्रान्समध्ये, म्हणजेच आपापल्या देशांपासून दूर आल्यामुळे, परक्या देशात आल्यामुळे एकमेकांबद्दल जिव्हाळा वाटे. अडीअडचणीला मदत करायला प्रत्येकजण तयार असे. सर्वजण तितक्याच उत्सुकतेनं, काळजीनं आपापल्या देशातील हितसंबंधियांच्या पत्रांची खुशालीची वाट पहात असे. हे वातावरण तात्पुरतं आहे. असली विचित्र अलिप्तपणाची भावनाही बहुतेकांच्या मनात असावी. तरीमुद्धा शिक्षण संपल्यावर प्रत्येकजण कुठल्या कुठं जाणार आहे. पुन्हा कसची भेट होणार ? अनेकांनी कॉलेजचाच पत्ता दिला होता. सकाळी ९॥ चं टपाल आलं, की दर-म्यानच्या १० मिनिटांच्या सुटीत आमच्या प्रोफेसरच स्वत: जाऊन पत्रं घेऊन यायच्या. वर्गात येऊन वाटायच्या. ज्याला पत्रं मिळायचं त्याचा चेहरा फुलून यायचा. नायजेरियाचे श्री. दापा हे १–२ दिवस नाराज दिसत होते. कॉलेज सुरू व्हायच्या आधी खिशात हात घालून दारात उभे होते. वर्गामध्ये त्यांची जागा माझ्या समोरच असायची. मी त्यांना म्हटलं, ' गेले काही दिवस तुम्ही नाराज का दिसताय ?' म्हणाले, ' माझ्या देशात युद्ध चाललंय. बरेच दिवसांत घरचं पत्र नाही. काळजीत आहे खरा. ' त्यांच्याच शेजारी बसणारे, मेडिकलच्या अभ्यास-क्रमासाठी आलेले सीरियन विद्यार्थी श्री. मावाझिनी सीरियातही युद्ध चाललंच

होतं. मध्यपूर्वेतील हालचाली फ्रेंच वृत्तपत्रांमध्यें जास्त सविस्तरपणे येत असतात.

आमच्या मधल्या सुट्टीत एक दिवस मी एकटीच कॉलेज समोरच्या तळघरात कॅफेत कुणालासं पत्र लिहीत बसले होते. माझी फ्रेंच मैत्रिण मोनिक तिचा तास संपवून तिथे येणार होती. एवढ्यात श्री. मावाझिनी समोर येऊन बसले. एरवी अगदी हंसतमुख, चेष्टेखोर असलेला हा गृहस्थ आज चांगलाच गप्पगप्प दिसत होता. म्हटलं काहीतरी गडबड दिसते आहे. मी कॉफीचे दोन कप घेऊन आले. कॉफी घेताघेता त्यांना त्यांच्या काळजीचं कारण विचारलं. खिशातून एक पत्र काढून मला ते दाखवत म्हणाले, ' माझ्या घरून आज पत्र आलं. माझा जानी दोस्त लढाईत मारला गेला आहे. ' उद्वेगानं ते पुढं म्हणाले, ' मला समजतच नाही. जर असं फटकन एका बंदुकीच्या गोळीनं आयुष्य संपायचंच असेल, तर हे शिक्षण घेऊन जिवाचा आटापिटा करून आम्ही काय करायचंय ? सीरियात मी परत जाईन तेव्हा मलाही सक्तीच्या लष्करी शिक्षणासाठी दोन वर्षं द्यावीच लागणार आहेत. माझंही भविष्य कदाचित एक बंदुकीची गोळी हेच असेल तर..."

श्री. मावाझी यांनीच का, पण अशा लक्षावधींना हा प्रश्न युरोप-अमेरिकेत त्रस्त करीत आहे. सक्तीच्या लष्करी शिक्षणाला तरुण वर्ग विरोध करतो आहे. राष्ट्राच्या अर्थसंकल्पाचा केवढा तरी मोठा भाग या लष्करी शिक्षणासाठी खर्ची पडतो आहे, हे त्यांना मान्य नाही. अमेरिकेतील युद्धविरोधी मोठमोठाली निदर्शने तूही वाचतोच आहेस. तीच भावना मला फ्रान्स, जर्मनीमध्ये आढळली. दोन महायुद्धांच्या उलघालीनंतर हे सहजच नाही कां ?

अनेक आठवणींनी भरलेला हा १० आठवड्यांचा शिक्षणक्रम चांगल्या प्रकारे संपवून जुलै १० ला मी माझ्या मैत्रिणीवरोबर पॅरिसमध्यें आले. ही माझी मैत्रिण मारी-फ्रान्स्वॉज रेव्हियाल १९६७ व ६९ मध्ये आमच्या फ्रान्स मित्रमंडळातर्फे पुण्याला आली होती. फ्रान्समधील माझा मुक्काम चांगला व्हावा यासाठी ज्या अनेकांची धडपड, काळजी मला लाभली त्यात ही मारी फ्रान्स्वॉज. अतिशय गोड, लाघवी, सौम्य असं हिचं व्यक्तिमत्त्व. भारतावर फार प्रेम. साडी, सैलसर अंबाडा, त्यात सुरेखसं फूल, कुंकू, बांगड्या वगैरेंसह सजली की अगदी बेलाशक म्हणावंसं की ही कुणी श्रीखंडे, आपटे, कान्हेरे, थत्ते असावी. तिच्या मैत्रिणी हल्लीच्या तिथल्या फॅशनप्रमाणे केस काप असं तिला सांगतात. तेव्हा म्हणते, ' केव्हातरी मी भारतात परत जाईन. मग हे कापलेले केस साडीवर चांगले नाही हं दिसणार. म्हणून वाढू देते झालं. ' प्रवृत्तीनं धार्मिक, अत्यंत प्रेमळ आहे ही. सतत काही ना काही उद्योगात असते. सध्या लियों (Lyon) या गावी लॅबोरेटरीमध्ये आरोग्यशाखेत संशोधनाचे काम करते. अनेक संस्थामधील कामांमध्यें सक्रीय भाग घेते. भारदस्त विचार आहेत. हौशी तर इतकी आहे म्हणतोस. घर अगदी सुरेख सजवलं आहे. मी तिच्यावरोबर खूप प्रवास केला. अनेक प्रसिद्ध ठिकाणं पाहिली. ड्रायव्हिंग करताना काही ना काही माहिती सांगायची. कधी दोघी जमतील ती गाणी म्हणत असू. भारतात असताना तिनं अनेकदा ' मोगरा फुलला ' हे गाणं एकलं असावं.

स्वत: या ओळीनं सुरुवात करून मला ती पुढं चालू करायला सांगायची.

मारी फ्रॉन्स्वॉज लियोंमध्ये चार खोल्यांचा एक ब्लॉक घेवून रहाते. नैला नावाची एक लेबानीझ गोड मुलगी आणि मारी-जो नावाची एक फ्रेंच मुलगी या पार्टनर्स म्हणून तिच्याकडे रहातात. तिचे आई वडील फ्रान्सच्या पश्चिमेला दूर या गावी रहातात. सुटयांमध्ये ही तिकडे जाते. तुला कदाचित ऐकून नवल वाटेल, की ही तरुण, रूपवान मुलगी एवढया दूर एकटी कशी काय रहाते ? पण अशा अनेक मुली शिक्षण पूर्ण झालं, मिळवत्या झाल्या, की स्वतंत्र रहाणं पत्करतात. ज्यांना इच्छा असेल त्यांना आपलं आवडीचं ध्येय गाठणं यामुळं सुलभ होतं असं त्यांचं म्हणणं. ' लग्न करायलाच पाहिजे, लग्न झालं म्हणजे इतिकर्तव्यता ' हे म्हणण्याचे दिवस तिकडे केव्हाच संपले आहेत. आता या मुली स्वत:चं जीवन स्वत:च समर्थपणानं आखू शकतात. लग्न करून, हे मिळत असणारं स्वातंत्र्य गमवायला सहजासहजी त्या तयार नसतात. मारी फ्रॉन्स्वॉजचंही तेच म्हणणं. खूप मित्र-मैत्रिणी आहेत तिला. आपल्या आर्जवी स्वभावामुळे अगदी लोकप्रिय आहेत बाईसाहेब.

तिच्याबरोबर मी पॅरिसला गेले, ती एका ५ दिवसांच्या परिषदेसाठी. नव-जीवन (Vie-Nouvelle) नावाची एक संघटना फ्रान्समध्ये २५ वर्षांपूर्वी स्थापन झाली. जीवनाचा, माणसा-माणसांतील संबंधाचा विचार करावा, एकमेकांचे अनुभव पडताळून घ्यावेत अशी सभासदांकडून संस्थेची अपेक्षा. त्याचाच भाग म्हणून अविकसित राष्ट्रांमधील प्रश्नांवर उपाययोजना व मदतकार्य या संघटनेमार्फत चालतात. विशेषत: आफ्रिकेमधील फ्रेंचांच्या माजी वसाहतीमध्ये अनेक लोक प्रत्यक्ष काम करायला जातात. शिक्षण, शेती उद्योगधंदे यांमधील जाणकार स्त्री-पुरुष या संस्थेमार्फत काही काळ मोरोक्को, अल्जिरिया, टयुनिशिया, कांगो, ओट व्होल्टा, मादागास्कर, पोर्तुगाल वगैरे ठिकाणी प्रत्यक्ष काम करणं व शिकवण्यासाठी जातात. केवळ आर्थिक मदत देऊन या मागास समाजांना आणखी पंगू करण्यापेक्षा त्यांच्यात काम करणारी माणसं तेथेच तयार करावीत हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश.

मी ज्या परिषदेला गेले ती या सर्व कार्यकर्त्यांची वार्षिक बैठक होती. सुमारे ५५ ते ६० कार्यकर्ते उपस्थित होते. आपापल्या कामांचे अहवाल, अनुभव त्यांनी सांगितले. त्यावर सतत चर्चा, विचारविनिमय चालू असे. संस्थापक श्री. अॅन्द्रे क्रुझिया व त्यांचे सहकारी यांची व्याख्यानं व मार्गदर्शन होतंच.

परिषदेच्या शेवटच्या दिवशी माझ्या जवळच्या रंगीत स्लाइडस्‌चा कार्यक्रम झाला. अनेक प्रश्नोत्तरांनी हा कार्यक्रम सर्वांच्या लक्षात राहीलसा झाला. या संस्थेचे भारतात काम नाही. अविकसित देशांच्या शाळेत भारताचा नंबर आहेच की. परंतु कदाचित फार दूर आहे व आफ्रिकेतील देशांमध्येच इतकी कामं आहेत, की त्यांना वेळच झाला नसावा असं वाटतं. मी त्यांना म्हटलं, की तुम्ही जरूर आमच्या देशात या. देश पहायला. स्वातंत्र्यानंतरचं नवं वारं अनुभवायला या.

(क्रमश:)




**भास्कर दोडे**

तारुण्याची नव्हाळी असली आणि कल्पनेच्या वारूवर स्वार होऊन उत्तुंगाकडे जाण्याचं वय असलं की जमिनीपासून खूप उंचीवर जाणाऱ्या व्यक्तीला आपली लायकी समजत नाही. बरोबरीचे असले तरी ते हलके वाटतात. अपेक्षा उंचावण्याचं वय सरलं की मग मात्र......

मी तसा वयानं मोठा नाही. म्हातारा नाही किंवा प्रौढ म्हणता येईल, असाही नाही. तरी सामाजकार्यांच्या निमित्तानं लोकांत बसण्याउठण्यामुळे माझ्यावर काही कामगिऱ्या येत. पैकी एक म्हणजे लग्न जमविणे.

संबंधातील, प्रेमाची माणसे माझ्यावर आपुलकीने जबाबदारी टाकीत. मीदेखील यथामती, यथाशक्ती ते काम पूर्णावस्थेत नेण्याच्या दृष्टीने सर्व ते प्रयत्न करी. माझ्या मध्यस्थीने दोन-पाच लग्ने जमली व दोन्हीकडची माणसे माझ्यावर खूष

झाल्याने तर याबाबत माझी उगाचाच प्रसिद्धी झाली. जन्माच्या गाठी बांधणारा परमेश्वर, आपण उगाच निमित्तमात्र, ही माझी पहिल्यापासूनची धारणा. परंतु लोक ऐकत नाहीत. आपण असं बोललो, तरी त्यांना यातही मोठा आशय दिसतो आणि आपल्यात नसलेलेही गुण चिकवटून देऊन गावभर टिमकी गाजवत फिरतात. आणि मग नको ती माणसेही ओळख नसतानासुद्धा भीड घालून लग्नसंबंध जमविण्यासाठी चकरा मारू लागले.

चांगले झाले तर ठीक, वाईट झाले की मग अपकीर्ती वाऱ्यासारखी पसरते. मध्यस्थाची इच्छा एकच असते, वधुवरांचे नीट जमावे. एकमेकांच्या गुणांना वाव देऊन अवगुणांकडे निदान थोडीफार डोळेझाक केली तर शेकडोंचे आयुष्य सुखाचे होईल, परंतु चाळीस-चाळीस वर्षे संसार करून, एकत्र रात्रंदिवस राहूनही, 'कध्धी मेला एक दिवस सुखाचा गेला असेल, तर शप्पथ...' म्हणणाऱ्या अनेक विवाहित स्त्रिया आढळतात. त्याचे रहस्य हेच, की सांभाळून घेण्याची प्रवृत्ती कमी आणि अशी दोन-चार उदाहरणे माझ्यातर्फे जुळवलेल्या लग्नसंबंधामध्ये घडल्याने मला उगाचच अपराध्यासारखे वाटू लागले. प्रत्यक्ष तोंडावर नाही, पण मागे लोक निंदा करू लागले. आणि म्हणून मी नकार न देता टोलवाटोलवी करू लागलो. हातघाईला आलेल्यांनी मग प्रचार करायला सुरुवात केली, की मी याबाबतीत अगदी निरुपयोगी आहे.

झाले ते बरेच झाले.

अनाहुतांची लग्ने जमविण्याचे बंद झाले, तरी जवळच्या नातेवाईकांनी याबद्दल सोपविलेली जबाबदारी मी टाळू शकत नव्हतो. त्यातल्या त्यात माझ्या भाचीच्या बाबतीत मी स्वतः होऊन पुढाकार घेणे आवश्यक होते. त्याप्रमाणे मी खटपटीत होतो.

वयात येण्याचं वय मोठं गोड असतं.

हळूहळू भाची वयात आली आणि सुंदर, सुस्वभावी भाचीला सुयोग्य असा पती मिळावा म्हणून मी परमेश्वराची प्रार्थना करी आणि त्याप्रमाणे शोध चालू ठेवी.

कोणत्या वर्षी लग्न करावं, हे कायद्याने ठरणार आहे म्हणतात. पण देश, कालमान, सामाजिक-आर्थिक परिस्थिती यांमुळे–कायदा केला तरी–लग्नवय भिन्नभिन्नच राहणार. शहरातील सुखवस्तू, श्रीमंत घरातील मुली पंचविशीच्या झाल्या तरी 'बेबी' पण खेड्यातली गरिबाची लेक तेराव्या वर्षीच 'घोडी' वाटू लागते. कायदा सर्वांना समपातळीवर आणू पहातो, पण याबाबतीत फार विचार केला जावा, असं मला नेहमी वाटतं.

भाची गरिबाचीच लेक होती आणि शहरातल्यामूळे सोळाव्या वर्षी तरी निदान तिचे लग्न व्हावे अशी तिच्यासकट सर्वांचीच अपेक्षा आणि इच्छा होती.

एस. एस. सी. ला नापास झाल्यानंतर ती रडली ते अजून आठवतं.

आम्ही उभयतांनी तिला खूप समजावलं, शांत केलं आणि नव्या हुरूपाने पुन्हा परीक्षेच्या अभ्यासाला सुरुवात करण्याबद्दल तिला सुचवलं. तिनेही ऐकलं. पण त्यानंतर दर सहा महिन्यांनी फॉर्म भरण्यापलीकडे काही घडेना.

तीन वर्षे ती अभ्यासाचं निव्वळ सोंग करीत होती हे सर्वांच्या लक्षात आलं. पण फार उशीरा. ती बदलली ते कळलंच नाही कुणाला.

. लग्नाचा रात्रंदिवस विचार करीत, स्वप्नात रंगत असेल.

आईवडलांजवळ मुलं मनमोकळं बोलत नाहीत. मामामामी हे एक सुखाचं निधान त्यांना वाटतं आणि म्हणून मनातल्या खोल कप्प्यातील काही गुपितं इथं सांगता येतात. आम्ही ती गोष्ट मान्य केली. स्वतः एस. एस. सी. फेल असूनही केवळ स्वतःच्या सौंदर्याच्या अवास्तव 'ग'मुळे तिने आमचे अनेक चांगले प्रस्ताव धुडकून लावले.

विचारविनिमयात एक वर्ष भुरकन उडून गेले.

आता ती पदवीधर आणि उच्च नोकरदाराकडून थोडी खाली आली होती. पण त्याबरोबरच, अपयशाचं दुःख, अपेक्षाभंगाचा मनस्ताप यामुळे एक वर्षाने ती दोन वर्षांनी म्हातारी झाल्याचं भासलं. चेहऱ्यावरचं तेज कमी पडून थोडा काळसरपणा आल्याचं वाटलं.

आहे ती वस्तुस्थिती नाकारण्यात स्वारस्य नसतं, आनंद नसतो आणि यश तर कधीच मिळत नाही. तिच्याबद्दल लग्नसंबंध ,जुळवताना मला पदोपदी हा अनुभव आला.

तिला वाटे, मी खोटंच सांगावं, की मी अकरावी पास आहे.

मला ते कधी आवडणारं नव्हतं. माणसाच्या पुढं त्याचा इतिहास जाऊन पोचतो हे मला माहीत होतं. म्हणून तिची सांपत्तिक स्थिती आणि शिक्षण याबाबत मुलांकडच्यांना खरं काय ते सांगून मी मोकळा होत असे.

तिच्या लायकीच्या मानानं वरचढ अशीच स्थळं मी आणि इतरांनी शोधली परंतु दरवेळी ती काहीतरी कमीपणा काढून स्थळ नाकारीत होती.

मी आणि इतरही याबाबतीत निराश बनू लागलो होतो.

ती अजूनही स्वप्नात गुंग होती.

भावाचे लग्न लागल्यावर तर तिने भलताच धिंगाणा सुरू केला. पदोपदी भाऊ-भावजय आणि वडलांवर रागवायची. कारण कधी असायचं, कधी नसायचं. पुढं पुढं तर चोवीस तास जणू ती भांडणाकरिता टपूनच बसलेली असायची. थोडक्यात, 'मदनवात' तिच्या अंगात संचारला होता आणि त्याचे झटके तिला एकसारखे येऊ लागले होते.

एक चांगली मुलगी वाया चालल्याचं पाहून आम्हा उभयतांना खूप दुःख होई. दोन वर्षांपूर्वी जी स्थळं तिने कमी दर्जाची म्हणून नाकारली त्या स्थळांचा विचार करायला आता ती तयार झाल्याचे बोलून दाखवू लागली. पण ती स्थळं तिच्या-

साठी थांबली नव्हती. लग्न करून संसाराला लागली होती. काहींनी तर बायकोला 'माहेरी पाठविण्या 'इतपत तयारी केल्याचे ऐकू आले होते. काळ कुणासाठी थांबत नाही तसंच माणसंही कुणाची वाट बघत नाहीत !

तिने एकदा आपली अपेक्षा बोलून दाखविली, की दीडदोनशे रुपये पगार आणि मॅट्रिकपर्यंत शिकलेला असला, तरी चालेल ! ती एकेक पायरी उतरत येथपर्यंत आलेली पाहून कालाच्या अगाध महिम्याबद्दल आश्चर्य वाटलं. त्यापेक्षाही जास्त लायकीची स्थळं आम्ही ज्या वेळी सुचविली, त्यावेळी तिने ऐकलं असतं तर ती आम्ही व इतर कितीतरी जण सुखी-समाधानी झालो असतो. पण लायकीपेक्षा अपेक्षा मोठी धरल्याने जे दुःख होतं आणि पदरी जी निराशा येते ती फार दारुण असते.

चेहऱ्यावरील तजेला तर सुकत चाललाच होता पण केस आणि स्त्रीसौंदर्याचे इतर उठावदार अवयवही आता वयस्कर वाटून त्यांच्यातील आकर्षण कमी वाटू लागले होते. आणि त्यामुळे तिने नवऱ्याबद्दलच्या स्वतःच्या अपेक्षा जरी कमी केल्या, तरी तिच्या वाढत्या वयाच्या मानाने त्यापेक्षा जास्तच वाटायच्या.

तिच्या लग्नासाठी सर्वजण खटपट करीत होतो.

इतरांवर चिडणारी ती आता हळूहळू स्वतःवरही चिडू लागली होती. जिवाचा आकांत करून भांडत होती. एखादं आटोक्यातलं स्थळ वाटावं आणि खूप खटपट करून जमण्यापर्यंत यावं आणि अचानक मुलांच्या कडून काही कारण न दर्शविता एकाएकी नकार यावा असं वरचेवर घडू लागलं. नकार आला की पाताळात गाडलो गेल्यासारखं वाटून सुन्न होऊन बसावं. पुन्हा काही आठवड्यानं, नव्या दमानं वर-संशोधन सुरू करावं असं होऊ लागलं.

आता तर निराशेमुळे तिच्यातील तार्किक विचारशक्ती नष्ट झाल्याचे दिसून येऊ लागले. ती वडलांना दोष द्यायची, 'माझं लग्न करा. का म्हणून तुम्ही टाळाटाळ करता ?' वडील आणि आम्ही सर्व तिला समजावून सांगण्याचा प्रयत्न करायचो की आजपर्यंत कशी व किती स्थळं आणली आणि तिनेच कसे दरवेळी काही तरी खुसपट काढून नकार दिले. पण तिच्या डोक्यात प्रकाश पडेना. हे ती ऐकून घ्यायलाच तयार नव्हती. याच्याही पुढे जाऊन ती म्हणायला लागली, 'मी अज्ञान होते. पण तुम्ही सगळे तर अक्कलवान होता ना ? का नाही बळजबरीनं माझं लग्न लावलं तुम्ही ?' अशा बोलण्यापुढं कोण तोंड उघडणार ?

वाजवीपेक्षा जास्त अपेक्षा तिनं बाळगल्या ही जशी तिची चूक, तशीच तिला वाजवीपेक्षा जास्त मतस्वातंत्र्य दिलं, ही आमची चूक झाली, असं यावरून वाटू लागलं. स्वातंत्र्यसुद्धा सर्वांना देऊन भागत नाही, हे लक्षात आलं. ज्याला स्वातंत्र्याची कदर आहे, महत्त्व पटलं आहे तेच स्वातंत्र्याचं चीज करून दाखवतील इतर उलट नाश पावतील. बुद्धीची, सारासार विचारशक्तीची योग्य वाढ न झालेल्यांना स्वातंत्र्य देणं म्हणजे विनाशाच्या गर्तेत लोटण्यासारखंच !

एका नाजुक कळीला न पेलणारे न समजणारे स्वातंत्र्य दिले आणि जीवनानंद लुटण्यापासून वंचित केले ही खंत मन पोखरू लागली.

पण निराश होऊन चालणार नव्हतं.

अपेक्षा कमी करीत करीत, अंगभर कपडा, रहायला दहा बाय दहाची खोली आणि दोन वेळ जेवण देऊ शकणारा जरी कुणी भेटला तरी तिला तो आता हवा होता. थोडक्यात कमाई करून खाऊ घालू शकणारा, सांभाळकर्ता म्हणून एक 'पुरुष' तिला हवा होता. हे म्हणजे फारच झालं. अत्यंत दुःखी अंतःकरणाने केवळ निरुपाय म्हणून जेव्हा तिने हा निर्णय ऐकविला, तेव्हा मला रात्रभर झोप आली नाही.

आणि शेवटी आमची वाट न पहाता, व्यक्तविलेल्या आशा-आकांक्षांशी मिळता-जुळता असा एक वर स्वतःच तिने शोधला आणि लग्नाचा निर्णय जाहीर केला.

मला स्थळ मुळीच पसंत नव्हतं. पण नकारही देववेना आणि म्हणून आम्ही दोघेही गप्पगप्प राहिलो.

तिने स्वतः मनानेच निवड केल्यावर सर्वजण हुरूपाने कामाला लागले आणि तिच्या वडलांनी त्यांच्या शक्तीप्रमाणे सर्व यथासांग लग्न लावून मीही या नात्या रूपाने आर्थिक हातभार लावला.

बहिणीचं लग्न झालं, ती गेली आणि शांतता झाली या विचाराने भाचा आणि त्याची बायको नाही म्हटलं तरी मनातून खूप खूष झाली होती. वडील निष्काळजी झाले. तरी उगाचच कधीकधी रुखरुख वाटे.

पहिल्या मुळाला वडील गेले आणि घेऊन आले. पण नवऱ्याचं कौतुक पुनःपुन्हा सांगून तिने जास्त दिवस रहायचं टाळलं.

समवयस्क मैत्रिणींनी आणि तिच्या मामीने म्हणजे माझ्या पत्नीने तिची गोड गोड थट्टा केली आणि पुढच्या वर्षापर्यंत पेढे देण्याचा पुन्हा पुन्हा आग्रह केला!

कधी नव्हतं तिच पत्र आलं.

लग्नानंतरचं तिचं पहिलंच पत्र होतं. 'त्या बातमी'च्या भरवशाने मी मोठ्या उत्सुकतेने पत्र फोडले. पण निराशा झाली.

तिने एक रात्र आम्हाला येऊन जाण्याची विनंती केली होती.

मागेपुढे न पाहता लगेच निघालो.

थट्टा करण्याची आमची आणि ऐकून घेण्याची तिची मनःस्थिती नव्हती.

रात्री जेवणं आटोपल्यावर त्या दोघी गप्पा मारत बसल्या.

मी भाचे जावयाशीं बोलत बसलो.

सकाळी जे ऐकायला मिळालं, ते भयानक होतं.

तिची जी किमान अपेक्षा होती, ती ही दुर्दैवानं पूर्ण झालेली नव्हती.

तिच्या नशिबी पुरुष होता, पण तो पुरुषात नव्हता!

□ □ □

केशव मेश्राम

पुस्तकें

# डिसेंबर आणि इतर कविता

श्री. अनिरुद्ध अनंत कुलकर्णी या नव्या कवीचा पहिलाच कवितासंग्रह, म्हणजे ' डिसेंबर आणि इतर कविता ' होय. सुरेख छपाई, आकर्षक मुखपृष्ठ आणि कवीच्या सर्वकष प्रवृत्तीचा आलेख ज्यातून अविष्कृत होण्यास मदत होईल, अशा १०४ कवितांचा ह्या संग्रहात समावेश आहे.

मराठीमध्ये खूप लिहिला जाणारा, तात्त्विकदृष्ट्या विशुद्ध वाङमयप्रकार म्हणून गौरविला जाणारा, पण व्यवहारात प्रकाशनदृष्टचा व खपाच्या बाबतीत ' रिस्की ' असलेला, कविता हा वाङ्मयप्रकार आहे. तरीसुद्धा चारसहा वर्षे वेगळाल्या मासिकांतून सातत्याने एखाद्या कवीच्या कविता वाचनात आल्या, की लवकरच या कवीच्या कवितासंग्रहास केव्हा तरी तोंड द्यावे लागणार आहे, असा रसिक अंदाज बांधू शकतो. पण श्री. कुलकर्णी यांनी तसे लेखन फार अल्प प्रसिद्ध केले आहे. आणि एकदम संग्रह घेऊनच त्यांनी बाजारात उडी मारली आहे. आजच्या बहुसंख्य नव्या कवींचे संग्रहावतरण जसे होते तसेच हे झाले आहे.

येथेच अलीकडच्या सगळ्या नव्या कवींची आणि श्री. कुलकर्णी यांची तुलना संपते. कारण कोणाही परंपरेचे पीस खोवून न घेता, आपल्याच आत्मतृप्त एककल्ली पद्धतीने ह्या कवीची कविता आकारास आलेली आढळते.

ह्या संग्रहात एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते ती ही, की श्री. अनिरुद्ध कुलकर्णी यांनी संपूर्ण मुक्त रचना केली आहे. म्हणजे असे की कुठेही मराठी कवितेत हमखास आढळणारी अष्टाक्षरी, ढोबळ का होईना पण यमकाची बंदिशी, चार ओळींचे कडवे असलेली पारंपारिक रचना, या कवीने कटाक्षाने टाळली आहे. इतकेच नव्हे, तर शब्द आणि अभिव्यक्तीचे वेगळेपण हे आजवरच्या मराठी कवितेला आणि तिचा आस्वाद घेणाऱ्या रसिकतेला बुचकळ्यात पाडणारे, अडवणारे असे असले, तरी ही कविता वाचताना, आपण कवितेशिवाय वेगळे काहीतरी वाचतो आहोत अशी भावना निर्माण होत नाही, याचा आवर्जून उल्लेख करायला पाहिजे.

श्री. कुलकर्णी यांच्या कवितेतील संदर्भबहुलता ही अनेक परिमाणांनी उपयोजिलेली आहे. पाश्चात्य प्रतीके, जी पारंपारिक रसिकांना अडवतात ती, आणि शब्दांची आविष्कृतीच्या सहजशैलीत कवीने केलेली मांडणी, अशा संकरात ही

कविता लवलवताना आढळते. पर्विज, क्युमुलो निंबस, हॉलिहॉक्स, ज्यूडास, आबू सिवेल, कार्बुशिए, नीरो, टायबर, गॅलिना उलानोव्हा, ज्याँ वालॅज्या, मोलेक्यूल, कोलिजन्स, टर्शिअर, पार्थेनॉन, तेरावी व्हांदिमिए, सॅटोरी-एक-दोन, यासारखी इंग्रजी शीर्षके अशा अनेक तऱ्हेने ही कविता संभ्रमात पाडते. मर्ढेकर वाचताना त्यावेळी जसे काही झाले असेल, तसेच काहीसे ही कविता आजच्या रसिकतेचे करते, हे स्पष्ट आहे. 'एनसायक्लोपीडिआ' घेऊन बरीच कोडी आणि गुंता सोडवावा लागतो. पण एखादा कवी समजून घेण्यासाठी इतके परिश्रम केल्यावरही तो समजून घेण्यासारखा आहे – होता हा आनंद वेगळा असतो. मला स्वतःला कुलकर्णी यांच्या कवितेने हा आनंद दिला आहे. थर्मोडायनॅमिक्स थिअरी, W = JH पोटेन्शिएल एनर्जी, T–1 वगैरे गोष्टी ह्या समजूनच घ्याव्या लागतात. अशा संदर्भाचा भरपूर वापर जरी अनिरुद्ध कुलकर्णी करतात तरी त्यांच्या काव्यात्म व्यक्तिमत्त्वामुळे पाश्चात्य आणि पौर्वात्य अशा भिन्न संस्कृतीमध्ये कधी कधी संकराच्या साहाय्याने एकसंधता आणण्याचीही धडपड दिसते. 'व्हॅनगोचा कान काय, किंवा 'एकलव्याचे बोट' असे एखादे वर्णन किंवा 'शेअर मार्केटप्रमाणे' खालीवर होणारे शेकडो 'आरसे'...आणि निःशब्दतेत विरघळणाऱ्या चुरगाळल्या 'दंतकथा', 'ग्लडिएटर्स' आणि 'आलमगीराच्या करारी सुती गुंड्या' अशा कितीतरी ठिकाणी ही संकरसंपन्नता प्रकट होते. आणि कवितेचा विलक्षण घट्ट पीळ आपल्यापुढे आव्हान देत उभा ठाकतो.

अत्यंत बंदिस्त अशा व संमिश्र अशा अनुभूतीमुळेच श्री. कुलकर्णी यांची कविता आव्हानात्मक बनली असे म्हणताना त्यांच्या प्रतिकाप्रयोजनाचे रहस्यही समजून घ्यावे लागेल. आपल्या स्वाभाविक विस्तारासाठी एखाद्या वेलीने जवळच्या वृक्ष-महावृक्षाला बिलगत, लपेटत फोफावावे तशी संदर्भवैविध्य, संकर आणि प्रतिकांच्या साहाय्याने ते आपल्या अनुभूतींना काव्याकार देतात, 'थकलेल्या माझ्या चौखूर हाकेची वाट पाहात, चिखलाच्या माणसांची, प्रौढ व्यासगाना, 'लवलवत्या डोळ्यात' 'आणि कपिश वर्णाच्या,' 'बरबर माझा चेहरा' 'स्वान लेक', 'नंतरचे अनुचित सांत्वन' व 'उभ्या मिनिटाच्या' या कविता अभ्यासता येतील. येथे कवीने आत्मवेदनेच्या कवचावर कलावंताची, मानवजातीची, प्रातिनिधिक प्रतिमा धारण केली आहे. आत्यंतिक कडवट निराशा, आयुष्याचे 'ओढणे'–जगणे हेच आंधळ्या अस्तित्वाचे ओझे वाहणे, अशा तीव्र प्रभावाने एक तऱ्हेचा बेगुमान-पणा आणि उपरोध त्यांच्या शैलीचे एक आविभाज्य अंग बनला आहे.

आपल्या आजच्या अवस्थेची परवड मांडताना पारंपरिक पद्धतीनें कवी भाव-विवश बनत नाही, तर वैचारिक तणाव्याभोवती तो गिरगिरतो. आणि म्हणून

"झिडून चाललो आहे मी नादानी दैनंदिन
दानाच्या...ओशाळून चाललो आहे मी !"

असे हा कवी व्यक्त करतो.

श्री. अनिरुद्ध कुलकर्णी यांनी शब्दाची जी एक विशिष्टपद्धती स्वीकारली आहे. त्याचे कारण मी नोंदलेच आहे. भावविवशतेच्या आहारी जायचे नसेल, सहानुभूतीचा हमखास मार्ग सोडायचा असेल तर शब्दांची परिचित रचना बदलणे आणि वैचारिकतेच्या गंभीर सुरावटीशी समन्वय साधणे हेच कवीला शक्य होते. म्हणून शब्दाचा क्रम व तोलच त्यांनी बदलला आहे. बहुतेक कविता याच अंतःसूत्राने निर्माण झाल्या आहेत. ' घामेजलेला आळस ' या कवितेतील—

' संस्काराचे सावध केस छाटून उरलेल्या
गळ्यावरून घाम निपटतो हिकमती पंजा '

या ओळी, किंवा ' नवीन धुंदी ' या कवितेमधील—

' मला मात्र जांघेतल्या दुखण्यासारखे माझे आत्मचरित्रच—
आव्हान.
कृती देहाबरोबर जळतील. स्मृती मनाला सती जातील.

या ओळीकडे वचारिक काव्यात्मकतेचा समन्वय या दृष्टीने बघणे लक्षणीय ठरावे. ' आतून अपसेट झालेला मी ', ' रात्री अपरात्री ' शिशिराला हसल्याने, ' ' गंगेच्या आजतागायत तीरावर, '—' रात्रीचे रिकामे रस्ते ', ' ओळी आजोबांसाठी ', ' पारदर्शी इतिहास ', आणि ' उठवत नसताना उठतो ', ह्या संग्रहामधील सामर्थ्यवान आणि श्री. अनिरुद्ध कुलकर्णी यांचे वेगळेपण गर्जून सांगणाऱ्या उत्तम कविता. त्याचप्रमाणे, ' एका अथांगतेतून ',' महत्त्व आहे ',' कॉरिडॉरचे इमानी खांब ',' यमासाठी', ' कसांद्राच्या हातांना ',' सुशिक्षित माध्यान्हीलाच ' या कविता फार शब्दबंबाळ झाल्या आहेत. त्यांतील शब्दवलयांनी कवितेच्या सर्वस्वालाच बंदिवान केले आहे. अशा बोजड, विद्वज्जड कवितांचीही ' डिसेंबर आणि इतर कविता ' या संग्रहात एकच गर्दी उडाली आहे. अशा वेळी कवीच्या शब्दांना आधीच्या काही कवितांप्रमाणे तरल रूप आले असते, की ज्यायोगे रसिकमन झंकारून उठेल तर ठीक होते. वरवरच्या अडवणुकीला न जुमानता कवीच्या मनाशी त्याची तार जुळली पाहिजे. बऱ्याच बाबतीत कवीला शब्दक्रम, त्यांची मनसंवादानुकूल सहजरचना, आशयसंपृक्तता व संदर्भबहुलता असूनही प्रामाणिकता या बाबतीत यश मिळाले आहे पण काही कविता या जड, दूर राहणाऱ्या, परक्या वाटणाऱ्या अशा उरल्या आहेत. श्री. अनिरुद्ध कुलकर्णी यांची झेप फार निराळी आहे. त्यांच्या कवितेची प्रेरणास्थाने वेगळी आहेत आणि भावनाविशतेचा पारंपारिक झगा निग्रहपूर्वक ती झटकून टाकू पहाते आहे. आपले हे वेगळेपण या कवीने जपले तर एक समर्थ पायंडा पाडल्याचे श्रेय दहा वर्षांनी त्यांला मिळेल असा मला विश्वास वाटतो. ☐

**डिसेंबर आणि इतर कविता** : कॉन्टिनेंटल प्रकाशन,
पुणे ३० : जानेवारी १९७१ : पृष्ठे १४४ : कि. ५ रुपये.

त्याने इतरांवर धूळ फेकली, अदृश्य शाईत संदेश पाठवले. पण त्याच्या सहीतली E, F व S ही अक्षरे फसवू शकली नाहीत...

# अक्षराच्या वळणातून मागोवा

**जिप्सी मधुकान्त**

न्यूयॉर्क शहरामधील हवाई हल्ला रक्षकांची संख्या ९८,३३८ होती! आणि त्यातून तो अनामिक माणूस हुडकून काढायचा म्हणजे अतिशय विकट काम. पण एफ. बी. आय. च्या लोकांनी ते अंगावर घेतले.

२० फेब्रुवारी १९४२ ला पोर्तुगाल विभागात जाणाऱ्या डाकेवर लक्ष ठेवणाऱ्या सेन्सॉर अधिकाऱ्याने एका लिफाफ्यातून टाईप केलेला एक कागद निवडून काढला. वरवर पाहता त्यात काहीच विशेष नव्हते. पण त्यावरचा पत्ता प्रतिहेर खात्याने टिपलेल्या एका जर्मन हेराचा होता. पाठवणाऱ्याचा अर्थातच पत्ता नव्हता. एक मित्र दुसऱ्या मित्राला ख्यालीखुशालीचा मजकूर लिहितो तसा मजकूर होता. एफ. बी. आय. च्या परदेशातील यादीत असलेल्या एका पत्त्यावर ते पत्र जाणार होते.

वॉशिंग्टनच्या लॅबोरेटरीत तज्ज्ञ त्या पत्राच्या कोऱ्या भागावर रसायनात भिजवलेला स्पंज फिरवत होते. थोड्या वेळाने तेथे गुप्त अक्षरे उमटू लागली! महिरपीदार जर्मन अक्षरात त्यावर न्यूयॉर्क बंदरातील लष्करी वाहतुकीची गुपिते होती, आणि जर्मनांच्या हाती ती माहिती पोचली असती म्हणजे त्या जहाजांचा धुव्वा उडणार होता.

ही माहिती पुरवणाऱ्या हेराला हुडकून काढलेच पाहिजे, असे एफ. बी. आय. ने ठरवले. पण लॅबोरेटरीतून मिळालेले धागे फारच अपुरे होते. अंडरवुड थ्री बँक पोर्टेबल टाइपरायटरवर ते पत्र टाईप केलेले होते. न्यूयॉर्कमधील टाइपरायटर्सची विक्री करणाऱ्या अंडरवुड कंपनीच्या दुकानांतून एफ. बी. आय. च्या एजंटांनी अक्षरशः निष्फळ शोध सुरू केला.

### 'क्ष'ची प्रतिमा आकार घेऊ लागली

दरम्यानच्या काळात न्यूयॉर्कच्या पोस्टात टाकलेली आणखी दोन अशीच पत्रे मिळाली. याचा अर्थ तो न्यूयॉर्कमध्यच राहत असावा का? त्याचा चेहरामोहरा

कसा ? पण त्या विराट वस्तीत त्याला ओळखता येईल अशी कोणतीच खूण त्यावेळी एफ. बी. आय. पाशी नव्हती. त्या पत्रांच्या छायाचित्रात प्रती काढण्यात आल्या. त्या मजकुरांचा बारकाईने अभ्यास केल्यावर एका खास अधिकाऱ्याने काही धागे दोरे गोळा केले. त्या मजकुरावरून जाणवत होते, की क्ष ही व्यक्ती विवाहित आहे. तिचे स्वतःचे घर आहे. तिचा एक कुत्रा आहे आणि तो कुत्रा आजारी आहे. कामावर जायची क्षची नियमित पाळी आहे. सकाळी सात आणि आठ वाजण्याच्या दरम्यान तो घरातून बाहेर पडतो. नुकताच तिने आपला चष्मा बदलला आहे. हवाईहल्लारक्षकदलात त्या व्यक्तीला नोकरी आहे.

सूक्ष्म दृष्टीने विचार करता त्या निरुपयोगी, क्षुल्लक वाटणाऱ्या मजकूरातून क्ष बद्दलची एवढी माहिती मिळाली. पण न्यूयॉर्कमध्ये ९८ हजार तीनशे अडतीस हवाईहल्लारक्षक तैनात होते !

पण कोण विवाहित आहे, कुणाचे खाजगी घर आहे, कुणापाशी कुत्रा आहे, कुणी चष्मा बदलला आहे—ही माहिती शोधून काढायचे जगड्व्याळ काम एफ. बी. आय. ने पत्करले. अतिशय रुक्ष अन् भारी जिकिरीचे काम होते.

आणखी काही पत्रे या दरम्यान हाती आली. त्यातून क्ष ची प्रतिमा आकार घेऊ लागली. त्याच्या माहितीत भर पडली : त्याच्या घराभोवताली बाग आहे. त्याला कोंबड्या पाळण्यासाठी वेगळी जागा घेण्याची इच्छा आहे. गहाणवटीच्या व्यवहारामुळे त्याच्या घराला धोका निर्माण झाला आहे. त्या अनामिक क्ष ची फाईल आकार घेत होती. आणि एफ. बी. आय. चे निष्णात एजंट अव्याहतपणे हवाईहल्लारक्षकांची यादी चाळत होते. अजून ८१ हजार रक्षकांची यादी तपासायची होती !

१४ एप्रिलच्या रात्री बारावे पत्र मिळाले. त्यात लिहिले होते : " सध्या येथे अतिशय सुखद हवामान आहे. झाडांना नवी पालवी फुटत आहे. आपण एस्टोरिलच्या किनाऱ्यावर घालवलेल्या वसंतऋतूची नेहमी आठवण येते. "

एस्टोरिल ! एफ. बी. आय. ला एस्टोरिलची माहिती होती. लिस्बनच्या जवळच हा एक अड्डा होता. जर्मन हेरांचे ते आश्रयस्थान म्हणून एफ. बी. आय. जवळ त्याची नोंद होती. निरुपद्रवी वाटणाऱ्या त्या ओळींतून एस्टोरिल चा उल्लेख ही मौल्यवान माहिती होती. ताडबतोब वरिष्ठ अधिकाऱ्यांची गुप्त बैठक झाली. १९४१ च्या वसंतऋतूनंतर लिस्बनहून आलेल्या परदेशी प्रवाशांची तपासणी करायची. पण पासपोर्टवरच्या फोटोशी तुलना करता येईल असा फोटो त्यांच्यापाशी नव्हता. हाताचे ठसे नव्हते. पण एका अधिकाऱ्याला मार्ग सापडला : ' आपल्यापाशी एक खास नमुना आहे. त्या पत्रावर क्ष 'फ्रेड लेविस' म्हणून आपल्याहस्ताक्षरात सही करतो. नाव बनावट आहे. पण ते हस्ताक्षराचे वळण तर खुद्द त्याचेच आहे आणि अमेरिकेत येणाऱ्या प्रत्येक प्रवाशाला कस्टमला एक फॉर्म भरून द्यावा लागतो. मग कस्टम्सच्या त्या नोंदीतून ' फ्रेड लेविस 'च्या हस्ताक्षराचे

साम्य हुडकण्याचा प्रयोग आपल्याला जवळचा आहे.'

दुसऱ्या दिवशी एफ. बी. आय. चे चतुर हस्ताक्षर तज्ज्ञ क्षच्या पत्राच्या प्रती घेऊन कस्टम खात्यातले त्या फॉर्मचे डोंगर उपसू लागले! १९४१ नंतर लिस्बनहून हजारोंनी आश्रयार्थी आले होते. पोलिश, जर्मन, फ्रेंच, डच, रशियन वळणातील ते हस्ताक्षरांचे नमुने तपासण्याचे काम चालू होते. या तज्ज्ञांची काम करण्याची एक विवक्षित पद्धत असते. समजा एखादे विशिष्ट अक्षर घेऊन त्याचे वळण कसे आहे कुठे फराटा आहे, गाठ आहे, वक्राकार आहे हे पाहिले जाते. एकदा असे पक्के अक्षर ध्यानी आले म्हणजे मग त्यानुसार अतिशय बारकाईने तुलना केली जाते. अक्षर शोधण्याचे हे काम रात्रंदिवस सारखे चालू होते. पुनःपुन्हा छाननी होत होती. इकडे ६० हजार हवाई हल्ला रक्षकांची तपासणी झाली होती. जेथे जेथे शक्य होईल तेथून माहिती मिळवली जात होती. चौकात, हॉटेलातल्या चर्चांवर लक्ष होते. एखादा शब्द जरी सापडला तरी त्याचा तपास काढला जाई.

## अखेर अक्षरें जुळली !

कस्टम्सच्या ऑफिसातील त्या डोंगराएवढ्या चळतीतून ४८८० फॉर्म्सच तपासून झाले होते. ९ जून १९४३ च्या रात्री ९ वाजता एका तज्ज्ञाने पुढचा फॉर्म उचलला. तो तपासला आणि अक्षराचे वळण पाहता तो चमकला. त्याचा थकवा, कंटाळा कुठल्या कुठे पळाला! बृहद्दर्शक भिंग घेऊन त्याने आपली खात्री केली. तेच ते. नक्कीच. E चे वळण खास ह्या क्षचेच होते. F मधला तिरकसपणाही नेमका तसाच. S चे वळण ओळखीचे. त्या तज्ज्ञाने आपल्या सहकाऱ्यांना इशारा केला.

त्या रात्री वॉशिंग्टनच्या लॅबोरेटरीत त्या सहीचे फोटो एनलार्ज करून क्ष च्या हस्ताक्षरांशी त्याची तुलना करण्यात आली. तज्ज्ञांची खात्री पटली. एकमत झाले. रात्री १–४५ वाजता एफ. बी. आय. च्या मुख्य कचेरीतला फोन खणाणला: 'एर्नेस्ट एफ. लेमिल्स या नावाची तपासणी करा.'

हवाईहल्लारक्षकांच्या यादीत ते नाव होते! लेमिल्स–१२३ ऑक्सफर्ड प्लेस, टॉम्पकिन्सव्हील, स्टेटन आयलंड, न्यूयॉर्क!

एका तासाच्या आतच मॅनहॅटनहून स्टेटन आयलंडच्या एका फेरीबोटीवरून एफ. बी. आय. चे कुशल एजंटस उतरले. अगदी साध्या वेशातले. त्यांना आता वित्तं-बातमी काढायची होती. लेमिल्सला माहिती कोण पुरवते, त्याचे आणखी जाळे कोणते? कारण खटला भरायचा तर पुरावा हवा.

रात्रभर त्या घरावर निगराणी ठेवण्यात आली. सकाळी ७–१५ ला एक उंचेला. चष्माधारी माणूस घाईगर्दीने बाहेर पडून रस्त्याला लागला. थोड्याच वेळात एका रेस्टॉरंटमध्ये तो शिरला. एफ. बी. आय. च्या एका माणसाने त्याच्या मागोमाग प्रस्थान केले. अगदी सकाळ असूनही ते रेस्टॉरंट गोदी कामगारांनी गजबजलेले होते. त्यात सैनिक व खलाशीसुद्धा होते. एका कॉफीच्या कपाआडून

एजंटाने त्याच्याकडे पाहिले. त्या माणसाच्या अंगात एक मळकट एप्रन होता. तो जमीन पुसत होता. सौम्य निळे डोळे, पन्नास-पंचावन्न वर्षे वय असेल, केस गवताच्या जुडीसारखे, किरमिजी. पण अगदी चारचौघांसारखा तो होता. पुन्हा त्याला ओळखून काढायचे तर कठीण गेले असते.

त्या रेस्टारंटमध्ये ती माणसे खलाशी, सैनिक, कामगार इ. आगबोटीसंबंधी, मालवाहतुकीसंबंधी बोलत होती. एजंटने कॉफी पिऊन बाहेर प्रयाण केले.

## भाजी पिकवणारा दिलदार माणूस

त्यानंतर त्या रेस्टारंटमध्ये एफ. बी. आय. च्या अनेक लोकांनी, सेल्समन, खलाशी आदींच्या भूमिका वठवून बरीच माहिती गोळा केली. ते सतत तेथे सावलीसारखे माग काढत होते. तेथल्या माणसांच्या बोलण्यांतून त्यांना माहिती मिळाली. माणसे आपसात सहज बोलत होती. एर्नी माहित आहे ना तो आपला हवाईहल्ला रक्षक. त्याने लोकांना दिवे मालवा, प्रकाशबंदी करा म्हणून कितीदा कळकळीने विनंती केली. सारखा त्याच कामात असतो. युद्ध खूपच मनावर घेतले आहे त्याने. एर्नी मोठा दिलदार माणूस. पण त्याचा कुत्रा गेल्या उन्हाळयात गेला. अगदी जिवलग दोस्तच म्हणा ना तो. या बेटावर एर्नी लेमिल्स सारखी नमुनेदार बाग नसेल कुणाची! पण त्याच्या घरावर बँकेने गहाणवट म्हणून जप्ती आणावी, हे खूपच वाईट झाले. एर्नी ना, मला तो चांगलाच माहीत आहे. नेहमी आपल्या चिकनफार्मच्या योजनेबद्दल बोलत असतो.

बोलण्या बोलण्यातून एफ. बी. आय. च्या लोकांना एर्नी बद्दल तुटकपणे पण सलग अशी बरीच माहिती सहज मिळवता आली.

हळूहळू फास आवळत होता. २७ जून १९४३ रोजी सकाळी ८ वाजता, म्हणजे लेमिल्सचे पहिले पत्र सापडल्यानंतर एक वर्ष चार महिने आणि सात दिवसानंतर, लेमिल्सला एफ. बी. आय. च्या ऑफिसात आणण्यात आले. त्याला ती पत्रे आणि भरभक्कम पुरावा दाखवण्यात आला. सुरुवातीला त्याने आपण त्या गावचेच नाही, अशी बतावणी केली. पण साऱ्या घटनांचा पुरावा उलगडून अखेर त्याने कबुलीजबाबावर सही केली.

१९०८ मध्ये न्यूयॉर्कच्या जर्मन कॉन्सलेटमध्ये कारकून म्हणून तो सुरुवातीला आला होता. नंतर जर्मनीला अनेक फेऱ्या केल्या. १९३८ मध्ये जर्मन हेर म्हणून गुप्त शाई व हेरगिरीचे शिक्षण त्याने घेतले. १९४१ मध्ये अमेरिकन नागरिक म्हणून परतायचा त्याला हुकूम मिळाला. स्थिर नोकरी व सच्चा नागरीक अशी भूमिका त्याला वठवायची होती. त्याच्या सोबत एर्विन हॅरी डिस्प्रॅटर नावाचा दुसरा हेरही पकडण्यात आला. त्यांना शिक्षा झाली. हॉटेलात जमीन पुसणारा आणि भाजी पिकवणारा सामान्य माणूस एफ. बी. आय. च्या दृष्टीने एक जिकिरीचे आव्हान होऊन बसला होता. □ □ □

राहतो. त्याचा ठळक सिद्धांत असा, की आदिवासी जनता हीच खरी सुसंस्कृत जनता. त्यांनी Civilisation चा पाया घातला. आपण तथाकथित लोक त्यांच्या कार्याचा विध्वंस करीत आहोत. आपण म्हणतो की माणूस लिहा-वाचायला लागला तिथून संस्कृतीचा उदय झाला. स्ट्राऊस म्हणतो, की मानवी जीवनात क्रांती फक्त एकदाच आणि तीही पाषाणयुगात झाली. जेव्हा माणसाने दगडधोंड्यांपासून हत्यारं बनवली, तेव्हाच. त्यानंतर आज जो मानवी व्यवहारांचा पसारा दिसतो, ते केवळ एक expansion आहे. क्रांती नाही. स्ट्राऊसची भाषा कठीण काव्यात्म, आणि थेट मांडणारी आहे. त्यांच्या भाषांतरकारालाही ते पदोपदी जाणवलं आहे. मी स्ट्राऊस-वर प्रबंध लिहीत आहे. इंग्रजीत. त्याच्या विचारसृष्टीचा आढावा घेऊन मी तो त्यालाच पाठवणार आहे. त्यासाठी काही फ्रेंच पुस्तकं मुळातून वाचणं आवश्यक आहे. मी ती फ्रान्समधून मागवली आहे. रफटफ करीत मी ती वाचून काढेन. खरं म्हणजे असं हे संशोधनाचं काम विद्यापीठाचं आहे की नाही ? पण विद्यापीठाचं डबकं झालं आहे. पगार नि भत्ते खाण्यापलीकडे विद्येच्या क्षेत्रात तिथे कुणी काही करीत नाहीत नि म्हणून मला हे काम अंगावर घ्यावं लागतं.

पुनर्जन्मावर माझा पूर्ण विश्वास आहे. उगाच प्रत्येक गोष्ट rationalise करण्याचं कारण नाही. पुनर्जन्म आहे. मात्र तो मनुष्याचाच लाभेल असं सांगता येणार नाही, कारण जीवसृष्टी अपरंपार आहे. पण पुनर्जन्माच्या पुसट खुणा कुठे कुठे दिसतात. आपण ज्याला ऋणानुबंध म्हणतो तो दुरून दुरून त्याचाच प्रकार असावा. राजारामशास्त्र्यांनी जे जे प्रोब्लेम्स सोडवले, ते मी अजाणता उचलले हे एरवी का घडलं असतं ? थोरो मला केव्हापासून आकर्षित करून घेऊ लागला, हे का ? माझे वडील गेल्यानंतर मी पार गळून गेले. इतकं की मी भावाला म्हटलं सुद्धा की मला ट्रीटमेन्टच घेतली पाहिजे. त्याशिवाय गत्यंतरच नाही. तीन हजार रुपयांच्या खर्चाचा प्रश्न होता. इतक्यात, एक दिवस जयवंत दळवी हजर झाला. म्हणाला, तुम्ही थोरोच्या ग्रंथांचं भाषांतर करून द्या. मला ट्रीटमेंटसाठी जितक्या पैशांची गरज होती, नेमकं तितकं मानधन मिळालं. म्हणजे पहा, अडीअडचणीच्या वेळी थोरो आणि दळवी न बोलावता धावून आले. ह्या घटनेला काही अर्थ आहे. मला ह्यात नातेसंबंध दिसतो.

माझं luck हे, की मी चांगला बाप निवडला ! बाकी दैव नावाची गोष्ट जगात आहेच. काही काही कर्तृत्ववान माणसं कमालीची अभागी असतात, त्यांनी कितीही केलं तरी त्यांच्या पदरात काहीच पडत नाही. पण तरीही आपण प्रयत्न-शीलच असलं पाहिजे. शंभर अपयशं आली तरी एकशेएकाव्या वेळा यश येणं

शक्य असतं.

एकवीसावं शतक फार मजेशीर होणार आहे. आफ्रिकेतला निग्रो इतिहासाचं चक्र इकडचं तिकडे बदलून टाकेल, बघ. त्यांची धिप्पाड शरीरं, त्यांचा ताजेपणा हेच सूचित करतात. काय दांडगी शक्ती आहे ती ! त्यांच्यापाशी केवढा प्रचंड भूभाग आहे, त्यातली निसर्गसंपत्ती केवढी प्रबळ आहे, खनिजं किती प्रकारची नि समृद्ध आहेत. आफ्रिकन निग्रोकडे एक प्रकारचा freshness आहे. तो इतिहास घडवणार.

सर्कसमध्ये काम करणारी मुलगी व्हायचं हे माझं लहानपणीचं एक स्वप्न होतं.

आगरकरांचा आणि आम्हा भागवतांचा फार जुना घरोबा. त्यांचे दोन मुलगे अकोल्याला असत. ते सुट्टीत इकडे आले की आमच्याच घरी उतरत. आगरकरांची बायको अगदी साधी, सुशील बाई होती. तिला बाळंतपणात बायकांची सेवा करायची हौस असे. तिने हरिजन बायकांचीही बाळंतपणं अगदी ममतेने काढली. म्हणजे पहा, तिने आपल्या नवऱ्याकडून चार दोनच का होईनात पण उदार संस्कार कसे उचलले होते.

आफ्री-आशियाई लेखक परिषदेला मला रशियात बोलावलं होतं. मी तिकडे तीन आठवडे होते. रशियाच्या आशियाई भागातल्या मुसलमान स्त्रीच्या चेहेऱ्यावर मला एक वेगळीच तृप्ती दिसली. त्या लोकांनी निदान एक तरी शृंखला नक्कीच तोडली आहे.

रामकृष्ण परमहंस पहा केवढा थोर माणूस ! त्याने आपल्या बायकोला केवढ्या महत्पदाला नेलं, गांधीही तसाच. त्याच्या आजुबाजूला कसल्या बायका होत्या— सरोजिनी नायडूसुद्धा होती. पण त्यांच्यापैकी एकीला तरी त्याने कस्तुरबांचा अपमान करण्याची संधी दिली का ? ह्याला म्हणतात पुरुष ! नाहीतर ती लग्नं हवीतच कशाला ?

नव्या उगवणाऱ्या पिढीचा मला कधीच मत्सर वाटत नाही. मला जे कधीच दिसणार नाही, ते ते पुढे पहाणार आहेत हे नक्कीच. पण मला दिसलेला गांधी तरी त्यांना कधी दिसणार आहे ? कालचक्रात हे असं होणारच. काही गोष्टी आपण मिळवणार नि काही कायमच्याच गमावणार, गमावल्यासुद्धा !

आदिवासी लोकांकडे जीवनाचं एक विलक्षण शहाणपण आहे आणि ते आपल्याला न कळण्याइतके आपण मठ्ठ आहोत.

मी डॉक्टरेटसाठी जो प्रबंध तयार केला होता, तो जपानमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या Asian Folklore मध्ये दोन भागांत प्रसिद्ध झाला आहे. त्या लोकांना माझे ते त्या काळातले विचार ताजे वाटले.

आपल्या समाजातल्या तथाकथित थोर लोकांचा जो अचाट दांभिकपणा आहे, त्याचं खरं स्वरूप चित्रित करण्याचं काम आता Committed लेखकांनी केलंच

पाहिजे. समाज बिघडेल, समाजाचा अध:पात होईल, अशी आवई उठवून वाङ्मयाची मुस्कटदाबी करणं मूर्खपणाचं आहे. वाङ्मय वाचून समाज बिघडत नसतो. आणि अमुक ह्याचं चित्रण करा नि तमुकाचं करू नका असं हे सांगणारे कोण? आपल्या समाजात अध:पतन चालू ठेवणारे जे इतर प्रकार राजरोस चालू आहेत, ते हे बंद करू शकतात?

पुन्हा येशील तेव्हा टेलिफोन करून ये, म्हणजे मी मस्तपैकी डबा घेऊन येते.

माझी आत्या सीताबाई नाशिकच्या शाळेची प्रिन्सिपॉल होती. मी मॅट्रिक तिच्यापाशी राहून नाशिकलाच झाले. नाशिक हे इतकसं गाव. फार सनातनी. पण आमच्या घरातलं वातावरण फार प्रागतिक, सुधारक. आतेकडे गावातल्या बायका जमायच्या. शिवणकाम शिकायच्या, वाचायच्या, बोलायच्या, सनातन्यांच्या ते डोळ्यावर येई. आम्ही मुलीमुली संध्याकाळी फिरायला जायच्या. सनातनी त्यावरून उखडले, म्हणाले, बायका फिरतात म्हणजे काय? शंकराचार्यांच्या मठात ह्यावर चर्चा झाली. डॉ. कुर्तकोटीसकट सर्वांनी आमच्यावर बहिष्कार घातला. तेव्हा वस्तुस्थिती पाहायला लोकमान्यांची मुलगी. म्हणजे सौ. केतकर तिच्या वारेबाई, लिमयेबाई वगैरे मैत्रिणींसह आली. ती फार छान, सुसंस्कृत, उदार होती. टिळकांसारखी खरखरीत नव्हती. आमच्या वर्तणुकीत तिला काहीही वावगं दिसलं नाही. मग त्या तीन बायकांनी सनातन्यांना चागलंच सुनवलं.

वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत जातीभेद म्हणजे काय हेही मला माहीत नव्हतं. आम्हांला फक्त दोन जाती माहिती होत्या. एक मासे खाणाऱ्यांची नि दुसरी मासे न खाणाऱ्यांची. आमच्याकडे स्वयंपाकाला महाकर्मठ आजी होत्या. त्यांचं सोवळं तर कमालीचंच असे. आम्ही त्यांना सांगायचो की तुम्ही जेवण इथे वाढून ठेवा, आम्ही ते ओवळ्याने खाऊ. त्या द्यायच्या. आमचे नवे विचार अम्ही त्यांच्यावर लादले नाहीत. त्यांनी आपलं सोवळं सोडलं नाही. आमचं घर सोड म्हणून अनेक सनातन्यांनी तिला परोपरीनं सांगितलं. पण ती सतत आमच्याकडेच राहिली. आमच्या घरगड्यालाही आम्ही असंच समानतेनं वागवलं. त्याला कुणी त्याची जात विचारली, की सांगायचा "कोकणस्थ ब्राह्मण!"

अश्लीलतेच्या प्रश्नाला, मला वाटतं, डॉ. केतकरांनी त्यांच्या 'विचक्षण' कादंबरीत प्रथम तोंड फोडलं. विभावरी शिरूरकर वगैरे प्रकरणं नंतरची आहेत. डॉ. केतकरांची दृष्टी फार स्वच्छ होती.

नुकताच मी गुलाबावर लेख लिहून 'युगवाणी'कडे पाठवला आहे. एक रानफूल म्हणून गुलाब आपल्याकडेही होता, असेल, पण प्राचीन वाङ्मयात त्याचा उल्लेख नाही. पण सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात गुलाबाचा उल्लेख भारतीय वाङ्मयात झालेला मला नुकताच आढळला. गुलाब बॅबिलोनियात होता. रोम, ग्रीसमध्ये होता; जसं आपल्याकडे कमळ होतं आणि आहे, तसा.

२१ एप्रिल १९७२

मी जुनी नाटकं पाहिलेली नाहीत. आमच्या आजोबांची सक्त बंदी होती. मूकपट मात्र पाहिले. फाळक्यांचा 'कालिया मर्दन' पाहिलेला आठवतोय. त्यात त्यांच्या मंदाकिनीने काम केलं होतं. ती माझ्यापेक्षा चार वर्षांनी लहान. त्या काळात मी सर्कशी मात्र चिक्कार पाहिल्या.

चिखलात उगवलं तरी कमळ ते कमळच असतं. त्याप्रमाणे नैतिक अधःपतनाचं चित्रण केलेलं असलं, तरी साहित्यकृती ही साहित्यकृतीच असते.

मी माझ्या व्यक्तिगत फायद्यासाठी सबंध जन्मात कुणाकडे कधीही काहीही मागितलेलं नाही.

समाजातल्या काही बायका चंचल आहेत म्हणून पतिव्रतेची थोरवी. एरवी पातिव्रत्य ही कल्पना काय आहे? तशी ती एक negative value आहे.

प्राचीन साहित्यात लैंगिक विषय आणि वर्णनं भरपूर आहेत, कारण त्यावेळी सेक्स अगदी फ्री होतं.

मी एकटाकी असं फारसं लिहीत नाही. लहान लहान तुकडे वेगवेगळ्या बैठका करून लिहिते. दोन-तीन दिवस लागतात एका लेखाला. कधी कधी एका बैठकीतही लिहून मोकळी होते. ते कसं सुचेल त्यावर अवलंबून आहे. पण बहुतेकदा कप्प्या-कप्प्याने लिहिते. रफ–फेअर काही नाही. एकदा लिहिलं, की तेच फायनल. मात्र लेखनविषयाचा विचार अगोदर खूप दिवस डोक्यात घोळत असतो............

..............................................................

पलीकडे दालनात स्वर निमाले आहेत. तंबोरे शांत झाले आहेत. ज्यांच्या अमोघ लेखनशक्तीचा हा उमाळ्याचा गौरव, त्या बाई सर्वांना निरोप देत आहेत. सारेजण कृतज्ञतने त्यांना भेटत आहेत. सोहोळ्याची ही हृद्य सांगता पाहून मला परत परत वाटतंय, की यशस्वी लेखकाचं आयुष्य फार मानाचं आणि सुखाचं आहे हे तर खरंच. पण त्याच्याही वर एक स्तर आहे, की जिथे यश ह्या लौकिक मूल्याचा वरचष्मा नसतो. ओंजळीत अमोघ विद्या आणि हृदयात दिवा असणाऱ्या तंद्रीवाल्या कलावंतांना आणि लेखकांनाच तिथे प्रवेश आहे. अशा त्या दुर्गम स्तरावर दुर्गाबाई भागवतांसारखी निर्भय, निस्पृह आणि निरलस कलावान बाई नफ्या-तोट्याचं गणित न बांधता फटिंगपण स्वीकारून जेव्हा सरस्वतीसाधनेत गर्क होते, तेव्हा खालच्या स्तरांवरल्या अनेकांच्या हृदयांत आपल्यासाठी उबदार घरं बांधून ती कायमच्या मुक्कामालाच येत असते.

# महाराष्ट्र सरकार आणि रंगभूमी

# काही सूचना

**गोविंद पुरुषोत्तम देशपांडे**

मराठी रंगभूमीला सध्या बरे दिवस आले आहेत. त्याचं एक गमक म्हणज रंगभूमीच्या सध्याच्या अवस्थेबद्दल थोडाफार अभिमानही आता सामान्य मराठी माणसाला वाटू लागला आहे. राज्यसरकारने हा रंगभूमीचा गौरव वृद्धिगत करण्यासाठी बराच हातभार लावला आहे. करमणूक कर माफ केला आहे. वार्षिक नाटयस्पर्धा सुरू करून चांगल्या नाटकांचे, नाटककारांचे, दिग्दर्शकांचे, नाटकमंडळींचे, नटांचे थोडेसे सरकारी कौतुक करायला सुरुवात केली आहे. सामान्य माणसाच्या रंगभूमीविषयक अभिमानाला हा शासकीय दुजोरा निश्चितच सुखावह वाटत असला पाहिजे. वेदाध्ययन करणाऱ्या पंडितापासून ते भरमुनीच्या आजच्या वारसदारांच्या पाठीवर ही थाप मारण्यापर्यंत शासनाने ह्या राज्यातील ‘ उपेक्षित ’ कलांकडे सरकारी नजर वळवली आहे. त्याचे फायदे उघड आहेत.

सरकारने कला व विज्ञान ह्यांच्या वाढीसाठी काहीना काही करत रहाणं चांगलं आहे, एवढंच नाही, तर ते अगदी जरूर आहे याविषयी कोणाचेच दुमत नाही. परंतु त्यामुळेच नाटकाच्या वाढीसाठी काय करायला हवं आणि काय टाळायला हवं हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. आता त्याची चर्चा जास्त तपशीलात जाऊन करायला हवी. रंगभूमीला चांगले दिवस आले आहेत हे जरी खरं असलं तरी अजून उत्कर्षाचे दिवस बरेच दूर आहेत. मराठीच्या भाग्याने ते येतीलही परंतु त्यासाठी जर सरकारला काही हातभार लावता आला तर ते केव्हाही स्वागतार्हच आहे.

हे होण्यासाठी रंगभूमीला नव्या वाटा चोखाळता येणं महत्त्वाचं आहे. नाही तरी आजचं मराठी नाटक काही विशिष्ट चाकोऱ्यांयधून चाललं आहे. त्या चाकोऱ्या मुळातच अनिष्ट आहेत असं नव्हे, परंतु नव्या चाकोऱ्यांचीही गरज आहे. किंवहुना नाटकांमधल्या अनुभवाचं क्षितिज जितकं विस्तारेल तितका मराठी नाटकाचा आशय संपन्न होत जाईल. अभिव्यक्तीच्या सुभग व विविध तऱ्हा आपल्याला दिसायला लागतील. सरकार करीत असलेल्या प्रयत्नांमागची प्रेरणा जर ही राहील तर मराठी नाट्याची वाटचाल फार दूरवर व ज़ोमाची होईल.

म्हणजे 'मराठी नाटका'तील निर्मितीक्षमता प्रयत्नांपाठीमागे सरकारने उभं रहायला हवं असा याचा अर्थ होतो. मुंबई-पुणे व नागपूर या तीन प्रमुख केंद्रांत बरीच मंडळी 'नाटक' या माध्यमातून निर्मितीचा उपक्रम करीत आहेत. त्यांची सगळीच धडपड सुफल होईल व दर्जेदार मराठी नाटक त्यातून उभे राहील असे मला सुचवायचे नाही. परंतु या नव्या मंडळींच्या हातातच ही क्षितिजे विस्तारण्याची जबाबदारी व धमक आहे एवढे मात्र मला आवर्जून म्हणावयाचे आहे.

नाटक हा सरळधोपट व्यवहार नव्हे. ते बंडही नव्हे. ती प्रामुख्याने एक धडपड आहे. या धडपडीत चांगलं, वाईट दोन्ही आलंच. यश अपयश हेही आलंच. 'नाटक' हा अनुभव आहे व तो अनुभव प्रयत्नानं अधिकाधिक समृद्ध होत जातो. नाटकाच्या उत्कर्षाची खरी व्याख्या शेवटी ही धडपड जोमदार व मोठी होत रहाणे हीच करावी लागेल. नाटक करणाऱ्यांचे हौशी व धंदेवाईक असे दोन प्रकार मानण्यात येतात. 'हौशी' या शब्दापेक्षा 'धडपडे' हा शब्द जास्त समर्पक ठरावा !

इथे एक गोष्ट स्पष्ट करायला हवी. निर्मिती प्रयोगक्षमता किंवा धडपड या शब्दांनी विचकण्याचे कारण नाही. प्रायोगिक नाटक या शब्दप्रयोगाने एकदम नवनाट्य किंवा असला दुसरा शब्द मनात येईल हे खरं. पण त्या चर्चेत पडण्याची जरूर नाही व मी मांडत असलेल्या भूमिकेला ती चर्चा तेवढी जरूरही नाही. कारण नाटकावर प्रेम करणारी सगळी धडपडी मंडळी मला इथे अभिप्रेत आहेत व त्यांच्यासाठी सरकारने काही करावं एवढंच मला सुचवायचं आहे.

उदाहरण देऊन बोलायचं तर सरकारी पारितोषिकांचा एक चांगला परिणाम म्हणजे पुण्याच्या प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक किंवा माहाराष्ट्रीय कलोपासक यांसारख्या गटांना शासकीय उत्तेजन मिळणं हा आहे. आता ही मंडळी कुठल्या स्वरूपाचं नाटक करतात हा प्रश्न मला या विवेचनाच्या संदर्भात अप्रस्तुत वाटतो. 'महाराष्ट्रीय कलोपासक'ला "कालाय तस्मै नमः" या नाटकानिमित्त बक्षीस मिळते तेव्हा गेले काही वर्षे सातत्याने व निष्ठेने नाटक करीत असलेल्या एका संस्थेचे चीज होते व ही गोष्ट सर्वांत महत्त्वाची आहे. नाटक ही 'धडपड' आहे हे

म्हटल्यानंतर असं चीज होणं त्या मंडळींच्या नाट्यनिष्ठेला फार मोलाचं होईल हे तर उघडच आहे.

आतापर्यंतच्या विवेचनात स्पष्ट झालेला विचार जर स्थूलमानाने रास्त असेल तर महाराष्ट्र सरकारने एक नाट्यप्रशाला काढावी या सूचनेची या विचारांच्या संदर्भात छाननी व्हायला हवी. ही सूचना फार आकर्षक आहे. सकृद्दर्शनी या सूचनेसंबंधी मतभेद असू शकतील याचेही आश्चर्य वाटावे. परंतु या संदर्भात मत-भेद खरोखर शक्य आहेत व सरकार या नाट्यप्रशालेचा विचार फार गंभीरपणे करीत आहे असे कानावर आल्याने यासंबंधी काही मुद्दे मांडण्याचा या लेखाचा हेतू आहे.

नाटकविषयक शिक्षण देणं किंवा नाट्यशिक्षणाला संस्थात्मक (Institutionalised) स्वरूप देणे यात तसे गैर काहीच नाही. किंबहुना ते गैर आहे हे सुचविण्याचाही या लेखाचा उद्देश नाही. परंतु आता ते करणे कितपत शक्य आहे व खरंच जरूर आहे का हे तपासून पहाणं हा मात्र या लेखाचा हेतू आहे.

## एक नवे पीठ

या संदर्भात पहिला प्रश्न हा उपस्थित होतो, की आज आपल्या हाताशी पुरेसे शिक्षक आहेत का? आहेत त्या शिक्षकांचा आवाका केवढा आहे? पाश्चात्य, भारतीय व पौर्वात्य नाटकाचा व नाट्यतंत्राचा अभ्यास केलेले किती लोक आपल्याला मिळू शकतील? 'ठोकून देतो ऐसाजे' या चालीवर 'नाटक' (इतर कलांप्रमाणेच) या विषयावर बोलणारी मंडळी महाराष्ट्रात आहेत परंतु पूर्ण वेळ शिक्षक होऊ शकतील अशा वकूबाची व नाटकाची जाण असलेली मंडळी खरोखर मिळतील काय? नाहीतर पुन्हा 'वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा' या चालीवर अभिमान बाळगणाऱ्या पण जुनीच दारू नव्या बाटल्यात भरून देणाऱ्या काही चलाख नाट्य-कारागिरांची सोय लावून देणे एवढंच या प्रशालेचं काम होऊन बसेल. महाराष्ट्रात नाहीतरी पीठं पटापट निर्माण होतातच त्यात आणखीही एक पीठ!

दुसरा मुद्दा असा, की दिल्लीस राष्ट्रीय नाट्यप्रशाळा आहे. त्या प्रशालेत जवळ-जवळ एकतृतीयांश मराठी विद्यार्थी असतात. शिष्यवृत्याही चांगल्या असतात. तीन वर्षांचा हा अभ्यासक्रम संपवून बाहेर पडलेली मराठी मंडळी काही थोडी नसतील. आता प्रश्न असा आहे, की धंदेवाईक किंवा धडपड्या अशा मराठी नाटकाच्या कोणत्या प्रवाहात ही मंडळी मिसळू शकली आहेत? आणि किती? या प्रशालेतून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता ठरविण्याचा माझा विचार नाही, ती ठर-वण्याचे काही प्रयोजनही नाही. माझा प्रश्न अगदी साधा, सरळ, काहीसा थंड आकडेवारीचा आहे. इतका पैसा या मंडळीवर खर्च झाल्यानंतर या लोकांना मराठी रंगभूमीच्या प्रवाहात मिसळता येत नाही. तेव्हा कुठेतरी काहीतरी चुकत

असलं पाहिजे. मग कुठं विनसतं आहे ?

हे विद्यार्थी नाटकाची ओढ असलेले आहेत. नाटकाचं शास्त्रीय शिक्षण घेतलेले आहेत व त्यांच्या निर्मितीक्षम शक्तीचा उपयोग रंगभूमी करून घेऊ शकत नसेल तर तशाच काही अडचणी असल्या पाहिजेत. याचा दोष सर्वस्वी या विद्यार्थ्यांवर ठेवणं अगदी बेजबाबदारपणाचं ठरेल. कारण ते तसं नमावं. ' नाटका 'बद्दल ओढा असलेली व्यक्ती नाटकापासून स्वत:ला स्वेच्छेने तोडून घेईल हे अगदी अशक्य नसलं तरी थोडं न पटणारं आहे. आणि तरीही ते थोड्याफार प्रमाणात होत आहे. ते का ?

याचं सर्वांत महत्त्वाचं कारण या नव्या नाटकवेड्यांना त्यांच्या धडपडीसाठी जागा नाही. धंदेवाईक नाटकात शिरकाव करून घेणं सोपं नाही व इतर मार्ग नाहीत अशी चमत्कारिक परिस्थिती झालेली आहे. पुन्हा मुंबईत आणखी एक पीठ निर्माण करून कलांचे काही स्त्रोत अवरुद्ध करण्यात हशील नाही. किंबहुना आर्थिक दृष्ट्या व नाटकाच्या दृष्टिकोनातून तो प्रयत्न कदाचित व्यर्थ ठरण्याचा संभव आहे. पाणी तुंबवून धरू नये. ते कसं आणखी खळाळतं होईल हे पहायला हवं !

हे जर खरं असेल तर नाटकातील नव्या विकसनशील व उमेदीच्या अशा लोकांच्या अडचणी जाणून घेणं व प्रशाला उभारायला जो पैसा लागेल तो त्या अडचणी दूर करण्यात कारणी लावणं जास्त फलप्रद ठरणार आहे. या अडचणी केवळ राष्ट्रीय नाट्यप्रशालेच्या पदवीधरांच्याच आहेत असं नाही. या अडचणी सगळ्याच धडपड्यांच्या आहेत ! व या धडपड्यांना मदत केल्याशिवाय रंगभूमीचा उत्कर्ष होणार नाही.


# व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

मूल्य : रुपये अठरा

राजहंस प्रकाशन, पुणे

या धडपड्यांची मुख्य अडचण अशी आहे, की त्यांना इच्छा असो किंवा नसो, धंदेवाईक नाटकमंडळांशी स्पर्धा करावी लागते–विशेषेकरून थिएटर्सबाबतीत परिणामत: त्यांच्या प्रयत्नांतही पैसा फार गुंतवाता लागतो. सगळी नाटके करता येतात पण पैशाचे नाटक नाही करता येत. याउलट, सुमारे ३००-३५० जागांची छोटी नाटचगृहं असली तरी या धडपड्यांना निवांतपणे त्यांचे प्रयोग करता येतील.

## छोटी नाटचगृहे

सारांश, माझी सूचना अशी आहे, की महाराष्ट्र सरकारने मुंबई, पूणे नागपूर व या तीन शहरी एकेक छोटे नाटचगृह बांधावे. २५० ते ३०० जागांपेक्षा जास्त जागा त्यांत असू नयेत. म्हणजे धंदेवाईक नाटकमंडळच्या व धडपड्या नाटकमंडळच्या यांच्यामधली विषम स्पर्धा प्रथम दूर होईल. ही नाटचगृहे १०० ते १५० रु. भाड्याने (प्रकाश योजनेसह) या धडपड्यांना द्यावीत म्हणजे अगदी अल्प अंदाज-पत्रकावर प्रयोगाचा डोलारा त्यांना उभा करता येईल. उगीच शिवाजी मंदिर, बालगंधर्व रंगमंदिर यांसारख्या मोठ्या नाटचगृहावरती या तरण्या मंडळींना पैसे घालावे लागणार नाहीत. उलट ही नाटचगृहे छोटेखानी असल्याने धंदेवाईक नाटक-मंडळ्यांना तिथे प्रयोग करणे परवडणार नाही. त्यायोगे या धडपड्यांच्या मार्गातली एक मोठी अडचण दूर होईल. प्रेक्षकालाही काही नवे प्रायोगिक किंवा धडपड्या मंडळींचं बघायची इच्छा झाली, की त्याला विनबोभाट पहाता येईल. शिवाय हे नवे प्रयोग छोटेखानी थिएटरातून चालले तर त्यांना आवश्यक असलेली, नाटके पहाण्याचेही प्रयोग करू पहाणारा सुजाण प्रेक्षकवर्ग या धडपड्या मंडळींना मिळू शकेल. यात दाद मिळाल्यानंतर मग धीट होऊन एखाद्या मंडळीस शिवाजी मंदिर किंवा साहित्यसंघ इथे जाण्याचा धीर किंवा इच्छा झालीच तर तिने तिथे जावेही. पण तो वेगळा भाग झाला.

अशा प्रकारच्या छोट्या नाटचगृहांचा आणखी एक आर्थिक फायदा धडपड्या मंडळींना मिळू शकेल. त्यांचा जाहिरातीवरचा खर्च वाढेल. नवं काही पाहू वाटणारा प्रेक्षक, ही थिएटर्स व धडपडी मंडळी यांच्यात काही अलिखित संकेतच निर्माण होतील व मी वर म्हटल्याप्रमाणे 'बिनबोभाट' नव्या नाटकांना जाणे या सुजाण प्रेक्षकाला शक्य होईल.

'धडपड्या' मंडळींवर आजच्या विषम-स्पर्धेमुळे पडणारा आर्थिक बोजा कमी होऊन ह्या तरण्या मंडळींच्या उपक्रमांना काहीसा स्थिर असा पाया निर्माण होऊ शकेल याचा अर्थ ह्या धडपड्यांना सरकारने सगळे काही देऊन मांडीवर घेऊन भरवावं असा नव्हे. किंबहुना अशा गोष्टींनाही विरोध करायला हवा. या मंडळीं-वरचा आर्थिक बोजा हलका करावा व वरील योजनेत तो होईलच पण त्याच जोडीला या धडपड्यांची संघटन कुशलता, योजना चातुर्य आणि प्रत्येक नव्या प्रयत्नात अभिप्रेत असलेला थोडा धोका पत्करण्याची तयारी यांनाही वाव मिळेल.

मुंबई-पुणे-नागपूर या तीन शहरी हा प्रयोग यशस्वी होत आहे असं वाटलं, तर येत्या पाच वर्षांत अशीच छोटेखानी नाटचगृहे औरंगाबाद, नाशिक, कोल्हापूर यांसारख्या ठिकाणी निर्माण करावीत. म्हणजे ब्रिटनमध्ये ज्याला Provincial Theatre म्हणतात त्यासारखी 'प्रादेशिक रंगभूमी' महाराष्ट्रातही जोम धरू शकेल. मराठी माणसाचं रंगभूमी-प्रेम मुंबई-पुणे-नागपूरपुरतेच मर्यादित नाही व ते तसे असणेही शक्य नाही. फक्त त्याला विकासाचा अवसर मिळायला हवा.

सारांशाने ही योजना खालील स्वरूपात मांडता येईल.


१. मुंबई-पुणे व नागपूर या तीन शहरी २५० ते ३०० जागांची छोटी नाटच-गृहे सरकारने बांधावी.

२. ही नाटचगृहे प्रकाशयोजनेसह १०० ते १५० रु. एवढचा भाडचात नाटक मंडळचांना द्यावीत.

३. या लहान नाटचगृहांच्या प्रयोगाची उपयुक्तता व यशस्विता अनुभवाने सिद्ध होत आहे असं वाटलं तर त्यानंतर अशासारखा प्रयत्न औरंगाबाद, नाशिक, कोल्हापूर यांसारख्या शहरातही व्हावा.

मी वरील योजना विस्ताराने मांडली कारण आता सरकारी आर्थिक साहाय्य रंगभूमीला मिळत आहे तेव्हा ते सहाय्य जास्तीत जास्त निर्मितिक्षम कसे होईल यावर विचार होणे जरुरीचे आहे. माझ्या दृष्टीने वरील योजना कार्यवाहीत आणली तर नाटकातील नव्या प्रयत्नांना फार मोठा हातभार लागणार आहे.

परंतु याचा अर्थ प्रशाला काढूच नये असा होत नाही. वरचे विवेचन फक्त खर्चा-मध्ये कुठल्या योजनेला अग्रक्रम (Priority) मिळावा यापुरते मर्यादित आहे. हे करून त्यानंतर महाराष्ट्र राज्याने प्रशाला काढली तर त्यासंबंधी काहीच तक्रार नाही. फक्त कुठलाही खर्च करताना 'अग्रक्रम' ठरवावाच लागतो व तो ठरव-ण्याच्या दृष्टीनेच वरची योजना मांडली आहे.



मुक्काम : बालगंधर्व रंगमंदिर कलादालन

पुणे

# निराकार होऊ पाहणारे आकार

प्रा. स. शि. भावे


मुक्काम पुणे. रविवार. १६ एप्रिल, ७२. वेळ दुपारी चार ते पाच. या वेळात एक प्रदर्शन पाहिले. बालगंधर्व रंगमंदिराच्या कलादालनात दोन दिवस (१५-१६ एप्रिल) हे प्रदर्शन भरले होते. ते पाहिल्याने रविवार कारणी लागल्याचे समाधान मिळाले.

मित्र देवीदास बागूल यांच्या निष्ठेने, उपक्रमशीलतेने व कष्टाने हे प्रदर्शन भरले होते, असे समजले. बागूल नंतर भेटले. प्रदर्शन भरवण्यामागील भूमिका समजली. 'काही वेगळे, नवे, कलात्मक पण अपरिचित रूपाचे, असे दिसले की ते लोकांनीही पाहावे, अनुभवावे अशी प्रबळ इच्छा होते. या इच्छेतूनच हा प्रदर्शनाचा प्रपंच. चार जणांनी मदत केली, म्हणून हे शक्य झाले. जमेल तेवढी अशी प्रदर्शने भरवावी, असे मनात आहे.'

हौसेची दोन लक्षणे : एक-प्रदर्शन विनामूल्य होते. (मला मात्र हे पटले नाही. हा काही प्रचार नव्हे. आपण महत्त्वाचा कलानुभव घेत आहो अशी जर पाहणाऱ्याची प्रेरणा असेल तर वाजवी दाम मोजण्याची त्याची तयारी होईलच.) दोन-दगडांच्या टेबलावर आवर्जून निमंत्रण होते - "खुशाल हात लावून पाहा."

प्रा. सीताराम रायकर यांची रसिकता या संग्रहात प्रकट होत होती. नाना रंगाचे, तऱ्हेतऱ्हेच्या व तऱ्हेवाईक पोतांचे दगड बघून मनाला कसे बरे वाटत होते. उन्हाळ्याच्या रखरखीत त्या दगडांचे थंडपण हाताडोळ्यांना सुखवीत होते.

दगडांच्या चारी बाजूंनी (अक्षरशः) उभे राहिलेले दर्शन डॉ. अनिल अवचट यांच्या चित्राकृतींचे. उत्तम, कलापूर्ण दर्शन.



एक आकृती

चित्राकृतींचे दोन ठळक प्रकार होते.

एक – पांढऱ्या कागदावरील रेखाकृती. परोपरीचे वाटोळे, चौकोनी, त्रिकोणी आकार कागदावरून वेगळे रेखलेले. जरा दुरून पाहिले तर त्या थरथरत्या रेषा उठावाच्या दिसत, आणि मधले पांढरे आकार खाली गेलेले. एकामेकांना स्पर्श करणारे, एकमेकांपासून वेगळे झालेले, एकमेकांतूनच निघालेले.

अवचटांची रेघ एकाच जाडीची आहे. फार गडद नाही. कोनांचा कठोरपणा तिला रुचत नाहीसे दिसते. कोपऱ्याशी मऊपणाने ती वळते, जणु मागे बघतबघत वळते. मधले शुभ्र आकार या वळणांनी एकमेकांशी जोडले जातात? कोणत्या नात्याने? ते कसे नक्की सांगायचे? नंतर काही अंदाज करता येतो का पाहू.

दुसरा प्रकार : गडद काळ्या रंगाचे फराटे. कमी-अधिक जाडीचे. या फराट्यांनी उठाव दिलेले पांढरे आकार. त्या फराट्यांमुळेच एकमेकात जखडलेले. पण एकमेकांपासून दूर जाऊ पाहणारे. या संघर्षाची लय पांढऱ्या आकारात मिटते तर काळ्या फराट्यात उलगडते. जरा दुरून तिरपे पाहिले तर काळे फराटे कागदात रुतलेले. पांढऱ्या आकाराचे सारे उठाव. फराट्यांनी खेंचून धरलेले.

रेखाचित्रांपेक्षा हा दुसरा प्रकार अधिक परिणाम करणारा. रेखाचित्रांची थीम या चित्रात ठळक, वजनदार, भरीव झालेली.

ही थीम कोणती ? मला जाणवले की हे पांढरे आकार प्राण्यांचे आहेत. माणसांचे असेही वाटते. पण माणसाचे म्हणजे माणूसप्राण्याचे. हा प्राणी – चेतावलेला. आळसावलेला, आक्रमक, भीतीने आक्रसलेला, उपभोगाने तृप्त झालेला, कसल्यातरी काळजीने वाट पाहणारा, खंतावलेला.

या प्राण्यातील एक सामान्यत्व, किंवा समानत्वही, जाणवले. हा आकारयुक्त प्राणी निराकार होऊ बघतो आहे. अवचट यांची सर्व चित्रे–सर्व आकार–निराकारात, त्या पार्श्वभूमीत विरून जाऊ पाहतात. त्यांचे प्राण्यांचे आकार हे (म्हणूनच ?) मूळ आकार. कणा व त्याभोवतालचे धड हे मूळ. कण्याच्या टोकाला डोके असेल वा नसेलही. हातपायही संपूर्ण असतील, नसतीलही. झडले असतील, की अर्धवट उगवले असतील ? मी अवचटांना विचारलेदेखील. " मेडिकल कॉलेजात बरण्यात ठेवलेली अपुऱ्या दिवसांची बाळे असतात. त्यावरून तुम्हाला हे सुचले काय ?" अवचट हसले. (समाजप्रबोधन संस्थेने त्यांच्या चित्रांची जी पुस्तिका काढली आहे तीत अवचट यांनी म्हटले आहेच – ही चित्रे पाहून हेन्‍री मूरच्या कलाकृतींची आठवण होईल.)

तर हे मूळ आकार आकारबद्धतेतून निसटू पाहत आहेत. अवयव उगवणे ही एक निसटण्याची दिशा. सारखेपणात वैशिष्टय दाखवणे-साधणे ही दुसरी दिशा. या दोन्ही दिशा अवचटांनी बंद केल्या आहेत. राहता राहिली निराकाराची दिशा. ती स्वीकारली तर चित्रे काढणेच बंद होते. कलावंताची ही मूळ समस्या अवचटांच्या या आकारचित्रांत दिसते. हे आकार, अधिकाधिक स्वातंत्र्य घेत, मूळ रूप शोधत आहेत.

अवचटांची ही प्रेरणा आध्यात्मिक म्हणावी का ? तसा मोह होतो. सामाजिक चित्रावर अवचट तळमळीने लिहितात. त्यातही ते माणसाच्या मनाचा मूळ आकारच शोधत असतात काय ? प्रातिनिधिकापेक्षा विकृतीतच मूळ आकार दिसेल असे त्यांना वाटत असेल काय ? ' भगवान ' (!) रजनीशांच्या समाजसंमोहनावर त्यांनी जे कोरडे ओढले त्यामागे त्यांची या चित्रात सुस्पष्ट दिसणारी आध्यात्मिक प्रेरणाच होती काय ? असावी, असे वाटते. अवचटांनी या शंकांची उत्तरे द्यावीत, असा आग्रह नाही. खरे म्हणज, या अशा शंकांचा विचार करण्याऐवजी त्यानी अशी, नवी, चांगली चित्रे काढावी.

वागूलांशी एक जाहीर भांडण काढणे जरुरीचे वाटते. या प्रदर्शनाच्या निमित्ताने. वागूल कलेचे विकेंद्रीकरण मानतात, कलेतील स्वावलंबन प्रशंसितात. मग लोकांसाठी हे प्रदर्शन कशाला भरवावे ? या सदिच्छेपोटीसुद्धा एक प्रकारचे ' दिशा दाखवणेच ' येते की नाही ? वागूलांनी अशी दिशा दाखविण्याची उमेद बाळगणे व तसे प्रयत्न करणे हे (मला चांगले वाटले तरी) त्यांच्या प्रकट कलातत्त्वाशी मूलत: विसंगत आहे. अशी विसंगती निदान वागूलांनी पत्करू नये, असे वाटते. □ □ □

शरद गोखले

# चित्रपट

## लालपत्थर

### एक आळसावलेले चित्र

ईगल फिलमस्चे फकीरचंद महेश यांचा नवीन चित्रपट 'लाल पत्थर' अतिशय संथ लयीमध्ये–संशयी पतीने घेतलेल्या निर्दोष पत्नीच्या सुडाची कहाणी मोठ्या चवीने सांगतो. एलान सारखे फालतू गतीमान सेक्सी चित्र दिल्यावर मेरास साहेब अशा संथ लयीच्या चित्रपटाकडे वळतील असे वाटले नव्हते. पण निर्मितीवर भरपूर रक्कम खर्ची घालून त्यांनी अव्वल ब्रिटिश आमदानीतील नवाबी थाटाचा चित्रपट तयार केला आहे.

चित्रपटाची कथा फ्लॅश बॅक पद्धतीने सुरू होते. रायनगरचे कुमार ग्यान शंकर मोठे रसिक असले, तरी बायकांबाबतच्या कुटुंबाच्या घाणेरड्या सवयीमुळे स्वत: लग्न करीत नाहीत आणि स्त्रियांचा सहवासही हेतुत: टाळतात. त्यांच्या मुलखातील एका गावामध्ये जनतेला त्रस्त करणाऱ्या वाघीणिची शिकार करण्यासाठी गेलेल्या कुमार साहेबांची चोरांच्या टोळीशी चकमक उडते. डोली टाकून चोर पळून जातात. डोली उघडल्यावर एक देखणी तरुणी खाली कोसळते. (अब शुरू हुई फिल्म-ओ गिरी हेमा मालिनी-चित्रपट चालू असताना व्यक्त झालेली एक प्रतिक्रिया). कुमार साहेब डोलीतील बाईची सन्मानपूर्वक पाठवणी करतात. घरामध्ये सासुकडून आणि हिराकडून या बाईचा छळ होतो. आणि या बाईसाठी

अस्वस्थ झालेले कुमारसाहेब तिला अलगद आपल्या महालात आणून ठेवतात. जात्याच कलाप्रिय असलेले कुमार या बाईला शिकवण्याचा, अनेक परीने प्रयत्न करतात. परंतु यश येत नाही. सुंदर रूप लाभलेली ही बाहुली कुमारसाहेबांचे पूर्ण समाधान करू शकत नाही. स्वतःचे आर्थिक सामर्थ्य खर्ची घालून कुमारसाहेब उतार वयामध्ये चक्क लग्न करतात. पहिल्या बाईला–माधुरीला हा विलक्षण अपमान वाटतो. दोन बायकांच्या दादल्याला माधुरी सारखी डिवचते. कुमारच्या मनात संशय निर्माण होतो. आणि अखेरीस ज्या पुरुषाबद्दल संशय निर्माण झालेला असतो त्या अमरीशबाबूंच्या हातूनच कुमारबाबू आपल्या पत्नीचा अतिशय नाटकी पद्धतीने वध करवतात. नंतरच्या हमरातुमरीमध्ये उमरीशबाबूंची अखेर होते. आणि अडीच तास रेंगाळलेली कथा फ्लॅशबॅकने समारोपाकडे जाते.

राजकुमार, हेमा मालिनी, राखी, या सारखे प्रथम श्रेणीचे कलावंत आणि उत्कृष्ट निर्मितीमुळे, असूनही चित्रपट विशेष परिणामकारक होत नाही. विशेषतः पहिला अर्ध अतिशय कंटाळवाणा झाला आहे. चार सहा रिळे झाली तरी चित्रपट आकार घेत नाही. आणि दिग्दर्शक बारीकसारीक तपशिलाच्या नोंदी करण्यात गुंतलेला दिसतो. चित्रपटाचा दुसरा अर्ध नाट्यपूर्ण घटनांमुळे आणि विशेषतः हेमा मालिनीच्या दुखावलेल्या स्त्रीच्या नवीन स्वरूपामुळे बघावसा वाटतो. राजकुमार इतके नाटकी काम करू शकतो असे कोणी सांगितले असते तरी खरे वाटले नसते. संपूर्ण चित्रपटाची मदार त्याच्यावर आहे. आणि तो ती पेलू न शकल्याने हेमा मालिनी भाव खाऊन जाते. राखीला फारसा स्कोप नाही. विनोद मेहरा या नवीन कलाकाराच्या वाट्याला आलेली अमरिशबाबूची भूमिका त्याने छान केली आहे. इनस्टिट्यूच्या पटल या विनोदी नटाची अवस्था केवीलवाणी झाली आहे. दिग्दर्शक सुशिल मुजुमदार दारुड्या बापाच्या भूमिकेत मोठी गंमत आणतात. द्वारका दिवेचा यांनी फत्तेपूर शिक्रीचे छाया चित्रण डाक्युमेंटरी स्टाईलने केले आहे. शंकर जयकिशन यांचे पार्श्वसंगीत ठीक असून पाच गीतांपैकी किशोरने गायलेले, गीत गाता हूँ मैं ! हे एकमात्र गीत चांगले वाटते.

अवाढव्य निर्मिती शक्ती, उत्तम कलाकार, असूनही इतका परिणामशून्य चित्रपट केवळ हिंदी निर्माताच देऊ जाणे. प्रत्येक पदार्थाचा अलगपणे विचार केला तर पदार्थ चांगला लागावा परंतु सर्व पदार्थ एकत्र घेऊन केलेले जेवण मात्र समाधान देणारे नसावे, असे काहीसे या लाल पत्थरच्या बाबतीत झाले आहे.

□ □ □

पृष्ठ ८ वरून

## कोरडवाहू शेती : मुख्य समस्या

महाराष्ट्रातल्या शेतीचा प्रश्न हा प्रामुख्याने कोरडवाहू शेतीचा प्रश्न आहे. बर्वे कमिशनने आपल्या अहवालात म्हटले आहे, की साऱ्या पाणीपुरवठ्याच्या योजना राबवल्या तरी महाराष्ट्रातील सत्तर टक्क्याहून अधिक जमीन कोरडवाहूच रहाणार. आणि कोरडवाहू जमिनीतही महाराष्ट्राच्या इतर विभागांपेक्षा मराठवाड्यातील जमिनीचे प्रमाण जास्त आहे. उदाहरणार्थ ओलीत जमिनीचे प्रमाण मराठवाड्यात तीन ते चार टक्के आहे, तर महाराष्ट्रात त्याच्या दुप्पट आहे. जलसिंचनातील ही तफावत गोदावरीवरल्या जायकवाडी प्रकल्पाने काही प्रमाणात भरून निघणार असली, तरी तिचा फायदा सर्व मराठवाड्याला मिळणार नाही. जलसिंचनाच्या दृष्टीने उस्मानाबाद जिल्हा हा मराठवाड्यातील सर्वांत मागासलेला जिल्हा. तेथें मांजरा नदीवर धरण बांधण्याची योजना मध्यंतरी कागदपत्रांवर घोळत होती. नांदेड-परभणीच्या सरहद्दीवर पेणगंगा धरणाचीही शिफारस होऊन गेली. या दोन्ही धरणयोजनांबाबत मराठवाड्याने नेट धरला पाहिजे आणि सरकारनेही त्या त्वरित कार्यान्वित केल्या पाहिजेत. पण त्या दृष्टीने अजून आशादायक हालचाल काहीही झालेली नाही.

औद्योगिककरण आणि जलसिंचनाबाबत मराठवाड्यावर अशा रीतीने अन्याय झालाच त्याप्रमाणे इतर कृषीपूरक योजनांबाबतही मराठवाडा उपेक्षिला गेला. मराठवाडा विकास-महामंडळाने मराठवाड्याची पहाणी करून दुग्धव्यवसायासाठी नांदेड आणि उस्मानाबाद जिल्ह्यात विशेष अनुकूलता असल्याचे स्पष्ट केले होते. परंतु महाराष्ट्र सरकारने नव्या विधानसभेत कोकणातील दुग्धव्यवसायासाठी १९–२० कोटींची योजना जाहीर केली. पण मराठवाड्याच्या दुग्धव्यवसाय विकासासाठी छदाम दिला गेला नाही.

या सर्व आर्थिक दुरवस्थेचा परिणाम म्हणजे दोन वर्षे लागोपाठ दुष्काळ पडल्यावर बारा लाख वस्तीच्या औरंगाबाद जिल्ह्यातील चार लाख लोक दुष्काळी कामावर खडी फोडून पोट जाळत होते—आणि त्यात दुर्दैव म्हणजे आठ बैलवाले शेतकरीसुद्धा या परिस्थितीला बळी पडले होते, तर सामान्य शेतमजुरांचे आणि छोट्या शेतकऱ्यांचे हाल काय असतील ? ही सर्व परिस्थिती लक्षात घेता मराठवाड्यातील शेतीविकासासाठी जलसिंचन योजना, कृषी विद्यापीठ आणि कृषीपूरक उद्योगाची आवश्यकता लक्षात येईल. परंतु आजची आपली कृषी विद्यापीठेही बागाईतदारांची गुलाम झाल्याने केवळ कृषी विद्यापीठ उभारून तरी प्रश्न सुटणार आहे काय ?

सत्तर टक्क्यांहून अधिक कोरडवाहू जमीन असलेल्या महाराष्ट्रातील कृषी

विद्यापीठांनी पंजाबमधील पंतनगर कृषी विद्यापीठाचा किंवा कॅलिफोर्नियातील विद्यापीठांचा आदर्श बाळगून चालणार नाही. कोरडवाहू जमिनीसाठी विविध किफायतशीर धान्ये शोधून काढण्याचे, कोरडवाहू शेतीच्या समस्या सोडवण्याचे आणि या शतीच्या विकासाचे तंत्र शोधण्याचे धोरण महाराष्ट्रातल्या कृषी विद्यापीठांनी स्वीकारले पाहिजे. पण आपली आजची विद्यापीठे पाण्याखालील जमिनीच्या नगदी पिकांच्या—उसाच्या, द्राक्षाच्या नव्या जाती शोधण्यात आणि बागाईती शेतीचा विकास साधण्यातच आपल्या ज्ञानाची कृतार्थता मानतात. या संशोधनान केवळ बड्या बागाईतदारांचाच फायदा होतो—छोट्या जिराइत जमिनीच्या धारकांना या संशोधनाचा काडीमात्र उपयोग होत नाही. निदान यापुढे तरी ही परिस्थिती पालटवली पाहिजे.

## परभणी आणि राहुरी

महाराष्ट्रात स्वतंत्र कृषी विद्यापीठ स्थापण्याचे महाराष्ट्र सरकारने ठरविले आणि योग्य जागेच्या पहाणीसाठी समिती आयुक्त केली. विविध जागांची पाहणी केल्यानंतर सदर समितीने आपल्या अहवालात परभणी जिल्ह्यातील गोळेगाव परिसराची शिफारस केली. परंतु पुढें काही राजकीय गटांच्या दडपणाखाली समितीने थातुरमातुर कारणे पुढे करून नगर जिल्ह्यातील राहुरीचा परिसर कृषी विद्यापीठासाठी सुचविला—आणि हा निर्णय त्वरित अंमलात आणून मराठवाड्याची सयुक्तिक मागणी धुडकावून लावून महाराष्ट्र सरकारने आपले अन्यायी आणि पक्षपाती धोरणच पुढे रेटले.

समितीच्या या निर्णयाविरुद्ध विदर्भाच्या विद्यार्थ्यांनी जोरदार आंदोलन उभारले. त्या आंदोलनाने हिंसक वळण धारण करताच महाराष्ट्र सरकारने विदर्भासाठी अकोला येथे पंजाबराव कृषी विद्यापीठाची स्थापना करून दहा वर्षांत म्हणजे १९७९ सालापर्यंत मराठवाड्यात परभणी येथे आणि कोकणात दापोली येथे अशी दोन नवी कृषी विद्यापीठे उभारण्याचे धोरण घोषित केले. वस्तुतः महाराष्ट्रासारख्या एका राज्यात चार-चार कृषी विद्यापीठांची आवश्यकता आहे काय ? का केवळ स्वतःच्या राजकीय सोयीसवलतींसाठी जनतेच्या करातून हे चार-चार पांढरे हत्ती पोसायचे ? —अखेर याचा जाब जनतेनेच सरकारला विचारला पाहिजे.

इथे जाता जाता एका प्रश्नाचे स्पष्टीकरण केले पाहिजे. ते म्हणजे मराठवाड्यावर हा अन्याय होताना मराठवाड्यातील बडे जमीनदार चूप बसले होते काय ?— अर्थातच नाही ! मराठवाड्यातील बड्या जमीनदारांनी आणि खुद्द काँग्रेसनेत्यांनीही या मागणीला पाठिंबा दिला होता. पण महाराष्ट्राच्या राजकारणावर दरिद्री मराठवाड्यातील जमीनदारांपेक्षा पश्चिम महाराष्ट्रातल्या बड्या बागाईतदारांचे आणि शुगर सिंडिकेटचेच जास्त प्रभुत्व असल्याने प्रत्येक निर्णयात त्यांचाच वरचष्मा राहून मराठवाडा डावलला गेला.

अकोल्याचे पंजाबराव कृषी विद्यापीठ जाहीर होताच, परभणी येथील महाविद्यालय हा उपपरिसर म्हणून जाहीर करून पंजाबराव कृषी विद्यापीठाशी संलग्न करण्यात आला आणि या उपपरिसराचा विकास करूनच त्याचे विद्यापीठ दहा वर्षांच्या आत करण्याचे धोरण तत्त्वत: मान्य केले गेले. पण व्यवहारात ? –

## परभणी परिसर उपेक्षित

– व्यवहारात मात्र विदर्भाचे लोक मराठवाड्याला दडपू लागले आणि मराठवाड्याच्या उपपरिसराच्या विकासाकडे हेतुपुर:सर दुर्लक्ष केले गेले. या उपपरिसरात पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यात आला नाही. तेथील विद्यार्थ्यांनी आंदोलन उभारले तेव्हा तो सुरू करण्यात आला. याचप्रमाणे या उपपरिसराच्या विकासासाठी आठ हजार एकर जमीन ताब्यात घेण्याचे ठरविण्यात आले होते. परिसराच्या पंचवार्षिक योजनेत २४०० एकर जमीन ताब्यात घेण्याचे ठरले होते. पण प्रत्यक्षात एक एकरही जमीन ताब्यात घेण्यात आली नाही. विद्यापीठाचा विकास करण्यासाठी ६९–७० साली ६४·९२ लाख रुपये खर्च करण्यात आले. पैकी परभणी उपपरिसराच्या वाटणीला मात्र केवळ ३·१३ लाख रुपये खर्च केले गेले. पण अमरावती, नागपूर विद्यालयासाठी प्रत्येकी ५·१२ लाख खर्च करण्यात आले. १९७०–७१ साली पंजाबराव कृषी विद्यापीठाचा खर्च १६८·२६ लाख रुपये आला. पैकी अकोला परिसरावरच १२८·२८ लाख रुपये खर्च करण्यात येऊन परभणी उपपरिसरावर नाममात्र २२·१२ लाख रुपये खर्चण्यात आले. याच वर्षी विद्यापीठाने व्यवस्थापन व इतर बाबींवर ९४·७५ लाख रुपये खर्च केले. त्यापैकी फक्त १ लाख रुपयेच परभणी उपपरिसरासाठी खर्च करण्यात आले. या उलट नागपूर, अमरावती येथे ११ लाख रुपये खर्च करण्यात आले. या ' विकास गणिता 'चे त्रैराशिक मांडल्यास शंभर वर्षांत परभणी उपपरिसराचे रूपांतर विद्यापीठात होणे शक्य नव्हते.

आय. सी. ए. आर. कडून विद्यापीठाला एक कोटी रुपये अनुदान मिळाले. त्यापैकी फॅम्स स्कीमखाली कवडीदेखील परभणी उपपरिसरासाठी खर्च करण्यात आली नाही. उलट १९६८ साली जे दहा हजार रुपये परभणी महाविद्यालयाला आय. सी. ए. आर. कडून देण्यात आले होते तेही शासनाने निर्लज्जपणे परत मागितले. या उपपरिसराच्या विकासाच्या आराखड्याप्रमाणे ७१–७२ साली येथे पशु-वैद्यकीय शाखा सुरू करण्याचे ठरविण्यात आले होते, पण अद्याप त्या दृष्टीने काहीही हालचाल झालेली नाही. तसेच या उपपरिसराचे कार्यालय या वर्षीच स्वतंत्रपणे सुरू करावयाचे ठरवूनही त्या बाबतीत काहीही पावले उचलली गेलेली नाहीत.

परभणी महाविद्यालयातून बाहेर पडणाऱ्या पदवीधरांकडे विद्यापीठ पक्षपातीपणे पाहते, असा विद्यार्थ्यांचा ओरडा असून तो रास्त आहे. विद्यापीठाच्या कक्षेतील नोकऱ्यांबाबत या महाविद्यालयातील कृषी पदवीधरांवर जाणूनबुजून अन्याय केला

जातो. बेकार पदधवीरांना रोजंदारीवर लावण्याची एक योजना विद्यापीठाकडे आहे. त्यानुसार योजनेतील उमेदवाराला रोज ६·२५ रुपये वेतन मिळते. परभणी महाविद्यालयातील २२ विद्यार्थी या योजनेचा फायदा घेतात. पैकी १८ विद्यार्थी विदर्भातून आलेले आहेत. या महाविद्यालयातील.विद्यार्थी बेकार हिंडत असताना विदर्भातील विद्यार्थ्यांनाच प्रामुख्याने ही सोय उपलब्ध करून देण्याइतकी हीन वृत्ती पंजाबराव कृषी विद्यापीठाचे संचालक दाखवतात.

## पक्षपाती नेमणुका

१९ फेब्रुवारी ७२ रोजी परभणी कृषी महाविद्यालयात ११ सुपरवायझर्स नेमण्यात आले. पैकी एकही सुपरवायझर परभणी महाविद्यालयाचा पदवीधर नाही. तसेच १४ मार्च ७२ ला विद्यापीठाने ११ अॅग्रिकल्चरल सुपरवायझर्स नेमले, त्यामध्येसुद्धा या महाविद्यालयाचा एकही उमेदवार नाही. इतकेच नव्हे, तर या जागांसाठी जाहिरात देण्याचे औचित्यही विद्यापीठाने दाखवले नाही. मुलाखतीं-शिवायच उमेदवार नेमणूकपात्र ठरवले गेले. पंजाबराव विद्यापीठाच्या वर्ग २, ३, ४ चा जो नोकरवर्ग आहे, त्यातही मराठवाडा विभागातले लोक हाताच्या बोटावर मोजण्याइतके आहेत. परभणी येथे नेमावयाचे तिसऱ्या, चौथ्या वर्गाचे कर्मचारीसुद्धा विद्यापीठच नेमते आणि त्यासाठी पदरमोड करून अकोल्याला जाणे शक्य नसल्याने तेथेही विदर्भीय मंडळी मांड ठोकून आहेत. याबाबत काही सोयीस्कर योजना आखण्याकडे विद्यापीठ जाणूनबुजून विसरते.

परभणी उपपरिसरात पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ५४ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. पैकी केवळ २४ परभणी महाविद्यालयातील पदवीधर असून बाकी सारे विदर्भीय आहेत. या उलट विदर्भातील पदव्युत्तर अभ्यासक्रमातील १२६ जागांपैकी मराठवाड्यातील चार किंवा पाचच विद्यार्थी असतात.

वरं, मराठवाड्यातील विद्यार्थी मठ्ठड आहेत म्हणून हा पक्षपात होतो म्हणावे तर तसेही नाही. अखिल भारतीय पातळीवर आय. सी. ए. आर. तर्फे ज्या परीक्षा होतात त्यात विद्यापीठाचे दहा विद्यार्थी निवडलेले आहेत. त्यांपैकी सहा केवळ परभणी महाविद्यालयातील विद्यार्थी आहेत.––मग पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी परभणी महाविद्यालयातील पदवीधरांवर अन्याय का ?––केवळ ते मराठवाड्या-तील आहेत म्हणून ?

ज्या वेळेपासून विद्यापीठ स्थापन झाले, तेव्हापासून विद्यापीठाच्या आंतर महा-विद्यालय क्रीडा स्पर्धात, सांस्कृतिक कार्यक्रमांत परभणी महाविद्यालयच अग्रणी आहे. मग परभणी विद्यालयावरील अन्यायाने विद्यार्थी असंतुष्ट होणार नाहीत तर काय होईल ? या अन्यायामुळे दहा वर्षे विद्यापीठाची वाट पाहूनला मराठवाड्यां-तील विद्यार्थी तयार झाले नाहीत. त्यांनी आंदोलन उभारले, आंदोलन जोपर्यंत शांततामय मार्गाने चालले होते तोपर्यंत सरकारने त्याकडे नेहमीप्रमाणे दुर्लक्ष केले.

जेव्हा आंदोलन उग्र स्वरूप धारण करू लागले, तेव्हा नेहमीचीच पोलिसी दडपशाही सुरू केली. परभणी येथील अमानुष आणि क्रूर लाठी हल्ल्यास काहीही सयुक्तिक कारण नव्हते. जेव्हा पोलिसी दडपशाहीलाही विद्यार्थी शरण जाईनात आणि मराठवाड्यातील सर्व पक्ष आणि जनता या आंदोलनामागे एकमुखी उभी राहिली तेव्हा सरकारने शरणागती पत्करली-जूनमध्ये परभणीला स्वतंत्र कृषी विद्यापीठ स्थापण्याची घोषणा केली. सरकारच्या या धोरणाने-'रस्त्यावर येऊन हिंसक चळवळी केल्याशिवाय सरकार मागण्यांचा विचार करीत नाही.' हा समज मात्र जनतेत ठाम रुजला गेला. सरकार जर बड्यांच्या अनुनयाच्या धोरणात असे गुंतून जनतेकडे दुर्लक्ष करू लागले तर हा लोकशाहीचा बुरखा किती दिवस टिकणार?

## नवे विद्यार्थि-नेतृत्व !

मराठवाड्यातील विद्यार्थ्यांचा असंतोष आमच्यापर्यंत कधी पोचलाच नाही; पोचल्या त्या बसेस जाळल्याच्या बातम्या. या बातम्यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाविषयी पांढरपेशांच्या विकृत कल्पना तेवढ्या भक्कम होण्यास मदत झाली. पण मराठवाड्यातील हे विद्यार्थी आंदोलन पूर्णतः जबाबदार आणि लोकशाहीवादी होते. एवढ्या उग्र आंदोलनातही कोणत्याही प्रकारचा विदर्भद्वेष नव्हता, की फुटीरतेची मागणी नव्हती. आंदोलनाच्या काळात एकाही विदर्भाच्या विद्यार्थ्याला किंवा प्राध्यापकाला किंचितही उपसर्ग पोचला नाही. किंवा मुस्लिम आमदाराची गाढवावरून धिंड काढूनही जातीयवाद पेटला गेला नाही. आंदोलनास हिंसक वळण लागायच्या आधी शिष्टमंडळे पाठवणे, उपोषण करणे, निदर्शने करणे, निवेदने देणे हे सारे संसदीय मार्ग विद्यार्थि-नेत्यांनी असंसदीय सरकारपुढे अवलंबिले होते. प्रत्यक्ष आंदोलन सुरू झाल्यावर जनतेचा पाठिंबा मिळवण्याचा विद्यार्थ्यांनी प्रयत्न केला व त्यांना तसा एकमुखी पाठिंबा मिळालाही. आणि मराठवाड्यातील नेत्यांनीही विद्यार्थ्यांना डावलून 'अमृतकलश' आणण्याचा मान आपल्याकडे घ्यायचा प्रयत्न केला नाही हे विशेष. अर्थात असा प्रयत्नही वायाच गेला असता हे सांगणे नको !

विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने एक गोष्ट स्पष्ट झाली, की मराठवाड्याचे सध्याचे जुनाट आणि परस्पर हेव्यादाव्यांनी बुजबुजलेले नेतृत्व मराठवाड्याचे प्रश्न सोडवू शकत नाही. मराठवाड्याच्या प्रश्नासाठी विद्यार्थीच झुंजारपणे लढू शकतो आणि म्हणून तोच मराठवाड्याच्या जनतेचे नेतृत्व करू शकतो. आता जरूर आहे, ती विद्यार्थ्यांनी केवळ कृषी विद्यापीठावर संतुष्ट न रहाता मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी आंदोलन उभारायची.

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर यांनी** साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे यथील सस्थच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**

MANOOS (Weekly) : 50 Paise Regd. No. MH 649

"आम्ही विजयी झालो.
आता साऱ्या जगाचा थरकाप उडू दे"

स्वातंत्र्यदिनाच्या आपल्या पहिल्याच भाषणात
विजयोन्मादाने माओ-त्से-तुंग असे म्हणत होता.

आणि खरोखरच सारे जग हादरून गेले.
शतकानुशतकांच्या सुस्तपणानंतर
अत्यंत कर्मठ अशा कम्युनिस्ट चाबकाच्या
फटकाऱ्यामुळे अक्राळ–विक्राळ शक्तीचा चीन
खडबडून जागा झाला.

**या चिनी**
**कम्युनिस्ट क्रांतीची कथा**

# आणि ड्रॅगन जागा झाला

अरुण साधू

राजहंस प्रकाशन : पुणे
मूल्य : चौदा रुपये